CMYK

सोलापूर

# तरुण भारत

न मे कर्मफले स्पृहा

SOLAPUR TARUN BHARAT

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

धाराशिव | शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ | वर्ष ३ रे अंक २८९ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86468 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com

epaper.dainiktarunbharat.com


## अखेर दिलीप मानेंचा भाजपात प्रवेश

### मुंबईत बावनकुळे, चव्हाण, कल्याणशेट्टींच्या उपस्थितीत सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

काँग्रेसचे माजी आमदार तथा सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे विद्यमान सभापती दिलीप माने यांचा गुरुवारी मुंबईत भाजपमध्ये जाहीर पक्षप्रवेश झाला. मुंबईतील भाजप कार्यालयात प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सचिन कल्याणशेट्टी आदींची प्रमुख उपस्थिती होती. मानेंच्या पक्ष प्रवेशाला भाजपमधील आमदार सुभाष देशमुख आणि त्यांच्या समर्थकांनी प्रचंड विरोध केला होता. मात्र स्थानिकांच्या विरोधानंतरही दिलीप मानेंचा पक्षप्रवेश झाल्याने भाजपाच्या स्थानिक नेत्यांत पुन्हा अस्वस्थता पसरली आहे.



माजी आमदार दिलीप माने यांना राजकीय वारसा असून, त्यांचे वडील स्व.ब्रम्हदेव माने काँग्रेसचे आमदार होते. दिलीप माने यांनी स्व:कर्तृत्वावर स्वत:चे वेगळे अस्तित्व निर्माण करून दक्षिण सोलापूर तालुक्याचे आमदार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन, कृषी उत्पन्न बाजार समिती सभापतीपद भोगले. २०१४ साली त्यांचा विद्यमान आमदार सुभाष देशमुख यांनी सोलापूर दक्षिण मतदारसंघातून पराभव केला होता. त्यानंतर माने यांनी शिवसेनेतून आमदारकीचे तिकीट घेवून शहर मध्यमधून लढाई लढली होती. त्यावेळी प्रणिती शिंदे यांनी त्यांना पराभूत केले होते. गत निवडणुकीत कोणत्याही पक्षातून त्यांना उमेदवारी मिळाली नव्हती. तरीही बाजार समितीत यश मिळवून त्यांनी आपले अस्तित्व टिकविले होते. भाजपात आल्यानंतर त्यांनी पक्षवाढीसाठी आपण प्रयत्न करणार असल्याचा शब्द दिला आहे. राजकारणातील जुने सहकारी तथा पालकमंत्री जयकुमार गोरे, अक्कलकोटचे आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या माध्यमातून मुंबईतील प्रदेश कार्यालयात भाजपात प्रवेश केला.

(उर्वरित वृत्त पान २ वर)

**भाजपाची ध्येयधोरणे आवडली अन् प्रवेश केला**

“ गेल्या अनेक वर्षांपासून मी विविध पक्षात काम केले आहे. माझ्या राजकीय अभ्यास अन् अनुभवातून मला भारतीय जनता पार्टीची ध्येयधोरणे आवडली, पक्षाची विचारधारा आणि भाजपची जनतेच्या विकासाची कामे करण्याची पध्दत आवडल्याने मी या पक्षात प्रवेश केला. या पक्षात मी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाखाली आलो आहे. पक्षाची शिस्त पाळून आणि पक्षनिष्ठ राहून मी काम करेन, अशी ग्वाही माजी आमदार दिलीप माने यांनी दिली.

## प्रदेश पातळीवरुन प्रवेशाची घाई

### आ. देशमुखांची खंत; मानेंना तिकिट नाही मिळणार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

माजी आमदार दिलीप माने यांच्या प्रवेशाबाबत माझे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बोलणे झाले होते. कार्यकर्त्यांच्या भावना कळविल्या होत्या. सध्या आमच्या मतदारसंघातील भाजपा कार्यकर्ते महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीच्या घाईगडबडीत आहेत. यात माने यांना भागीदार करु नका.

या निवडणुका पार पडल्यानंतर जाहीर प्रवेश करा, असे सांगितले होते. परंतु प्रदेश पातळीवरुन मानेंच्या प्रवेशाची घाई झाली, असे रोखठोक प्रतिक्रिया आमदार सुभाष देशमुख यांनी व्यक्त केली. आज सकाळीच भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासोबत माजी आमदार दिलीप माने यांच्या प्रवेशासंदर्भात सविस्तर चर्चा झाली. मात्र प्रदेशाध्यक्षांनी या विषयावर नंतर बोलतो, असे सांगितले. आणि तासाभरातच माध्यमातून माने यांच्या जाहीर प्रवेशाची वार्ता मला समजली. मुळात माने यांच्या प्रवेशाला कसलाच विरोध नव्हता. फक्त पक्षाकडून प्रवेशाचे टायमिंग चुकले असल्याची खंत वाटते. पक्षवृध्दीसाठी प्रदेश पातळीवर हा निर्णय झाल्याने मी त्यांच्या निर्णयाचे स्वागतही करतो, असे सांगायलाही ते विसरले नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक ही पदाधिकाऱ्यांची असते.

**कार्यकर्त्यांच्या भावनांची नाही झाली कदर**



(उर्वरित वृत्त पान २ वर)

**“ आता कुठे बसली होती घडी**

गेल्या १० ते १२ वर्षांपासून मी दक्षिण सोलापूर मतदारसंघात कोट्यवधींची विकासकामे केली आहेत. त्या भागातील लोकांना भाजपची विकासकामे आवडल्याने अनेक लोक जोडले आहेत. पक्षवृध्दीही झाली आहे. आता कोठे भाजपची चांगली घडी बसली असताना आमच्यात एक भागीदार पक्षाने दिल्याने कार्यकर्ते-पदाधिकाऱ्यांतूनही नाराजी व्यक्त होत असल्याचे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

## भाजपाचा मोठा निर्णय

### आ. कल्याणशेट्टी महापालिका निवडणूक प्रमुख

**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

भाजपाने सोलापूर महानगरपालिका निवडणुकीसाठी अक्कलकोटचे आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्यावर निवडणूक प्रमुखपदाची जबाबदारी सोपवली आहे. भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी ही नियुक्ती केली आहे. आपल्या संघटन कौशल्याने भारतीय जनता पक्षाचे जास्तीत जास्त उमेदवार निवडून येण्याकरिता सर्वांना सोबत घेऊन अथक परिश्रम कराल, असा मला पूर्ण विश्वास आहे, असे भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी पत्रात नमूद केले आहे.



**देशमुखांचे वर्चस्व कमी करण्याचा पक्षाचा प्रयत्न?**

विशेष म्हणजे महापालिकेची म्हणजेच शहराची निवडणूक सुरु आहे. शहरात सध्या भाजपाचे तीन विद्यमान आमदार आहेत. त्यात भाजपाचे दोन माजी आमदार मंत्री राहिलेले अनुभवी आहेत. विशेष म्हणजे या दोन्ही आमदारांनी मतभेद असताना महापालिकेत ४९ नगरसेवक विजयी करून महापालिकेत भाजपाची एकहाती सत्ता आणली होती. आता तर हे दोन्ही आमदार देशमुख मतभेद विसरून एकत्र आले आहेत. दोघांच्या एकत्र रणणितीने आणि शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांच्या साथीने भाजपाची ताकत वाढली आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी सोलापूरवर आणि शहरासह जिल्ह्याच्या विकासावर लक्ष केंद्रीत केल्याने भाजपाला महापालिकेत पुन्हा एकहाती सत्ता आणण्याची मोठी संधी आहे. परंतु कुठेतरी पक्षातूनच दोन्ही देशमुखांचे राजकीय वर्चस्व कमी करण्याचा तर प्रयत्न होत नाही ना? अशी चर्चा सोलापूरच्या राजकीय वर्तुळात रंगली आहे.

### विचारपुष्प



भारत भूमी देवाला अत्यंत प्रिय आहे. तिच्या उन्नतीकरिता देवाने अनेक वेळा या भूमीवर जन्म घेतला आहे. त्यामुळे भारत भूमीला धर्म-भूमी म्हणतात. विश्वात अन्य देशांत वीर-भूमी आहे, वाणिज्य-भूमी आहे, पण भारत भूमी ही धर्म-भूमी आहे. येथे सर्वाधिक महत्त्व धर्माला आहे.

**- बाबासाहेब आपटे**
रा. स्व. संघाचे प्रथम प्रचारक

### महत्त्वाचे

**सलग चौथ्या सत्रात बाजारांत घसरण**

**मुंबई** : भारतीय शेअर बाजार गुरुवारी सलग चौथ्या दिवशी घसरणीसह बंद झाले. अस्थिर व्यापार सत्रानंतर शेवटच्या तासांमध्ये विक्रीमुळे बहुतेक वाढ गमावली.



व्यवहाराच्या शेवटी सेन्सेक्स ७७.८४ अंकांनी घसरून ८४,४८१.८१ वर बंद झाला. निफ्टी फक्त ३ अंकांनी घसरून २५,८१५.५५ वर स्थिरावला. कमकुवत जागतिक संकेतांमध्ये शेअर बाजार घसरणीसह उघडला. मात्र, निवडक शेअर्समध्ये पुन्हा गुंतवणूक झाल्याने दुपारच्या व्यवहारात बाजार तेजीत आला आणि तो बराच काळ मजबूत राहिला. शेवटच्या तासांमध्ये नफावसुली आणि विक्रीचे वर्चस्व होते. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही जवळजवळ स्थिर राहिले. सेन्सेक्समधील ३० पैकी तेरा शेअर्स वाढीसह बंद झाले. टीसीएसच्या शेअर्समध्ये सर्वाधिक १.९४ टक्के वाढ झाली. त्यानंतर, टेक महिंद्रा, इन्फोसिस, ॲक्सिस बँक आणि एचसीएल टेकचे शेअर्स ०.४४ टक्के ते १.७२ टक्क्यांपर्यंत वाढून बंद झाले. ■

**एल कॅटरटनची हल्दीराममध्ये गुंतवणूक**

**नवी दिल्ली** : अमेरिकन इन्व्हेस्टमेंट फर्म एल कॅटरटनने भारताच्या पॅकेज्ड फूड कंपनी हल्दीराममध्ये धोरणात्मक भागीदारीच्या अंतर्गत गुंतवणूक केली आहे. या भागीदारीमध्ये एल कॅटरटन हल्दीरामला पुरवठा साखळी आणि वितरण सुधारण्यासाठी, भौगोलिक विस्तार आणि टॅलेंट डेव्हलपमेंटमध्ये मदत करेल. कंपनी आता एल कॅटरटनच्या ग्लोबल एक्सपर्टाइज, इंडस्ट्री नेटवर्क आणि लोकल टॅलेंटचा फायदा घेऊ शकेल. विशेषतः फर्मचे इंडिया एक्झिक्युटिव्ह चेअरमन संजीव मेहता यांच्या अनुभवाचा फायदा होईल, जे यापूर्वी हिंदुस्तान युनिलिव्हरचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक होते. ■

# ‘जी राम जी’ विधेयक पारित

## बापूंचे आदर्श जिवंत ठेवण्याचा मोदी सरकारचा प्रयत्न : चौहान

**हिवाळी अधिवेशन**



◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

**विरोधकांच्या प्रचंड गदारोळात लोकसभेत गुरुवारी मोदी सरकारचे महत्वाकांक्षी विकसित भारत जी राम जी विधेयक पारित करण्यात आले. मनरेगा योजना भ्रष्टाचाराचा अड्डा झाली होती. आता या नवीन कायद्यामुळे या योजनेतील भ्रष्टाचार कमी होईल, असा विश्वास चर्चेला उत्तर देतांना ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी व्यक्त केला.**



काँग्रेस सदस्यांनी विधेयक फाडत त्याचे तुकडे चौहान यांच्यावर भिरकावले

विधेयकावर झालेल्या चर्चेत ग्रामविकास मंत्री शिवराजसिंह चौहान यांनी विधेयकाला विरोध करण्याच्या विरोधकांच्या भूमिकेवर जोरदार हल्ला चढवला. काँग्रेसने बापूंचे आदर्श पायदळी तुडवले, आम्ही मात्र ते जिवंत ठेवले, असे ते म्हणाले.

मनरेगाची जागा घेणाऱ्या नव्या विधेयकात महात्मा गांधी यांचे नाव वगळण्यात येत असल्याचा विरोधकांचा आरोप फेटाळून लावतांना चौहान म्हणाले की, विकसित भारत जी राम जी विधेयकाच्या माध्यमातून सरकार महात्मा गांधी यांची स्वप्ने आणि आदर्श प्रत्यक्षात आणत आहे. विकसित भारताचे लक्ष्य गाठण्यासाठी आधी आपल्याला गाव विकसित करावी लागतील, त्याचा पाया या विधेयकातून घालण्यात आला आहे.

या विधेयकावर बुधवारी लोकसभेत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली, त्यात बहुतांश विरोधी सदस्यांनी हे विधेयक संसदेच्या स्थायी समितीकडे पाठवण्याची मागणी केली. आज लोकसभेत या विषयावर चर्चा सुरु झाली, तेव्हा काँग्रेसचे के.सी. वेणुगोपाल यांनी या मागणीचा पुनरुच्चार केला, मात्र अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ती फेटाळून लावली. त्यामुळे विरोधी पक्षांचे सदस्य संतप्त झाले आणि त्यांनी अध्यक्षांच्या आसनासमोरील मोकळ्या जागेत धाव घेत जोरदार घोषणाबाजी सुरु केली.

मात्र, चौहान यांनी भाषण चालूच ठेवले. काँग्रेसच्या सरकारने तर देशातील अनेक योजनांची नावे बदलत त्यांना जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांची नाव दिली. महात्मा गांधींच्या नावावरुन आता काँग्रेस पक्ष ढोंग करत आहे, असा आरोप करत चौहान म्हणाले की, काँग्रेसने बापूंच्या आदर्शांची अनेक वेळा हत्या केली. ◀ *(तभा वृत्तसेवा)*

**आवाजी मतदानाने विधेयक पारित**

» या विधेयकावर विरोधी सदस्यांनी नाव घेतल्यानंतरही कोणत्याही दुरुस्त्या न मांडल्यामुळे आवाजी मतदानाने हे विधेयक लोकसभेत पारित करण्यात आले. विरोधकांचा गोंधळ थांबत नसल्यामुळे अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी स्थगित केले. ■

**२००९ मध्ये मतांसाठी महात्मा गांधींची आठवण**

» या योजनेत सुरुवातीला महात्मा गांधी यांचे नाव नव्हते, नरेगा म्हणून ही योजना ओळखली जात होती, असे स्पष्ट करत चौहान म्हणाले की, २००९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आधी मतांसाठी अचानक तत्कालिन सरकारला महात्मा गांधी यांची आठवण झाली आणि त्यातून महात्मा गांधी यांचे नाव या योजनेला जोडण्यात आले, नरेगाचे मनरेगा करण्यात आले, असे चौहान म्हणाले. ■

**विधेयकाच्या प्रती फाडत चौहानांवर भिरकावल्या**

» या विधेयकावर बुधवारी लोकसभेत रात्री उशिरापर्यंत चर्चा झाली. आज लोकसभेत या विषयावर चर्चा सुरु झाली, तेव्हा काँग्रेसचे के.सी. वेणुगोपाल यांनी या मागणीचा पुनरुच्चार केला, मात्र अध्यक्ष ओम बिर्ला यांनी ती फेटाळून लावली. त्यामुळे विरोधी पक्षांचे सदस्य संतप्त झाले आणि त्यांनी विधेयकाच्या प्रती फाडत त्याचे तुकडे विरोधी सदस्य अध्यक्षांच्या आसनाच्या दिशेने तसेच भाषण करत असलेले शिवराजसिंह चौहान यांच्यावर भिरकावले. ■

## शतकातला शिल्पकार हरवला

# महाराष्ट्र भूषण राम सुतार कालवश

### वयाच्या १०१ व्या वर्षी घेतला अखेरचा श्वास

◆ **नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शिल्पकलेचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिल्पकार पद्मश्री राम सुतार यांचे बुधवारी रात्री निधन झाले. नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी रात्री सुमारे १.३० वाजता त्यांनी वयाच्या १०१व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. दीर्घायुष्य लाभलेले राम सुतार हे अखेरपर्यंत सृजनशीलतेशी नाते जपणारे व्यक्तिमत्त्व होते.



भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये उभारलेल्या त्यांच्या भव्य शिल्पकृतींनी भारतीय शिल्पपरंपरेला जागतिक ओळख मिळवून दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राष्ट्रीय नेत्यांची स्मारके, तसेच एकता आणि प्रेरणेचे प्रतीक ठरलेले पुतळे ही त्यांची अमूल्य देणगी मानली जाते. त्यांच्या निधनामुळे भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पकलेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. गुरुवारी सकाळी ११ वाजता त्यांच्या पार्थिवावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. कला क्षेत्रासह विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

**जगभरात शेकडो शिल्पनिर्मितीचे जनक**

जगभरात २०० हून अधिक शिल्पांची निर्मिती करणारे राम सुतार हे नाव केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आदराने घेतले जात होते. दिल्लीतील संसद भवन परिसरात उभारलेली त्यांची शिल्पे आजही भारतीय लोकशाहीची साक्ष देतात. राम सुतार यांना त्यांच्या योगदानाबद्दल पद्मश्री, पद्मभूषण तसेच महाराष्ट्र भूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडून त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान केला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वतः रुग्णालयात जाऊन हा पुरस्कार त्यांच्या हाती सोपवला होता. या भेटीदरम्यान राम सुतार यांनी महाराष्ट्र अभिमान गीत गायले होते, तो क्षण अनेकांसाठी भावूक ठरला. ◀ *(वृत्तसंस्था)*

“ पद्मभूषण पुरस्कार विजेते आणि प्रख्यात शिल्पकार राम सुतार यांच्या निधनाने मला दुःख झाले आहे. त्यांनी आपल्या कलाकृतीतून भारताचा कलात्मक आणि सांस्कृतिक वारसा समृद्ध केला. त्यांची कला नव्या पिढ्यांना प्रेरणा देत राहील. मी त्यांच्या कुटुंबियांप्रती आणि चाहत्यांबद्दल मनापासून संवेदना व्यक्त करते.
**- द्रौपदी मुर्मू**, राष्ट्रपती

“ राम सुतार यांच्या अद्वितीय शिल्पकलेद्वारे, भारताला अनेक प्रतिष्ठित स्मारके मिळाली, त्यापैकी स्टॅच्यू ऑफ युनिटी ही एक विशेष उल्लेखनीय प्रतीकात्मक कलाकृती आहे. त्यांच्या कलाकृती भारताचा इतिहास, संस्कृतीला प्रतिबिंबित करतात. त्यांची कामे कलाकार आणि नागरिकांना प्रेरणा देत राहतील.
**- नरेंद्र मोदी**, पंतप्रधान

शिल्पकलेचा कोहिनूर हरपला ▶ वृत्त पान ३

**वंदे भारतमध्ये मिळणार मिसळ अन् पुरणपोळी**

**नवी दिल्ली** : वंदे भारत एक्सप्रेसमधील प्रवाशांना आता स्थानिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेता येणार आहे. रेल्वे मंत्रालयाने वंदे भारत गाड्यांमध्ये प्रादेशिक पदार्थ देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला असून महाराष्ट्रातून धावणाऱ्या वंदे भारतमध्ये झणझणीत मिसळ आणि पुरणपोळी यांसारखे मराठमोळे पदार्थ मिळणार आहेत. सध्या देशभरात १६४ हून अधिक वंदे भारत एक्सप्रेस धावत असून उत्तर प्रदेश, महाराष्ट्र, बिहार आणि दिल्ली या राज्यांमध्ये त्यांची संख्या सर्वाधिक आहे. दिल्ली येथे रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या आढावा बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला रेल्वे राज्यमंत्री रवनीत सिंग बिट्टू उपस्थित होते. वंदे भारत एक्सप्रेस ज्या प्रदेशातून धावते, त्या भागातील वैशिष्ट्यपूर्ण खाद्यपदार्थ प्रवाशांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांना प्रवासात स्थानिक संस्कृतीचा अनुभव मिळणार असल्याचा विश्वास रेल्वे मंत्रालयाचा आहे. रेल्वे अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, प्रादेशिक खाद्यपदार्थांची ही योजना पहिल्या टप्प्यात वंदे भारत गाड्यांमध्ये राबविली जाईल.


# अखेर दोषी मंत्री कोकाटेंचा राजीनामा

### ▸ अजित पवार यांची संमती ▸ आता अटकेची प्रतीक्षा

**मुंबई, दि. १८ डिसेंबर:**

खोट्या कागदपत्राच्या साह्याने शासनाची फसवणूक करूनफ्लॅट मिळवल्याप्रकरणी जिल्हा न्यायालयाने शिक्षा कायम ठेवलेल्या वादग्रस्त कॅबिनेट मंत्री माणिकराव कोकाटे यांची पदावरून हटविण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांची संमती झाली आहे.त्यांच्या सूचनेनुसार कोकाटे यांनी गुरुवारी मंत्री पदाचा राजीनामा स्वीकारण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री पवार यांनी तो मुख्यमंत्र्याकडे पाठविला असल्याची सोशल मीडियावर पोस्ट करून कळिवले आहे.

कोकाटे यांना शिक्षा जिल्हा न्यायालयाने शिक्षा सुनावून दोन दिवस उलटलेतरी अद्याप अटक झालेली नाही. नाशिक पोलिसांनी अटक वॉरंट बजावेल असून त्यांना ताब्यात घेण्यासाठी मुंबईला रवाना झाले असल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे त्यांना कधी अटक होते?, याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे. बुधवारी कोकाटे यांच्या खात्याचा पदभार उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे घेण्यात आले होते.आज त्यांचा राजीनामा स्वीकारल्याचे पवारांनी एक्स पोस्ट करत माहिती दिली आहे. त्यात म्हटले आहे की, ‘न्यायालयाच्या निकालानंतर महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळातील सदस्य व पक्षातील सहकारी कोकाटेंनी आपला राजीनामा माझ्याकडं सुपूर्द केलाय.



(उर्वरित वृत्त पान २ वर)

**आमदारकीही जाऊ शकते**

» नाशिकमधील १९९५ सालच्या एका जुन्या सदनिका घोटाळा प्रकरणात माणिकराव कोकाटे यांना दोषी ठरविण्यात आले आहे. नाशिकच्या जिल्हा सत्र न्यायालयाने कोकाटे यांच्या विरोधात अटक वॉरंट जारी केले आहे. सुमारे ३० वर्षांपूर्वीच्या या प्रकरणाने आता कोकाटे अडचणीत आले. या निकालाला स्थगिती मिळावी यासाठी कोकाटे यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. उच्च न्यायालयाकडून त्यांना दिलासा मिळाला नाहीतर त्यांची आमदारकीही जाऊ शकते. ■

**अटकेसाठी हालचाली?**

» दरम्यान, पोलिस उपायुक्तांच्या नेतृत्त्वात नाशिक पोलिसांचे पथक मुंबईच्या दिशेने रवाना झाल्याची घडामोड गुरुवारी रात्री घडली. हे पथक थेट लीलावती रुग्णालयात जाणार असून कोकाटेंना ताब्यात घेणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. ■

# कोल्हापूर सर्किट बेंचच्या विरोधातील याचिका फेटाळली

**तभा वृत्तसेवा,**
**कोल्हापूर, दि. १८ डिसेंबर-**

कोल्हापूर सर्किट बेंचची स्थापना सर्वांना न्याय मिळवून देण्याच्या घटनात्मक दृष्टीकोनाशी सुसंगत असल्याचे निरीक्षण नोंदवत गुरुवारी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार व एन. व्ही. अंजारिया यांच्या न्यायपिठाने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचच्या विरोधातील याचिका फेटाळली.

**सर्वोच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय**

कोल्हापूरसह सहा जिल्ह्यातील प्रलंबीत खटले, पक्षकारांना मुंबईपर्यंत मारावे लागणारे हेलपाटे, जाण्या येण्याचा खर्च या सर्वांचा विचार करून कोल्हापूर या मध्यवर्ती जिल्ह्यत मुंबई उच्च न्यायालयाचे सर्किट बेंच व्हावे अशी मागणी ३५ वर्षापासून सुरू होती. सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन सरन्यायाधिश भूषण गवई यांच्या पुढाकाराने कोल्हापुरात १८ ऑगस्ट पासून सर्किट बेंचचे कामकाज सुरू झाले. कोल्हापूर सर्किट बेंच स्थापनेला ॲड. रणजित निंबाळकर यांनी विरोध करून सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. कोल्हापूर सर्किट बेंचची स्थापना चुकीची असल्याचे त्यांचे म्हणणे होते. त्यामुळे हे सर्किट बेंच रद्द करून पुन्हा मुंबईतूनच कामकाज केले जावे, असे त्यांनी याचिकेत म्हटले होते. आता सर्किट बेंचचे खंडपीठात रुपांतर होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कोल्हापूरसह सहा जिल्ह्यतील वकीलांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.


## तातडीने पाहिजेत

सोलापूरसह पश्चिम महाराष्ट्र आणि मराठवाड्यासह महाराष्ट्रातील लोकप्रिय दैनिक सोलापूर तरुण भारतमध्ये तातडीने खालील पदांची भरती करावयाची आहे.

१) बातमीदार ४ पदे
२) क्राईम रिपोर्टर १ पद

दैनिकातील कामाचा किमान एक वर्ष अनुभव आवश्यक आहे. संगणकावर स्वतंत्रपणे काम करता येणे आवश्यक आहे. आकर्षक पगार. इच्छुकांनी ७ दिवसांत अर्जासह कार्यालयात समक्ष भेटावे.

**संपर्क : ९८८११९१४४३**

पत्ता- १९/२०, दैनिक तरुण भारत कार्यालय, होटगी रोड, सोलापूर.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### ब्रेन अँड डिझाईन एक्सपो २०२५ अंतर्गत टेस्टमध्ये वालचंद कनिष्ठ महाविद्यालयाचे यश

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर येथे ब्रेन अँड डिझाईन एक्सपो २०२५ या कार्यक्रमांतर्गत अकरावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी टेस्ट घेण्यात आली. या स्पर्धेत विविध महाविद्यालयांतील एकूण ११८ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला होता. स्पर्धा दोन फेऱ्यांमध्ये पार पडली.या स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अँड सायन्स, सोलापूर (कनिष्ठ विभाग) येथील एकूण १६ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. उत्कृष्ट कामगिरी करत कुमारी प्रणोती जत्ते हिने प्रथम पारितोषिक, तर कुमारी शुभांगी ढाले हिने द्वितीय पारितोषिक पटकावले. स्पर्धेत सहभागी सर्व विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य श्री अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे, डॉ. राव सर, समन्वयिका सारिका महिंद्रकर तसेच मार्गदर्शक शिक्षक श्री प्रसाद जोशी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### महापालिका आरोग्य निरीक्षक संघटनेने जपली सामाजिक बांधिलकी

**सोलापूर, दि १८ डिसेंबर-**

महापालिकेतील दिवंगत आरोग्य निरीक्षकाच्या कुटुंबीयांना उपचारासाठी ६१ हजार रुपयांची आर्थिक मदत महापालिका आरोग्य निरीक्षक संघटनेच्या वतीने देण्यात आली. कुटुंबियांचे विचारपूस करून आधार देण्यात आला. महापालिकेत आरोग्य निरीक्षक या पदावर कार्यरत असताना सय्यद यांचे दोन वर्षापूर्वी निधन झाले. त्यानंतर त्यांच्या कुटुंबीयांची परिस्थिती बिकट झाली. त्यातच एका मुलीवर उपचार सुरू असून डॉक्टरांनी त्यासाठी सुमारे दोन लाख रुपये खर्च सांगितला होता. ही माहिती समजताच महापालिका आरोग्य निरीक्षक संघटनेने मुख्य सफाई अधीक्षक नागनाथ बिराजदार आणि वाहन व परवाना विभाग प्रमुख नागेश मेंडगुळे यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वांनी ६१ हजार १२१ रुपये जमा केले. गुलबर्गा येथे हॉस्पिटलमध्ये जाऊन आरोग्य निरीक्षक संघटनेचे अध्यक्ष शेषराव शिरसठ, उपाध्यक्ष जितू मोरे, सचिव विठोबा शिंदीबंदे, कार्याध्यक्ष सुनील राठोड, सहसचिव हमीद हिरोली, मार्गदर्शक अमोल कांबळे, रिजवान पटेल यांनी ही रक्कम कुटुंबीयास सुपूर्द केली.



### इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर हार्मनीद्वारा मोफत कर्करोग प्रतिबंध लसीकरण मोहीम

**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

इनरव्हील क्लब ऑफ सोलापूर हार्मनीद्वारा मोफत कर्करोग प्रतिबंधक लसीकरण मोहीमेचे आयोजन करण्यात आले होते. हे लसीकरण ९ ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना दिले जाते. त्याचे दोन डोस असतात, पहिला डोस दिल्यावर सहा महिन्यांनी दुसरा डोस दिला जातो. १४ ते २६ वयोगटातील मुलींना तीन डोस द्यावे लागतात. या लसीकरणाबद्दल जागृती खूप कमी आहे. याप्रसंगी क्लबच्या अध्यक्षा किशोरी राठी, सचिवा आशा सेठिया, अनुराधा चांडक, वंदना राठी, नेहा राठी, लक्ष्मी चव्हाण उपस्थित होते. मालती प्रभाकर व डॉ. जयंती आडके यांनी या उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

### पान १ वरुन

#### अखेर दिलीप मानेंचा...

यावेळी माजी नगरसेवक जयकुमार माने, नागेश ताकमोगे, पृथ्वीराज माने यांचाही भाजपात प्रवेश झाला. आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर दिलीप माने यांचा प्रवेश भाजपासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. मागील काही दिवसांपासून दिलीप माने यांच्या भाजप प्रवेशाची चर्चा होती. त्या चर्चेला आज पूर्णविराम मिळाला.

#### प्रदेश पातळीवरुन प्रवेशाची...

खासदार, आमदारकीच्या निवडणुका राहिल्या असत्या तर मी त्यांचा प्रवेश मान्य केला असता. कार्यकर्त्यांच्या भावनांची कदर झाली नाही. २००४ पासून मी अशा संकटांना तोंड देत आलो आहे. मी रडणारा नाहीतर लढणारा कार्यकर्ता आहे. मी शरद पवार यांच्याबरोबर लढलो आहे. सोलापुरात, तुळजापुरात मला पक्षाने जबाबदारी दिल्यावर निवडणुकीची लढाई लढलोच आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. परंतु त्यांच्या बोलण्यातून प्रचंड अस्वस्थता जाणवत असल्याचे यावेळी दिसून आले.

**ते कोणतीही उमेदवारी मागणार नाहीत**

प्रदेश पातळीवरील नेत्यांनी मला आवर्जून सांगितले की, माजी आमदार दिलीप माने हे भविष्यात कसलीही उमेदवारी मागणार नाहीत; या अटीवर त्यांचा जाहीर प्रवेश करुन घेतला आहे. यामुळे माझा पक्षनेतृत्वावर विश्वास आहे, असेही आ. सुभाष देशमुख यांनी स्पष्ट केले.

#### अखेर दोषी मंत्री कोकाटेंचा...

कायदे-नियम हे सर्वोच्च स्थानी असून, ते कोणत्याही व्यक्तीपेक्षा सर्वोतोपरी आहेत, या आमच्या पक्षाच्या दीर्घकालीन भूमिकेनुसार हा राजीनामा तत्त्वतः स्वीकारण्यात आला. संवैधानिक प्रक्रियेनुसार पुढील कार्यवाहीसाठी माणिकराव कोकाटे यांचा राजीनामा मुख्यमंत्री यांच्याकडं पाठवण्यात आला आहे. सदनिका घोटाळाप्रकरणी नाशिक जिल्हा न्यायालयानं शिक्षा कायम ठेवल्यानंतर माणिकराव कोकाटे बुधवारी सकाळीच मुंबईतील लिलावती रुग्णालयात दाखल झाले होते. माणिकराव कोकाटे यांना शासकीय कोट्यातील १० टक्के सदनिका गैरव्यवहारप्रकरणी फेब्रुवारीमध्ये नाशिक प्रथम वर्ग न्यायालयानं २ वर्षे कारावास आणि १० हजार दंडाची शिक्षा सुनावली. त्या शिक्षेविरोधात कोकाटे यांनी नाशिक जिल्हा सत्र न्यायालयात धाव घेतली होती. याप्रकरणी कोर्टाने पूर्वीचा नियम कायम ठेवला. दरम्यान, कोकाटे प्रकरणी हायकोर्टात शुक्रवारी सुनावणी होणार आहे. वकील अनिकेत निकम यांनी अपिल करुन तातडीच्या सुनावणीसाठी विनंती केली

# मुंबईसह राज्यात महायुती म्हणून लढण्याचा प्रयत्न : खा. सुनील तटकरे

### अमित साटम नाही; अमित शहा यांच्याशी चर्चा

**तभा वृत्तसेवा । जमीर काझी**
**मुंबई दि. १८ डिसेंबर -**



महायुतीतील सामंजस्य टिकवून मुंबईसह राज्यातील महापालिका निवडणुकींना सामोरे जाण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे, त्यामुळे महायुती म्हणून बोलणी आणि वाटाघाटी यासंदर्भातील निर्णय आज किंवा उद्या होईल,अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांनी गुरुवारी माध्यमांशी बोलताना दिली.

माझी चर्चा देशाचे नेते अमित शहा यांच्याशी झाले असून अमित साटम यांच्या बोलण्यावर मी प्रतिक्रिया देऊ इच्छित नाही, असा टोलाही त्यांनी त्यांना लगावला.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या मुंबईसह राज्यातील विविध महापालिकेतील पदाधिकाऱ्यांची पक्षाच्या परिस्थितीचा आढावा घेत प्रदेशाध्यक्ष खा. तटकरे यांनी घेतला. तिथल्या पदाधिकाऱ्यांचे मत जाणून घेतले. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना ते म्हणाले, मुंबई महानगरपालिकासहीत इतर महानगरपालिकेत महायुती होण्याबाबत राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार आणि राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल पटेल यांच्याशी रात्री चर्चा करेन आणि पुन्हा याविषयावर चर्चा करुन पुढची पावले महायुतीच्या दृष्टीकोनातून करता येऊ शकते हा प्रयत्न असणार आहे. नवाब मलिक हे आमच्या पक्षातंर्गत निवडणूक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आहेत. त्यांच्या बद्दल मुंबई भाजपाचे अध्यक्ष अमित साटम काय म्हणाले यावर मी प्रतिक्रिया देऊ इच्छित नाही. देशाचे नेते अमित शहा यांच्याजवळ प्रफुल पटेल व मी चर्चा केली आहे. शिवाय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत राष्ट्रीय अध्यक्ष आणि उपमुख्यमंत्री अजितद पवार आणि माझी चर्चा झाली आहे. त्यानंतर दादा मी व प्रफुल पटेल आम्ही सखोल चर्चा केली असली तरी पुन्हा एकदा दादांशी चर्चा करणार आहोत. प्रदेशाध्यक्ष या नात्याने मुंबईसह सगळा विभाग माझ्या अखत्यारीत येतो हेही सुनिल तटकरे यांनी स्पष्ट केले. असे सांगून तटकरे म्हणाले,महायुती म्हणून लढावं हा आमचा प्रयत्न राहिल त्या प्रयत्नाचा भाग म्हणूनच मी कालपासून मुंबईत आहे. शनिवारी यावर सकारात्मक चर्चा करु आणि अंतिम निर्णय जो होईल तो आपल्यासमोर ठेवू असेही त्यांनी सांगितले.

## होटगी मुख्य रोडवरील मतिमंद इसमाच्या मदतीस धावून आले ट्रॅफिक पोलिस

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

होटगी रोड येथे अनेक दिवसापासून रोडचे काम चालू आहे. मोठ्या प्रमाणात रोड अतिशय खराब झाला आहे. मोठ्या प्रमाणात गाड्यांचा वावर असताना येथील वाहतूक व्यवस्था अतिशय धोक्याची आहे.



या रस्त्यावर बिर्ला सिमेंट फॅक्टरी, चट्टीनाड सिमेंट फॅक्टरी, होटगी स्टेशन, आणि मधून येणारे ओव्हरलोड गाडी भरधाव वेगाने जात असतात. वाहतूक सुरळीत व्हावी म्हणून वळसंगचे ट्रॅफिक पोलिस सुनिल राठोड व संजय हलगणे त्याठिकाणी बंदोबस्तला असतात. मोठ्या प्रमाणात गाड्या जात असताना श्री. राठोड यांना एक रस्त्याच्या कडेला एक इसम पडल्याचे निदर्शनात आले चौकशी केली असता तो इसम हा मतिमंद असल्याने रोडच्या अगदी कडेला तो पडून होता. सुनील राठोड, रफिक नदाफ, बसीर शेख, श्री. खतीब यांच्या मदतीने लगेचच त्या इसमाला रफिक नदाफ यांच्या ऑटो रिक्षामध्ये घालून जवळच असलेल्या यल्लमा मंदिर परिसरात घेऊन गेले.

आजच्या या धावपळीच्या धकाधकीच्या जीवनामध्ये माणसातली माणुसकी हरवून गेलेली दिसताना एक प्रामाणिक आणि कर्तव्यदक्ष पोलीस म्हणून वळसंगचे कर्तव्यदक्ष ट्रॅफिक पोलीस यांची स्तुती करावी तितकी कमी आहे. हलगणे आणि राठोड म्हणाले, अडचणीच्या वेळेस माणसाला माणसाणीच मदत केली पाहिजे, हेच खरे मणसाचे कर्तव्य आहे. या कार्यात प्रानिमित्र संस्थेचे अध्यक्ष श्रीकांत बनसोडे यांचे देखील योगदान लाभले.

## श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्ती पूर्णतः सुरक्षित

### भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाचा अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी सादर

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १८ डिसेंबर -**

श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या पवित्र मूर्तींच्या सुरक्षितता व दीर्घकालीन संवर्धनाच्या दृष्टीने श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांच्या वतीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्यानुसार भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनी माहे फेब्रुवारी २०२५मध्ये श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींची प्रत्यक्ष पाहणी करून अहवाल सादर केला.

भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाकडून प्राप्त झालेल्या या अहवालास श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीची मंजुरी घेऊन, पुढील कार्यवाहीसाठी हा अहवाल शासनाकडे मंजुरीसाठी सादर करण्यात आल्याची माहिती मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली. सन २०२०मध्ये भारतीय पुरातत्त्व विभागामार्फत श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेच्या मूर्तींवर वज्रलेपाची संवर्धन प्रक्रिया करण्यात आलेली असून, सध्या दोन्ही मूर्ती पूर्णतः सुरक्षित स्थितीत आहेत. तथापि, भविष्यात मूर्तींची कोणतीही झीज अथवा नुकसान होऊ नये, या उद्देशाने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षणाने सुचविलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना शासनाच्या मंजुरीनंतर त्यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणार आहेत. मूर्तींच्या संरक्षण व संवर्धनासाठी शासन, भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण आणि मंदिर समिती यांच्यात समन्वयाने कार्यवाही सुरू असून, भाविकांच्या श्रद्धेच्या दृष्टीने मूर्तींच्या सुरक्षिततेस सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत आहे.



## मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी प्रलोभनात्मक वस्तूंचे वाटप केल्यास कडक कारवाई

### महापालिका निवडणूक पूर्वतयारीसाठी निवडणूक संनियंत्रण समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचारादरम्यान मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी प्रलोभनात्मक वस्तूंच्या वाटप केल्यास कडक कारवाई करण्यात येणार आहे. दरम्यान, निवडणूक निर्णय अधिकारी तथा महापालिका आयुक्त डॉ.सचिन ओम्बासे यांच्या अध्यक्षतेखाली निवडणूक पूर्वतयारीसाठी निवडणूक संनियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली. निवडणूक काळातील विविध विभागांच्या जबाबदाऱ्या व समन्वयाबाबत चर्चा करण्यात आली.

याप्रसंगी पोलिस आयुक्त एम.राजकुमार, पोलिस उपायुक्त विजय कबाडे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ कुलगुरु प्रकाश महानवर, महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, संदीप कारंजे, डॉ.अश्विनी पाटील, उपविभागीय अधिकारी एस.एम. पडदुणे, उपायुक्त आशिष लोकरे, सहायक आयुक्त गिरीष पंडित, पोलीस निरीक्षक वैष्णवी पाटील, महावितरण सहाय्यक कार्यकारी अभियंता प्रदीप मोरे, जीएसटी अधिकारी मनीष एम.एम., आयकर अधिकारी विशालकुमार, नगर सचिव प्रवीण दंतकाळे, बँक ऑफ महाराष्ट्रचे विभागीय व्यवस्थापक संजीव कुमार, राज्य उत्पादन शुल्क विभाग निरीक्षक जगन्नाथ पाटील उपस्थित होते.

आयकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी रोख व बेहिशेबी आर्थिक व्यवहारांवर लक्ष ठेवणे, तपास, शोध व जप्तीची कार्यवाही करणे, निवडणूक खर्च नियंत्रणास सहाय्य करणे व निवडणूक यंत्रणेशी समन्वय साधून अहवाल सादर करणे.विक्रीकर उपायुक्त यांनी बेहिशेबी वस्तू व करचुकवेगिरीवर कारवाई, निवडणूक खर्चाशी संबंधित व्यवहारांवर लक्ष ठेवणे, जप्ती, दंड व तपासाची कार्यवाही तसेच निवडणूक यंत्रणेशी समन्वय व अहवाल. राज्य उत्पादन शुल्क विभागाने दारू वाटप व बेकायदेशीर विक्री रोखणे, परवाना धारकांवर नियंत्रण, जप्ती, गुन्हे नोंद व परवाना संबंधित कारवाई, तसेच निवडणूक यंत्रणेशी समन्वय व अहवाल.शहरतील सर्व बँकानी मोठ्या रोख व्यवहारांवर लक्ष ठेवणे व निवडणूक यंत्रणेशी समन्वय साधून आवश्यक अहवाल सादर करणे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांनी निवडणूक कर्तव्यासाठी आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देणे तसेच निवडणूकविषयक जाहिरात व सहकार्य करावे, असे स्पष्ट करण्यात आले.

पोलिस आयुक्त कार्यालयाच्या जबाबदाऱ्यांवर विशेष भर देण्यात आला. निवडणूक काळात आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करणे, निवडणूक खर्चावर नियंत्रण ठेवणे व आर्थिक बळाचा गैरवापर रोखणे ही पोलीस विभागाची प्रमुख जबाबदारी राहणार आहे.मतदारांवर प्रभाव टाकण्यासाठी रोख रक्कम, दारू, भेटवस्तू तसेच अन्य प्रलोभनात्मक वस्तूंच्या वाटपावर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले. यामध्ये संशयास्पद हालचालींवर नजर ठेवणे, तपास नाके उभारणे, गुन्हे नोंद , जप्तीची कार्यवाही तसेच निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक बंदोबस्त ठेवण्यात येईल तसेच निवडणूकीच्या दरम्यान श्री सिद्धरामेश्वर यात्रा होणार असून महापलिका सोबत समन्वयाने काम करू, अशी माहिती पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी सांगितले.

## कौटुंबिक हिंसाचाराचा खटला दाखल करणाऱ्या महिलेची याचिका फेटाळली

### धाराशिव सत्र न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

पतीसह सासरच्या सर्वांना गुंतवून त्यांच्यावर कौटुंबिक हिंसाचाराच्या खटल्याद्वारे दरमहा तीस हजाराची पोटगी आणि वीस लाखांची नुकसान भरपाई मागणाऱ्या महिलेचा खटला धाराशिवचे न्यायदंडाधिकारी तसेच सत्र न्यायालयाने रद्द केला.



याची हकीगत अशी की, वास्तविक सोलापूर शहरात बाळे भागात राहणाऱ्या एका महिलेने ती तिच्या मुलांसह धाराशिव येथे रहात असल्याचे दाखवून धाराशिव येथील फौजदारी न्यायालयात तिचा सोलापूर येथे राहणारा पती, सासू, सासरे आणि नणंद यांना गुंतवून कौटुंबिक हिंसाचाराचा खटला दाखल केला होता. वरील चौघेही त्या महिलेचा अतोनात कौटुंबिक हिंसाचार करीत जाच हाट व छळ करीत असल्याचे आरोप करून तिला पतीकडून दरमहा तीस हजार रुपयांची पोटगी आणि वरील चौघांकडून वीस लाख रुपये नुकसान भरपाई मिळण्याची मागणी त्या महिलेने या फौजदारी याचिकेद्वारे न्यायालयास केली होती. महिलेचा पती,सासू, सासरे, नणंद यांनी सोलापूर येथील ॲड.आल्हाद अंदोरे आणि ॲड.अथर्व अंदोरे यांचेमार्फत त्या याचिकेस सक्त विरोध केला होता.

पतीसह चौघांची बाजू मांडताना ॲड.अंदोरे यांनी याचिकाकर्ती महिला तिच्या दोन मुलांसह सोलापुरात रहात असल्याचे विविध पुरावे देत कार्यकक्षेबाहेरील न्यायालयास कौटुंबिक हिंसाचाराचा खटला चालविण्याचा अधिकार नसल्याचा, तसेच सोलापूरहून धाराशिवला हेलपाटे पाडून आर्थिक, शारीरिक व मानसिक त्रास देण्याच्या हेतूने खोटी केस केल्याचा युक्तिवाद केला. तो युक्तिवाद ग्राह्य मानून धाराशिव येथील न्यायदंडाधिकारी श्रीमती गवई तसेच अपीलात सत्र न्यायाधीश श्री.पोतदार या दोन्ही न्यायाधिशांनी महिलेची कौटुंबिक हिंसाचाराची याचिका फेटाळली. यात याचिकाकर्त्या महिलेतर्फे ॲड.डी.एन. सोनवणे (धाराशिव) यांनी काम पाहिले. तर माहिलेच्या पती, सासू, सासरे, नणंदतर्फे ॲड. आल्हाद अंदोरे आणि ॲड. अथर्व अंदोरे (सोलापूर) यांनी काम पाहिले.

# राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई

### अवैध मळी वाहतुकीवर व हातभट्टी दारु निर्मिती केंद्रावर कारवाई

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर -**

राज्य उत्पादन शुल्क विभागाने केलेल्या धडक कारवाईत अवैध मळी वाहतुकीवर व हातभट्टी दारु निर्मिती केंद्रावर केलेल्या धडक कारवाईत रूपये १९ लाख ३७ हजार ४३०/- रुपयाचा मुद्देमाल जप्त केला.



राज्य उत्पादन शुल्क विभाग सोलापूर यांची राजेश देशमुख, आयुक्त, महाराष्ट्र राज्य, प्रसाद सुर्वे संचालक (अं व द) मुंबई.व सागर धोमकर साहेब विभागीय उपायुक्त पुणे विभाग याच्या निर्देशानुसार व भाग्यश्री पं. जाधव, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क सोलापूर जे. एन. पाटील प्रभारी उपअधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क सोलापूर यांचे मार्गदर्शनाखाली दि. १६ डिसेंबर २०२५ रोजी निरीक्षक राज्य उत्पादन शुल्क, अ विभाग सोलापूर यांचे कार्यालयास मिळालेल्या खात्रीलायक गुप्त बातमीनुसार पहाटेच्या सुमारास दहिटणे ते बक्षी हिप्परगा रोडवर, दहिटणे हद्दीत, सोलापुर याठिकाणी सापळा लावुन अवैधरित्या मळीची वाहतुक करणारे एक बोलेरो पिकअप चारचाकी वाहन क्र. -१३--६९१० हे मळीसह जप्त करुन निरीक्षक अ विभाग कार्यालयाने गुन्हा नोंद केला आहे.

सदर कारवाईत अवैध हातभट्टी दारु तयार करण्याकरिता वापरण्यात येणारी ४.४८० मे. टन अवैध मळी जप्त करण्यात आली. या कारवाईत ३९,६८०/- रु. किंमतीची मळी व रु.८,००,०००/- किंमतीचे चारचाकी वाहन असा एकुण ८,३९,६८०/- रु. इतका मुद्देमाल हस्तगत करण्यात आला असुन सदर गुन्ह्यातील वाहनाचा चालक हा अंधाराचा फ़ायदा घेवुन पळुन जावुन फरार झाला असुन सदर फरार संशयीत आरोपी विरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास जे. एन. पाटील निरिक्षक अ विभाग सोलापुर हे करत आहेत.

तसेच अवैध हातभट्टी दारु निर्मिती केंद्रावर कारवाई करण्याकामी विभागीय भरारी पथक, रा.उ.शु., पुणे विभाग, पुणे, पोलीस विभागाचे अधिकारी कर्मचारी, महसुल विभागाचे मंडळ अधिकारी, तलाठी, कोतवाल यांचे समवेत सामुहिक मोहिमेचे आयोजन करुन गुळवंची ता. उत्तर सोलापुर व शिवाजीनगर सोलापुर परिसरातील अवैध हातभट्टी दारु निर्मिती केंद्रांवर छापे मारुन सदर ठिकाणे उध्दस्त गुन्हे नोंद करण्यात आले. सदर कारवाईत ११ गुन्हे नोंद करण्यात आले असुन ०५ आरोपींना अटक करण्यात आली आहे. या कारवाईत २७२५० ली. रसायन. ५३५ ली. तयार हातभट्टी दारु असा एकुण रु. १०,९७,७५०/- किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर कारवाई निरीक्षक जे. एन. पाटील, अ. व्ही. घाटगे, आर. एम. चवरे तसेच दुय्यम निरीक्षक समाधान शेळके, सुखदेव सिद, शिवकुमार कांबळे, धनाजी पोवार, सचिन शिंदे, राम निंबाळकर सहाय्यक दुय्यम निरीक्षक संजय चव्हाण, जवान कर्मचारी यांनी पार पाडली.

# भारत-ओमानमध्ये मुक्त व्यापार करार

## ●९८ टक्के निर्यातीला शुल्कमुक्त प्रवेश ●आयुष उत्पादनांना चालना

**मस्कत, १८ डिसेंबर**

भारत आणि ओमानने गुरुवारी मुक्त व्यापार करारावर स्वाक्षरी केली. यामुळे कृषी, वस्त्र, आणि चामडी वस्तूंसह देशातील ९८ टक्के निर्यातीला ओमानमध्ये शुल्कमुक्त प्रवेश मिळेल. दुसरीकडे भारत खजूर, संगमरवर आणि पेट्रोकेमिकलसारख्या ओमानच्या वस्तूंवरील उत्पादन शुल्क कमी करेल. हा करार पुढील आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीपासून लागू होण्याची शक्यता आहे. भारताला त्याच्या सर्वांत मोठ्या निर्यात बाजारपेठ असलेल्या अमेरिकेत ५० टक्के इतक्या मोठ्या शुल्काचा सामना करावा लागत असताना हा करार झाला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत मस्कत येथे वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल आणि ओमानचे वाणिज्य-उद्योग आणि गुंतवणूक प्रोत्साहन मंत्री कैस बिन मोहम्मद अल युसेफ यांनी या करारावर स्वाक्षरी केली. ओमानने आपल्या ९८ टक्क्यांपेक्षा जास्त उत्पादन श्रेणीवर शून्य शुल्क प्रवेशाचा प्रस्ताव दिला आहे. यात भारताच्या ओमानला होणाऱ्या निर्यातीच्या ९९.३८ टक्के भागाचा समावेश आहे. रत्न-दागिने, वस्त्रोद्योग, चामडे, पादत्राणे, क्रीडा साहित्य, प्लॅस्टिक, फर्निचर, कृषी उत्पादने, अभियांत्रिकी उत्पादने, औषधे, वैद्यकीय उपकरणे आणि वाहन क्षेत्रांसह सर्व प्रमुख श्रम-केंद्रित क्षेत्रांना संपूर्ण शुल्क माफी मिळते. यापैकी ९७.९६ टक्के उत्पादन श्रेणींवर तत्काळ शुल्क रद्द करण्याची सवलत दिली जात आहे. दुसरीकडे भारत आपल्या एकूण १२,५५६ शुल्क श्रेणींपैकी ७७.७९ टक्के श्रेणींवर शुल्क उदारीकरण देत आहे. जे मूल्याच्या दृष्टीने ओमानमधून होणाऱ्या भारताच्या ९४.८१ टक्के आयात व्यापते.

ओमानसारख्या निर्यातीच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या आणि भारतासाठी संवेदनशील असलेल्या उत्पादनांसाठी, खजूर, संगमरवर आणि पेट्रोकेमिकल उत्पादनांसारख्या वस्तूंसाठी ही सवलत बहुतांशवेळी टॅरिफ-रेट- कोटा आधारित शुल्क उदारीकरणाच्या स्वरूपात आहे. शेतकरी-एमएमएमई क्षेत्राचे हितरक्षण ओमानसोबतच्या व्यापार करारात भारत सरकारने दुग्धजन्य पदार्थ तसेच चॉकलेट, सोने-चांदी, दागिने, पादत्राणे आणि क्रीडा साहित्य यासारख्या कृषी उत्पादनांसह अनेक क्षेत्रांतील वस्तूंवर कोणतीही शुल्क सवलत न देता देता देशांतर्गत शेतकरी तसेच एमएसएमई क्षेत्राच्या हिताचे संरक्षण केले आहे. मुक्त व्यापार करारात भारताच्या पारंपरिक औषधांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे आखाती देशात आयुष उत्पादनांना मोठी बाजारपेठ मिळेल. व्यापार करारामध्ये भारताच्या पारंपरिक औषधांचा समावेश होण्याची ही पहिलीच वेळ आह



'ऑर्डर ऑफ द ओमान' हा सर्वोच्च पुरस्कार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना प्रदान करताना ओमानचे सुल्तान हैथाम बिन तारिक



### पंतप्रधान मोदींना ओमानचा सर्वोच्च सन्मान

द्विपक्षीय संबंध बळकट करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना गुरुवारी ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक यांनी येथील 'ऑर्डर ऑफ ओमान' या सर्वोच्च नागरी पुरस्काराने सन्मानित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना हा पुरस्कार ओमानच्या त्यांच्या दोन दिवसीय दौऱ्यादरम्यान प्रदान करण्यात आला. जॉर्डन आणि इथियोपियाचा समावेश असलेल्या त्यांच्या तीन देशांच्या दौऱ्याचा हा अंतिम टप्पा होता. नरेंद्र मोदी यांना विदेशात मिळलेल्या २८ पेक्षा जास्त पुरस्कारांत या माध्यमातून आणखी भर पडली आहे. अलिकडेच त्यांना इथियोपियाचा ग्रेटर ऑनर निशान ऑफ इथियोपिया आणि कुवेतच्या ऑर्डर ऑफ मुबारक अल-कबीर सन्मान मिळाला आहे.

# यूसीसी दुरुस्ती, धर्मांतरविरोधी सुधारणा विधेयक परत पाठविले

## राज्यपालांकडून तांत्रिक त्रुटींचे कारण

**◆ डेहराडून, १८ डिसेंबर**

उत्तराखंडमधील पुष्करसिंह धामी सरकारसमोर एक मोठा प्रशासकीय पेच उभा ठाकला आहे. राज्य सरकारने विधानसभेत मंजूर केलेली दोन अत्यंत महत्त्वाची विधेयके धर्मांतर विरोधी (सुधारणा) विधेयक २०२५ आणि समान नागरी संहिता (यूसीसी) दुरुस्ती विधेयक राज्यपाल लेफ्टनंट जनरल गुरमीतसिंग यांनी तांत्रिक त्रुटींचे कारण देत पुन्हा सरकारकडे पाठवली आहेत.

राजभवन सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या विधेयकांच्या मसुद्यात काही तांत्रिक आणि टायपिंगच्या चुका आढळल्या आहेत. विशेषतः धर्मांतर विरोधी विधेयकात जन्मठेपेच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली होती, मात्र त्यातील कायदेशीर भाषेबाबत काही हरकती घेण्यात आल्या आहेत.

राज्यपालांनी या विधेयकांवर स्वाक्षरी करण्यापूर्वी सरकारला या त्रुटी सुधारून नवीन मसुदा सादर करण्यास सांगितले आहे. धामी सरकारने या कायद्यात अत्यंत कडक शिक्षेची तरतूद केली होती. फसवणूक किंवा बळजबरीने धर्मांतर केल्यास दोषीला जन्मठेपेपर्यंतची शिक्षा आणि १० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद करण्यात आली होती. ◀(वृत्तसंस्था)

### आता पुढे काय?

राज्य सरकारने आता हे विधेयक दुरुस्त करण्यासाठी दोन मार्ग निवडले आहेत. एकतर सरकार या त्रुटी सुधारून अध्यादेश काढू शकते किंवा आगामी विधानसभा अधिवेशनात ही विधेयके पुन्हा मंजूर करून राज्यपालांकडे पाठवू शकते. विरोधकांनी मात्र या प्रकरणावरून सरकारवर जोरदार टीका केली असून, घाईघाईत कायदे बनवल्यामुळे ही नामुष्की ओढवल्याचे म्हटले आहे.

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या उद्यापासून परीक्षा

**नाशिक, दि.१९ डिसेंबर-**

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी-२०२५ (टप्पा-३) लेखी परीक्षा २० डिसेंबर २०२५ ते १६ जानेवारी २०२६ या कालावधीत राज्यातील १६६ केंद्रावर होणार आहे. याअंतर्गत पदवी, पदव्युत्तर व विद्यापीठ अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील.

**२० डिसेंबर ते १६ जानेवारी या कालावधीत १६६ केंद्रांवर होणार**

पदवी अभ्यासक्रमात प्रथम ते चतुर्थ वर्ष य् बी.ए.एम.एस. (२०१०,२०१२,२०१७), बी.यु.एम.एस. (न्यू, २०१३,२०१७), बी.एच.एम.एस. (२०१५,), बी.पी.टी.एच. (रिव्हाईज, २०१२), बी.ओ.टी.एच.(रिव्हाईज, २०१५) ए,बी.एस.सी.(नर्सिंग) प्रथम, द्वितीय, तृतीय, चतुर्थ, पाच, सहा, सातवे सेमिस्टर, बी.ए.एस.एल.पी. सर्व सेमिस्टर, बी.पी.ओ. (२०१७) तसेच बी.पी.टी. (सी.बी.ई.एल.पी.) प्रथम वर्षाच्या, बी.डी.एस. द्वितीय, तृतीय व चतुर्थ वर्षच्या, बी.ए.एम.एस. आणि बी.यु.एम.एस. (२०२१) द्वितीय वर्षच्या, बी.एच.एम.एस. (२०२२) द्वितीय वर्षाच्या, बेसिक बी.एस्सी. नर्सिंग आणि पी.बी.बी.एस्सी. सर्व वर्षाच्या तसेच पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्याः एम.डी.होमिओपॅथी तसेच विद्यापीठ संलग्नित विविध अभ्यासक्रमाच्या (बी.पी.एम.टी., एम.एस्सी. फार्मास्युटिकल, एम.पी.एच.(एन.), एम.बी.ए., बी.ऑप्टोमेट्री, डिप्लोमा ऑप्टोमेट्री, डिप्लोमा ऑप्थल्मिक, डिप्लोमा पॅरामेडिकल, पी.जी.डी.एम.एल.टी., सी.सी.एम.पी., एम.एम.एस.पी.सी.) तसेच एम.पी.एच. आणि एम.फील. यांच्या परीक्षा होणार आहेत.

एकूण अंदाजे ८०,८८४ विद्यार्थी संपूर्ण महाराष्ट्रातून प्रविष्ठ होणार आहेत. हिवाळी - २०२४ टप्पा-४, उन्हाळी-२०२५ टप्पा- १ ते ५ व हिवाळी-२०२५ टप्पा-१ व २ मधील अभ्यासक्रमांच्या प्रश्नप्रत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे केंद्रावर पेपर सुरु होण्याआधी पाठविण्यात आल्या होत्या. तसेच ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे उत्तरपत्रिकांचे स्कॅनिंग करुन तपासण्याचे कार्यही यशस्वीरीत्या करण्यात आले होते. याचप्रमाणे हिवाळी-२०२५ टप्पा-३ मधील परीक्षेच्या अभ्यासक्रमांच्या प्रश्नप्रत्रिका ऑनलाईन संगणक प्रणालीद्वारे केंद्रावर परीक्षेच्या दिवशी पाठविण्यात येणार असल्याची माहिती परीक्षा नियंत्रक डॉ. संदीप कडू यांनी दिली. सर्व परीक्षार्थींनी केंद्रावर एक तास आगोदर म्हणजेच सकाळ सत्रासाठी सकाळी ९ वाजता तसेच दुपारच्या सत्रासाठी दुपारी एक वाजता उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

# सुकमामध्ये चकमकीत तीन नक्षलवादी ठार



**◆ सुकमा, १८ डिसेंबर**

छत्तीसगडच्या सुकमा जिल्ह्यात गुरुवारी सुरक्षा दलांसोबत झालेल्या चकमकीत एका महिलेसह तीन नक्षलवादी ठार झाले, अशी माहिती पोलिसांनी दिली.

गोलापल्ली पोलिस ठाण्याच्या हद्दीतील एका जंगलमय टेकडीवर गुरुवारी सकाळी ही चकमक झाली. या भागात नक्षलवादी उपस्थित असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हा राखीव दलाचे एक पथक शोधमोहिमेवर असताना ही चकमक उडाली, असे सुकमाचे पोलिस अधीक्षक किरण चव्हाण यांनी सांगितले.

चकमकीच्या ठिकाणाहून एका महिलेसह तीन नक्षलवाद्यांचे मृतदेह आतापर्यंत ताब्यात घेण्यात आले आहेत, असे ते म्हणाले.

या ताज्या कारवाईमुळे या वर्षी आतापर्यंत छत्तीसगडमध्ये चकमकीत २८४ नक्षलवादी ठार झाले आहेत. त्यापैकी, सुकमा, विजापूर व दंतेवाडा यांसारख्या सात जिल्ह्यांचा समावेश असलेल्या बस्तर विभागात २५५ नक्षलवाद्यांना कंठस्नान घालण्यात आले, तर इतर २७ जण रायपूर विभागात येणाऱ्या गरियाबंद जिल्ह्यात मारले गेले. दुर्ग विभागातील मोहला-मानपूर-अंबागड चौकी जिल्ह्यात दोन नक्षलवादी ठार झाले. ◀(वृत्तसंस्था)

# भारत पराभव विसरणार नाही

## शरीफ बरळले; म्हणे, आम्ही सहा लढाऊ विमाने पाडली

**◆ इस्लामाबाद, १८ डिसेंबर**

पाकिस्तानी सैन्याने कधीही न विसरता येणारा धडा शिकवला आहे. दिल्ली ते मुंबईपर्यंत भारत या पराभवाचे दुःख कधीही विसरणार नाही. मे महिन्यात झालेल्या संघर्षात आम्ही भारतीय वायुदलाची सहा विमाने पाडल्याचा दावा पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी केला.

खैबर पख्तूनख्वा (केपी) मधील हरिपूर विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात स्वतःची पाठ थोपटून घेताना शरीफ म्हणाले, प्रार्थनेमुळेच आम्ही मे महिन्यांत पाकिस्तानचा विजय शक्य झाला. आम्ही भारताची सहा लढाऊ विमाने पाडली, यात राफेलचा समावेश आहे. याशिवाय त्यांचे अनेक ड्रोन हवेतच उधळून लावले. आम्ही पहलगाम हल्ल्याची निष्पक्ष आंतरराष्ट्रीय चौकशीची मागणी केली होती, परंतु भारताने तो प्रस्ताव फेटाळला. भारताचे कट्टरपंथी हिंदुत्व जगासाठी एक गंभीर धोका आहे. भारताने पुन्हा



कारवाईचा प्रयत्न केल्यास विध्वंसाला सामोरे जावे लागेल. पाकिस्तानात होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यासाठी भारत जबाबदार आहे. अफगाणचा वापर पाकिस्तानात हल्ल्यासाठी केला जात आहे. ◀(वृत्तसंस्था)

# शाळेची भिंत कोसळून विद्यार्थ्याचा मृत्यू

**◆ कोरापुट, १८ डिसेंबर**

ओडिशाच्या कोरापुट जिल्ह्यात सरकारी निवासी शाळेची भिंत कोसळल्याने तिसऱ्या वर्गातील एका विद्यार्थ्याचा मृत्यू झाला व दोघे जखमी झाले, अशी माहिती पोलिसांनी गुरुवारी दिली.



ही घटना बुधवारी कोटपाड येथील अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी असलेल्या गांधी नगर आश्रम येथे घडली. मृत विद्यार्थ्याचे नाव प्रेमानंद भात्रा असून तो आठ वर्षांचा होता. जखमी विद्यार्थ्यांना सुरुवातीला उपचारासाठी कोटपाड येथे नेण्यात आले व नंतर जयपूर येथील जिल्हा मुख्यालय रुग्णालयात पाठवण्यात आले. जखमी विद्यार्थ्यांपैकी एकाला प्राथमिक उपचारानंतर सुटी देण्यात आली असून तो वसतिगृहात परतला आहे, तर दुसऱ्या विद्यार्थ्याच्या पायाला दुखापत झाली असून त्याच्यावर जिल्हा मुख्यालय रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही घटना वसतिगृहाच्या आवारात घडली. उद्घाटन फलक असलेली चार फूट उंचीची भिंत अचानक कोसळली. ◀(वृत्तसंस्था)

# घटस्फोटासाठी एक वर्ष वेगळे राहणे आवश्यक नाही

## दिल्ली उच्च न्यायालयाचा निर्वाळा

**◆ नवी दिल्ली, १८ डिसेंबर**

परस्पर संमतीने घटस्फोट घेणाऱ्या पती-पत्नीसाठी एक वर्ष वेगळे राहण्याची अट अनिवार्य नाही, असे दिल्ली उच्च न्यायालयाने म्हटले आहे. हिंदू विवाह अधिनियम (एचएमए), १९५५ अंतर्गत तयार केलेली ही अट योग्य प्रकरणांमध्ये माफ केली जाऊ शकते.

न्यायालयाने पुढे म्हटले की, अशा परिस्थितीत, पती-पत्नीला विवाहाच्या बंधनातून मुक्त करण्याऐवजी, त्यांना चुकीच्या नात्यात अडकवून ठेवणे चुकीचे ठरेल. यामुळे दोघांवर अनावश्यक मानसिक आणि भावनिक ताण येईल. हे स्पष्टीकरण एका खंडपीठाने केलेल्या संदर्भाला प्रतिसाद म्हणून आले, ज्यात कायद्यांतर्गत परस्पर संमतीने घटस्फोटासाठी याचिका दाखल करण्याच्या वेळेच्या मर्यादेवर मार्गदर्शन मागितले होते.

न्यायमूर्ती नवीन चावला, अनुप जयराम भंभानी आणि रेणू भटनागर यांच्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने सांगितले की, हिंदू विवाह कायद्याच्या कलम १३(१) अंतर्गत एक वर्षाच्या कालावधीसाठी वेगळे राहण्याची कायदेशीर अट शिफारस आहे, बंधनकारक नाही. न्यायालयाने विचारले, कोणतेही न्यायालय परस्पर संमतीने घटस्फोट थांबवण्यासाठी सक्ती करू शकते का, ज्यामुळे अनिच्छुक पक्षांना वैवाहिक सुखाऐवजी वैवाहिक खाईत ढकलले जाईल? काही प्रकरणांमध्ये जर विवाह संपुष्टात आणण्यास विलंब झाला, तर पती किंवा पत्नीपैकी एकाला किंवा दोघांनाही पुढे नवीन आणि स्थिर नातेसंबंध निर्माण करण्याची संधी मिळत नाही. यामुळे त्यांच्या पुन्हा लग्न करण्याच्या आणि समाजात सामान्य जीवन जगण्याच्या शक्यतेवर कायमस्वरूपी परिणाम होऊ शकतो. ◀(वृत्तसंस्था)

# शिल्पकलेचा कोहिनूर हरपला



### एक उत्तुंग व्यक्तिमत्व कायमचे हरपल्याचे दुः ख

स्टॅच्यु ऑफ युनिटी पाहण्यासाठी खास गुजरातचा दौरा काढलेला. तेव्हा केवडची वेस ओलांडली की खूप लांबून सरदार बल्लभभाई पटेल यांची जगातील सर्वात उंच मुर्ती मां नर्मदेच्या सान्निध्यात उभी असलेली दिसू लागते. त्याच्या जवळ गेले की, त्यातील भव्यता खास जाणवते. त्यामूर्तीला पाहून अभिमान वाटतो त्याचे आणखी एक मुख्य कारण म्हणजे ती साकारण्यात बहुमुल्य योगदान असलेले ते हात होते जगविख्यात मराठमोळे व्यक्तिमत्व मूर्तीकार रामसुतार यांचे होय. ते आपल्या सर्वांचा निरोप घेऊन अखेरच्या प्रवासावर निघून गेलेत. त्यांनी साकारलेल्या अनेकानेक उत्कृष्ट शिल्पांच्या रूपाने ते अजरामर आहेतच. त्यांनी साकारलेल्या अनेक मूर्तीमुळे त्या संबंधित जागांच्या किर्तीत भर पडलीय. मग संसदेच्या प्रांगणात महात्मा गांधीचा पुतळा असो की संसदेतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असेल अगदी स्टॅच्यु ऑफ हिंदू भूषण हा संभाजी महाराजांचा पुतळाही आहेच. मालवणातील राजकोट इथला शिवराचांचा सर्वात उंच पुतळा. अगदी आवर्जून उल्लेख होतो तो हैद्राबाद येथील रामानूजाचार्यांचा पुतळाही. अनेकानेक भव्य शिल्पसाकारून त्या उंच प्रतिभेच्या व्यक्तिंच्या उंच प्रतिमा अजरामर साकारल्यात. त्यांचे योगदान जागतिक पातळीवरील आहे. ते पाहता आले त्यामुळेच आपल्यातील एक उत्तुंग व्यक्तिमत्व कायमचे हरपल्याचे दुः ख आहे. त्यांच्या आत्म्यास सद्गती लाभो, ही ईश्वर चरणी प्रार्थना.

**- केशव उपाध्ये,**
प्रवक्ते, भाजपा, महाराष्ट्र.



**राम वनजी सुतार यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९२५ रोजी धुळे जिल्ह्यातील गोंडूर या गावात झाला. प्रारंभी त्यांनी श्रीराम कृष्ण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकलेचे धडे घेतले आणि पुढे मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्‌समधून औपचारिक शिक्षण पूर्ण केले. १९५९ साली त्यांनी दिल्लीत माहिती व दूरसंचार मंत्रालयात नोकरी स्वीकारली, मात्र काही वर्षांतच त्यांनी शासकीय सेवा सोडून पूर्णवेळ शिल्पकार म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिल्लीमध्ये स्वतःचा स्टुडिओ उभारून त्यांनी आपल्या कलेचा स्वतंत्र प्रवास सुरू केला.**



### पद्मश्री राम सुतार यांनी घडवलेला इतिहास...



१) स्वातंत्र्यवीर सावरकरांचा अंदमानातील ऐतिहासिक पुतळा स्वातंत्र्याच्या लढ्याची आठवण करून देणारा आहे.



२) बंगळुरू येथील कॅम्पेगौडा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील बंगळुरूचे संस्थापक एनडीदाप्रभू कॅम्पे गौडा यांचा पुतळा.



३) सरदार वल्लभभाई पटेल यांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा जगातील सर्वात उंच पुतळा गुजरातमधील नर्मदा नदीच्या काठाजवळ आहे.



४) ब्रह्मा सरोवर येथे साकारलेला कृष्ण अर्जून रथ स्मारक हा अद्धितीय पुतळा पाहण्यासाठी जगभरातील पर्यटक येत असतात.

### 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'सर्वात भव्य आणि ऐतिहासिक प्रकल्प



**जगातील** सर्वात उंच, १८२ मीटर उंचीचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' हा राम सुतार यांच्या आयुष्यातील सर्वात भव्य आणि ऐतिहासिक प्रकल्प मानला जातो. या शिल्पाच्या संकल्पनेपासून ते डिझाइनपर्यंत संपूर्ण सर्जनशील वाटचाल त्यांनीच केली. सुमारे ६० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ५० हून अधिक भव्य शिल्पांची निर्मिती केली. संसद भवनातील महात्मा गांधी यांची मूर्ती, तसेच तिच्या प्रतिकृती इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया येथे पोहोचल्या. १९५३ साली मेयो गोल्ड मेडल मिळवणारे राम सुतार हे केवळ शिल्पकार नव्हते, तर भारतीय संस्कृतीचे जागतिक प्रतिनिधी होते. त्यांच्या जाण्याने कला क्षेत्राचे अपूरणीय नुकसान झाले असून, त्यांची कलाकृतीच आता त्यांची ओळख जपत राहणार आहे.

### प्रतिक्रिया...

ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्रभूषण, डॉ. राम सुतार यांच्या निधनाचे वृत्त अतिशय दुःखद आहे. त्यांचे पुत्र अनिल सुतार यांना दूरध्वनी करून शोकसंवेदना व्यक्त केल्या आणि त्यांना सांत्वना दिली. रामभाऊंच्या निधनाने जिवंत मूर्ती साकारणारा जागतिक कीर्तीचा एक उमदा कलाकार आपल्यातून निघून गेला. काहीच दिवसांपूर्वी नवी दिल्लीत त्यांच्या निवासस्थानी महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही गेलो होतो. पुरस्कार स्वीकारताना त्यांनी महाराष्ट्र माझा या गीताच्या ओळी उच्चारल्या तेव्हा भारावून गेलो होतो.

**देवेंद्र फडणवीस**, मुख्यमंत्री

आंतराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या निधनाने शिल्पकलेच्या क्षेत्रातील एक महान पर्व आणि शिल्पकलेचा कोहिनूर काळाच्या पडद्याआड गेला आहे. शिल्पकलेतील उत्तुंग व्यक्तिमत्व असलेल्या राम सुतार यांनी आपल्या कलेच्या जोरावर भारतीय संस्कृती आणि महापुरुषांचे विचार जगभर पोहोचवले. वयाच्या १०१ व्या वर्षापर्यंत कलेची साधना करणाऱ्या सुतार यांनी नवीन पिढीतील हजारो कलाकारांना मार्गदर्शन केले.

**-एकनाथ शिंदे**, उपमुख्यमंत्री

ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या निधनामुळे शिल्पकलेच्या क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून या क्षेत्रातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेले आहेत. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. राम सुतार यांनी जगाच्या कानाकोपऱ्यात शेकडो शिल्पे साकारली. त्यांची प्रत्येक शिल्पे अप्रतिम सौंदर्याचा अद्भुत नमुना आहेत. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, सरदार वल्लभभाई पटेल या महामानवांच्या शिल्पातून त्यांनी देशाचा इतिहास जिवंत केला. या महामानवांचे कार्य, विचार सर्वांपर्यंत पोहोचवले.

**अजित पवार**, उपमुख्यमंत्री

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## अग्रलेख...

# असे 'माणिक' नकोच!

संस्कार, चारित्र्य, प्रतिमा, प्रतिष्ठा आदी शब्दांना आपल्या आचारासोबत जोडणे तर दूरच; असे विचारदेखील ज्यांच्या मनात येत नसावेत, असे काही नेते लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात दाखल होतात, हे लोकशाहीचे दुर्दैवच म्हटले पाहिजे. असे लोक आपल्या दुराचारातून आपल्या संस्कारहीनतेचे दर्शन घडवितात आणि आपल्या प्रतिमेचा व प्रतिष्ठेचा आपल्या व्यवहारांशी काहीही संबंध नसावा इतक्या बेफिकिरीने स्वतःचेच वाभाडे काढून घेत स्वहस्ते प्रतिमाभंजन करून घेतात. अशा व्यक्तीस लोकप्रतिनिधी म्हणणे त्यांच्या मतदारांस किती अवघड होत असेल, याची कल्पनादेखील करता येत नाही. वस्तुतः अशा व्यक्तींना नेता ही बिरूदावली कशी प्राप्त होते, हेदेखील एक कोडेच असते. जी व्यक्ती जेव्हा जनतेच्या पसंतीस पात्र ठरते, जनता त्याचे नेतृत्व मान्य करून त्यास स्वीकारते, तेव्हा त्यास नेता म्हणणे अधिक योग्य असते. अलिकडे ही प्रक्रिया उलट्या दिशेने सुरू झालेली दिसते. एखादा राजकीय पक्ष आपल्याच तंबूतील एखाद्या चेहऱ्यावर नेता म्हणून मुखवटा चढवतो, नेता नावाचे पद देऊन कुठे तरी त्याची नियुक्ती करतो आणि ती व्यक्तीदेखील नेता म्हणून मिरवत स्वतःचे नेतेपद समाजाच्या माथी मारते, हा प्रकार राजकारणात रूढच झाला आहे. असे अनेक पक्षनियुक्त नेते राज्यात जनतेचा नेता म्हणून वावरतात आणि जनताही त्यांना नाईलाजाने स्वीकारून त्यांच्या नेतेगिरीवर चढविलेली लोकप्रतिनिधित्वाची झूल सहन करीत असते, असेच चित्र राजरोस पाहावयास मिळते. महाराष्ट्राच्या क्रीडामंत्री पदावरून बाहेरचा रस्ता दाखविले गेलेल्या आणि आपल्या कर्तबगारीशून्य कारकीर्दीमुळे सध्या गाजत असलेल्या माणिकराव कोकाटे नावाच्या मंत्रिमहोदयांना विधिमंडळात पाठविणाऱ्या मतदारांनाही सध्या स्वतःच्या निर्णयाची खंत वाटत असेल. संधी मिळेल तेथून उमेदवारी मिळवून विधिमंडळात स्वतःचा शिरकाव करून घेण्याच्या निव्वळ राजकारणी स्वार्थापलीकडे ज्याचे काहीही उल्लेखनीय कर्तृत्व नाही, असे हे कोकाटे नावाचे 'माणिक' सातत्याने लोकप्रतिनिधी म्हणून निवडताना त्यांच्या कोणत्या कर्तबगारीस मतदारांनी पसंतीची पावती दिली, हा प्रश्नच आहे. नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील एका गावात जन्मलेली, कोणताही राजकीय वारसा नसलेली एक व्यक्ती विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून काँग्रेसशी जोडली जाते आणि निव्वळ निवडणुकीतील उमेदवारीवर डोळा ठेवून पक्षकार्याचा कांगावा करीत राजकारणात बस्तान बसविते. निवडणूक लढविण्याचे स्वप्न काँग्रेसकडून पूर्ण होण्याची शक्यता नाही, असे दिसताच राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा हाती घेऊन शरद पवारांशी संधान साधते; पण तेथेही उमेदवारी नाकारली गेल्याने शिवसेनेत उडी मारून सिन्नर विधानसभेची उमेदवारी मिळवून विधानसभेत दाखल होते. स्वार्थी पक्षांतरे आणि सातत्यपूर्ण 'गयाराम'गिरी एवढाच इतिहास असूनही या मतदारसंघात मतदारांचा कौल मिळवून विधानसभेत पदार्पण केलेल्या कोकाटेंनी दुसऱ्यांदाही शिवसेनेकडून आमदारकी उपभोगली. नंतर नारायण राणे यांचे बोट धरून पुन्हा काँग्रेस प्रवेश करीत आणि स्वगृही परतल्याचा कांगावा करीत उमेदवारी मिळवून तिसऱ्यांदा विधानसभा गाठली आणि चौथ्या वेळी आमदारकीसाठी भाजपाच्या तंबूत दाखल होऊन पराभव झाल्याने पाचवी निवडणूक राष्ट्रवादीच्या चिन्हानिशी लढविली. पुढे अजित पवारांच्या गटाचा आश्रय घेऊन महायुती सरकारात मंत्रिपदही मिळविले आणि आमदारकीच्या प्रदीर्घ काळात 'घर घोटाळ्या' व्यतिरिक्त फारसे काही कर्तृत्व न नोंदविताही केवळ वादग्रस्त व बेमुर्वत वक्तव्यांतून सतत चर्चेत राहिले. पक्षांतराचे इमले चढवत सत्तेची ऊब उपभोगणे एवढेच माणिकराव कोकाटे यांचे एकूण कर्तृत्व लक्षात घेतले, तर त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांनी आणि त्यांना थेट मंत्रिमंडळात दाखल करून घेणाऱ्यांनाही यापुढे अशांवर नेतेपदाची झूल चढवताना आणि मंत्रिपदे बहाल करताना वारंवार विचार करावा, हेच योग्य ठरेल. कोकाटे यांनी आपल्या पूर्वेतिहासातून सत्ताधीश आणि मतदारांनाही दिलेला हा एकमेव चांगला संदेश ठरणार आहे.

आर्य चाणक्य हा राजनीतीचा दीपस्तंभ मानला जातो. आदर्श राजकारण कसे करावे यासाठी चाणक्यनीतीचे मार्गदर्शन घेतले जाते. याच चाणक्यनीतीच्या १६ व्या अध्यायातील एक सुभाषित माणिकराव कोकाटे नावाच्या या मंत्र्याबाबत चपखल वापरता येईल. माणिक हे मौल्यवान असते हे खरेच; पण त्याला आपले मोल मिरविण्यासाठीही सोन्याच्या कोंदणाची गरज असते. अशा अर्थाचे हे सुभाषित म्हणजे माणिकराव कोकाटेंच्या राजकीय कारकीर्दीचे नेमके वर्णन म्हणावे लागेल. माणिक नावाचे हे राजकीय रत्न आपल्या गुणांमुळे नव्हे, तर ज्यांच्या आश्रयाने राजकारणातील आपले मोल प्रस्थापित करीत गेले, त्या सोन्यालाही आता लाजेने काळवंडल्यासारखे वाटेल, असा इतिहास त्यांनी आपल्या कुकर्तृत्वाने निर्माण केला आहे. विधिमंडळाचे कामकाज सुरू असताना माणिकराव कोकाटे नावाची मंत्रिपदावरीलही जबाबदार व्यक्ती मान खाली घालून गुपचूप मोबाईलवर रमीचा डाव खेळते, मंत्री या नात्याने ज्या सरकारचे प्रतिनिधित्व करते, त्याच सरकारची भिकारी म्हणून संभावना करते आणि ज्या शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी काम करण्याची जबाबदारी मंत्री या नात्याने शपथपूर्वक स्वीकारलेली असते, त्याच शेतकऱ्यांना, ढेकळांचे पंचनामे करू का, असा बेमुर्वत सवाल करून आपल्या सत्तेचा माज दाखवून देते. विधिमंडळाच्या सभागृहात रमीचा डाव खेळून सरकारची बेअब्रू केल्यानंतरही खेळाशी संबंधित असलेल्या खात्याचे मंत्रिपद भूषवून पुन्हा सत्तेच्या सान्निध्यात राहण्याचा विक्रम करते, अशा या माणिकरावांच्या दुष्कृत्यांचे घडे अखेरीस भरले. गरीब असल्याचे भासवून बनावट कागदपत्रांच्या आधारे सरकारी कोट्यातून घरे लाटणे हा गुन्हा या कोकाटेंनी केला आहे, यात आता कोणताही संशय राहिलेला नाही. असे भ्रष्ट व्यवहार करून स्वतःच्या कलंकित चारित्र्याचे स्पष्ट पुरावे देणाऱ्या व आपल्या प्रतिमेबरोबरच सत्ताधाऱ्यांच्या प्रतिमेलाही काळे फासणाऱ्या नेत्याला पाठीशी घालण्याचे सारे प्रयत्न फोल ठरणार, हे आधीच स्पष्ट होते. तरीही त्यांचा राजीनामा ताबडतोब म्हणावा असा घेतला गेला नाही. अखेर त्यांची हकालपट्टी झाली हे चांगलेच झाले. कोकाटेंना मंत्रिपदाच्या केबिनमधून इस्पितळमार्गे अखेरीस कोठडी गाठावीच लागणार, हे स्पष्ट झाल्यानंतर त्यांची हकालपट्टी करणे त्यांच्या पाठीराख्यांना अखेर भाग पडले. सरकारी कोट्यातील सदनिका हडपण्यासाठी केलेली बनावटगिरी उघड झाल्याने न्यायालयाने कोकाटे यांना दोषी ठरवून दोन वर्षांची शिक्षा दिली असल्याने आपोआप त्यांची आमदारकी रद्द होणार आहेच; त्यानंतरही त्यांना मंत्रिमंडळात कायम ठेवल्यास सरकारची बेअब्रू झाली असती. मुख्यमंत्र्यांनी सरकारची प्रतिमा राखून पाऊल उचलले हे छानच झाले. याआधी तुरुंगातूनही खात्याचा कारभार हाकणारा नवाब मलिक नावाचा मंत्री महाविकास आघाडीच्या काळात महाराष्ट्राने पाहिला, तेव्हा राज्याची प्रतिष्ठा खुंटीवर टांगली गेली होती. बीड जिल्ह्यातील संतोष देशमुख हत्येप्रकरणी आरोप होऊ लागल्यावर धनंजय मुंडे यांना मंत्रिपदाचा राजीनामा देणे भाग पडले होते. कोकाटे यांची खाती काढून घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या माणिकाभोवती असलेले सोन्याचे कोंदण दूर केले आहे. आता त्याला त्याचे कोणतेच मोल उरलेले नाही. मंत्रिपदाच्या आलिशान केबिनकडून कारागृहातील कोठडीपर्यंतचा प्रवासही आता जवळपास निश्चित झाला आहे. गुन्हा उघडकीस येऊ लागल्यानंतर प्रकृती अस्वास्थ्याचा कांगावा करीत इस्पितळे गाठण्याचा एक राजमार्ग याआधीही काही नेत्यांनी अवलंबिलेला होता. कोकाटेंचा प्रवासही तसाच दिसतो आहे. इस्पितळांतील खर्च कोण करणार हा प्रश्न विचारतानाच, दोष सिद्ध झाल्यावरही अशा लोकांवर सार्वजनिक पैशातून खर्च करावा काय, याचा विचार करायला हवाच. दुसरे म्हणजे, हे माणिक आता मंत्रिमंडळातून आणि विधिमंडळातूनही बाहेर गेल्यानंतर ती जागा भरून काढण्यासाठी नवे रत्न निवडावे लागेल. त्यालाही अशाच प्रकारचा काही इतिहास नाही ना, हे तपासण्याची काळजीही सरकारला घ्यावी लागेल. कारण एखाद्या व्यक्तीच्या चारित्र्यहीनतेमुळे आणि प्रतिमाशून्यतेमुळे सरकारच्या प्रतिमेवर डाग लागणे शोभादायक नाही. त्यामुळे पुढचे 'माणिक' निवडताना सत्ताधाऱ्यांनी काळजी घेणे केव्हाही श्रेयस्कर. असे 'माणिक' नकोच, अशी खूणगाठ बांधायची ती त्यासाठीच.


## विशेष

**अशोक टंडन**

# युगपुरुषाचा आठव

**माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी यांचे माध्यम सल्लागार राहिलेले अशोक टंडन यांनी लिहिलेल्या 'अटल संस्मरण' या पुस्तकाचे विमोचन केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते दिल्ली येथे नुकतेच झाले. त्यानिमित्त टंडन यांनी केलेल्या नोंदींचे हे अंश...**

अटलबिहारी वाजपेयी २७ ऑगस्ट २००० रोजी पंतप्रधान म्हणून पहिल्यांदा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या नागपूर येथील मुख्यालयात गेले होते. ग्वाल्हेरमध्ये १९३९ मध्ये ज्यांनी त्यांना स्वयंसेवक बनवले, असे संघप्रचारक नारायणराव तरटे यांची त्यांनी तेव्हा भेट घेतली होती. अटलबिहारी वाजपेयी यांना माजी पंतप्रधान, कवी आणि राजकारणी म्हणून सर्वजण ओळखतात, पण त्यांचे आत्मिक आणि वैचारिक नाते संघापासूनच सुरू झाले होते. कॉलेजमध्ये असतानापासून त्यांनी संघाच्या शाखेत जायला सुरुवात केली होती आणि तेथूनच त्यांच्या राजकीय आणि सामाजिक जाणिवेचा आरंभ झाला होता. अटलजी आणि संघ यांचे नाते संघटनात्मक असण्याखेरीज सखोल वैचारिक, सांस्कृतिक आणि भावनात्मक अशा स्वरूपाचे होते. अटलजी अनेकदा म्हणायचे की, संघाने मला देश आणि समाजासाठी जगायला शिकवले.



संघाच्या विचारांनी, शिस्तीने आणि राष्ट्रवादाने ते अत्यंत प्रभावित होते. १९५१ मध्ये भारतीय जनसंघाची स्थापना झाली तेव्हा संघाने अटलजींना राजकीय मंचावर संघटनेचा चेहरा बनण्यास सहकार्य केले. त्यावेळी संघाचे दुसरे सरसंघचालक श्रीगुरुजी गोळवलकर होते. श्रीगुरुजी हे विचारवंत, तपस्वी आणि दूरदर्शी नेते मानले जात होते. श्रीगुरुजींच्या व्याख्यानांनी आणि विचारधारेने प्रभावित झालेल्या पिढीतील स्वयंसेवकांमध्ये अटलजींचा समावेश होतो. त्यांनी गुरुजींच्या वाणीतून, जीवनशैलीतून आणि राष्ट्रभक्तीतून प्रेरणा घेतली आणि ती आपल्या राजकीय जीवनात आत्मसात केली. अटलजींनी स्वतः कबूल केले होते की, श्रीगुरुजी हे त्यांच्या वैचारिक संस्कारांचे मूलाधार आहेत.

संघाच्या ज्या स्वयंसेवकांनी पुढे राजकारणात प्रवेश केला, त्यांत अटलजी सर्वांत प्रतिभावान मानले जात होते. श्रीगुरुजींनाही हे स्पष्टपणे माहीत होते. अटलजी आणि श्रीगुरुजी यांच्यातील संबंध मार्गदर्शक-शिष्य या भावाने जोडलेला होता. अटलजी हे श्रीगुरुजींना द्रष्टा, संघ-परंपरेतील ऋषी आणि एक प्रेरणा-पुरुष म्हणून पाहत असत.

१९७३ मध्ये जेव्हा श्रीगुरुजींचे निधन झाले, तेव्हा अटलजींनी त्यांना अत्यंत भावपूर्ण शब्दांत श्रद्धांजली वाहिली होती. ते म्हणाले होते, 'गुरुजी केवळ एका संघटनेचे प्रमुख नव्हते, ते एका विचारधारेचे वाहक, एक युगद्रष्टा आणि एक तपस्वी कर्मयोगी होते. त्यांनी भारतमातेची सेवा हेच जीवनाचे एकमेव उद्दिष्ट बनविले होते.' त्यानंतरच्या सरसंघचालकांशीदेखील अटलजींनी अतिशय आत्मीय असे संबंध ठेवले आणि संघाच्या संस्काराचे स्मरण आयुष्यभर ठेवत देशकार्याला वाहून घेतले.

**अटलजींचा वारसा**

युगपुरुष भारतरत्न अटलबिहारी वाजपेयींची ९३ वर्षांची जीवनलीला १६ ऑगस्ट २०१८ रोजी समाप्त झाली आणि भारताच्या राजकीय क्षितिजावरील अद्वितीय नक्षत्र लुप्त झाले. युगपुरुष अटलजी देशाच्या राजकारणात एक अशी पोकळी सोडून गेले, जी कधीही भरून काढता येणार नाही.

परंतु, अटलजींची विचारशैली ध्रुवतारा बनून विद्यमान आहे. आपणा सर्वांना प्रेरणा देत आहे आणि पुढेही देत राहील. अटलजींनी आपले आदर्श, ओजस्वी वाणी, साहित्यिक वारसा आणि व्यवहारकुशलतेने जवळपास पाच पिढ्यांना प्रेरित केले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली अमित शाह, राजनाथ सिंह आणि अन्य अनेक नेत्यांनी अटलजींच्या अंतिम यात्रेत अनेक किलोमीटर पायी चालून आपल्या दिवंगत नेत्याला श्रद्धांजली वाहिली होती आणि जगाला संदेश दिला होता की, अटलजींचे विचार अमर आहेत.

नवी दिल्ली

## वेध

**अनिल उमाकांत फेकरीकर**

# लहानांच्या हाती वाहन देऊ नका!

मोटार वाहन कायद्यात दुचाकी-चारचाकी चालविण्याचे वय ठरविण्यात आले आहे. तरीही अनेक आई-वडील प्रेमापोटी मुलांच्या हाती वाहन देत संकट ओढवून घेतात. अनेकदा मुलेच पालकांची नजर चुकवून वाहन नेतात. पुढे काय होणार, याचे त्यांना भानही नसते. नागपुरात असाच प्रकार घडला आणि मुलाने केलेल्या कृतीचा भुर्दंड वडिलांना बसला. मुलाने वाहन कायद्याचा भंग केल्याबद्दल पित्याला ३० हजार रुपयांचा दंड भरावा लागला. ही घटना सोनेगाव पोलिस स्टेशन अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२५ रोजी घडली. यातील पिता पोलिसी कारवाईच्या विरोधात न्यायालयात गेला. पण न्यायाधीशांनी पोलिसांची बाजू योग्य असल्याचा निर्वाळा देत पित्याला दंड भरण्याचा आदेश दिला. अखेर हतबल पित्याने पश्चात्ताप व्यक्त करीत ३० हजारांनी खिसा रिकामा करवून घेतला. दंड भरताना वडिलांना मुलाचा राग आला असेल, पण त्या पित्याला पैसे भरावे लागले. अशी वेळ इतर पित्यांवर येऊ नये म्हणून आजच सावध व्हा आणि लहान मुलांच्या हाती चारचाकी, दुचाकी वाहने देऊ नका. त्यांना कायद्यात राहण्याचे फायदे समजावून सांगा. प्रत्येक ठिकाणी कायदा मोडण्याची गरज नसते. आई-वडिलांनी कायदा मोडून मुलांना आपल्याच लोकांविरोधात क्रांतिकारी बनवायची गरज नाही. तो चांगला संस्कारी नागरिक झाला तरी आपले जीवन सार्थकी लागले, याचे समाधान आई-वडिलांनी मानायला हवे. बहुतांश कुटुंबांत वडील कामानिमित्त नेहमीच बाहेर असतात. यामुळे घरात मातृशक्तीचा जागर असतो. समजा मातृशक्तीने आपल्या मुला-मुलींना दररोज घरातून बाहेर पडताना मोटार वाहन कायद्याची माहिती दिली तर नक्कीच आपण अपघातमुक्त शहर तयार करू शकतो. एवढेच नव्हे तर अल्पवयीन मुलेही वाहन नेण्यापूर्वी दहा वेळा विचार करतील. परिणामी कटु प्रसंग संबंधित कुटुंबांवर ओढवणार नाहीत. असाच लोकहितवादी प्रयोग रोडमार्क फाऊंडेशनचे अध्यक्ष राजू वाघ यांनी नागपुरात 'मातृशक्तीचा जागर अपघातमुक्त भारताची वाटचाल' हा उपक्रम सुरू करून केला आहे. ते म्हणतात, जेव्हा आई-वडील मुलांना संस्कार देतात, तेव्हाच त्यांनी वाहन नेमके कुठल्या वयात हाती घ्यायला हवे, हेदेखील समजावून सांगायला हवे. प्रत्येक घरात आईचे महत्त्व आहे. आईचा शब्द शेवटचा मानला जातो. समजा त्या मातृशक्तीने पुढाकार घेत लहान मुलांच्या हाती वाहन द्यायचे नाही, असा नियम अमलात आणल्यास कुठल्याही वडिलांवर दंड भरण्याची नामुष्की ओढवणार नाही. वस्तुतः लहान मुलांनी अर्जुनाप्रमाणे आपल्या ध्येयावर लक्ष द्यायला हवे. जेव्हा मुले समाजहितकारक कार्य करण्याची मनीषा ठेवतील, तेव्हाच त्यांच्या जीवनात प्रगतीचा चमत्कार घडेल. 'मन वढाय वढाय, उभ्या पिकातलं ढोर। किती हाकला हाकला, फिरी येतं पिकांवर।। मन मोकाट मोकाट, त्याले ठायी ठायी वाटा। जशा वाऱ्यानं चालल्या, पानावरच्या लाटा।।' ही बहिणाबाई चौधरी यांची कविता मनाचा ठाव घेणारी आहे. लहान मुलांचे मन असेच असते. त्यांच्या हाती वाहन आल्यावर त्यांच्या कानात वारा घुसतो अन् ते बेभान होतात. आपण वायुवेगाने गेल्याने एखाद्या निष्पाप व्यक्तीचा प्राण जाईल, तो कायमस्वरूपी जायबंदी होईल याची त्यांना भीती वाटत नाही. ते थरार म्हणून वाहन वेगाने चालवितात. नंतर जे नको घडायचे ते घडते अन् सारा मामला पोलिस ठाण्यापर्यंत येऊन पोहोचतो. तिथे दोषीचे कुटुंबीय गयावया करतात. पण वेगाने वाहन चालविणे म्हणजे चंद्रावर जाण्यासारखे नाही. मात्र वयाप्रमाणे मुला-मुलींच्या मनात वेगळा थरार करण्याचा बेत असतो. परंतु मी म्हणतो, मुला-मुलींना थरारच करायचा असेल तर तो अभ्यासात करावा. आसपास राहणाऱ्या लोकांना मदत करून केल्यास उत्तमच होईल. जेव्हा तुमची मुले अशी कृती करतील, तेव्हा तुम्हाला त्यांचा अभिमान वाटेल. पित्याची ५६ इंची छाती अभिमानाने फुगेल आणि मी या मुलाचे वडील, असे ते जगाला निक्षून सांगतील. तो दिवस आपल्याही आयुष्यात यावा असे ज्यांना वाटते, त्यांनी आजपासून लहान मुलांच्या हाती वाहन देणार नाही, असा संकल्प सोडून तशी कृती करावी. अन्यथा, केशाने केले नाऱ्याला ताप यासाठी तयार राहा.



९८८१७१७८५९

## दखल

**मोरेश्वर बडगे**

# कोण होणार मुंबईचा 'धुरंदर?'

महापालिका निवडणुकांचं बिगुल वाजलं आहे. १५ जानेवारीला मतदान आहे आणि त्याच्या दुसऱ्या दिवशी मतमोजणी होऊन निकाल लागतील. २३ डिसेंबरला उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होईल. ३० डिसेंबरपर्यंत ते चालेल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत २ जानेवारी आहे. म्हणजे २ जानेवारीला निवडणुकीचे चित्र स्पष्ट होईल. महायुती विरुद्ध ठाकरे बंधू अशी ही लढाई आहे. काँग्रेस स्वबळावर लढते आहे. एकूण २९ महापालिकांच्या निवडणुका आहेत. पण खरी चुरस मुंबई महापालिकेसाठी आहे. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई महापालिकेचा अर्थसंकल्प ५० हजार कोटी रुपयांपेक्षा मोठा आहे. कुठल्याही राज्याच्या अर्थसंकल्पापेक्षा हा आकडा मोठा आहे. दिल्लीपेक्षा मोठा आहे. त्याशिवाय दरवर्षी केंद्र सरकारकडून विविध योजनांसाठी मिळणारे अनुदान वेगळे. एकूण वर्षाला दीड लाख कोटी रुपयाचे अर्थकारण आहे. मुंबईला सोन्याची कोंबडी म्हणतात ती उगाच नव्हे. सोन्याच्या कोंबडीची ही महापालिका गेली २५ वर्षे शिवसेनेच्या म्हणजे ठाकरे कुटुंबाच्या ताब्यात होती. यावेळी प्रथमच तिच्यापुढे भाजपाचे मोठे आव्हान उभे ठाकले आहे. उद्धव ठाकरे यांच्यासाठी ही अस्तित्वाची लढाई आहे. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत भाजपाशी गद्दारी करून उद्धव शरद पवार यांच्या मांडीवर जाऊन बसले. त्या बदल्यात त्यांनी अडीच वर्षांचे मुख्यमंत्रिपद जरूर मिळविले. पण त्याच्या बदल्यात सर्वस्व गमावले. सरकार गेले, पक्ष गेला, निवडणूक चिन्ह गेले. उद्धव एकदम रिकामे झाले आहेत. वर्षभरापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीत उद्धव यांच्या शिवसेनेनं मार खाल्ला. फक्त २० आमदार निवडून आले. त्यातले १० मुंबईतले आहे. सारे पत्ते उलटे पडले आहेत. आता तर मुंबई महापालिकेच्या रूपाने हाती असलेले 'एटीएम'सुद्धा हातून हिसकले जाण्याची वेळ येऊ घातली आहे. एकनाथ शिंदे यांनी पळविलेली शिवसेना परत मिळवायची असेल तर उद्धव यांना ही निवडणूक कुठल्याही परिस्थितीत जिंकावीच लागेल. मुंबई हरले तर उद्धव ठाकरे संपले. बुडण्याआधीची अखेरची धडपड त्यांनी चालवली आहे.

गाठ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि त्यांच्या एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना यांच्याशी आहे. याआधी २०१७ साली झालेल्या मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपा विरुद्ध शिवसेना असा संघर्ष झाला होता. राज्यात भाजपा आणि शिवसेना युतीचे सरकार असतानाही दोघे एकमेकांविरुद्ध लढले होते. शिवसेना तेव्हा फुटायची होती. शिवसेनेला ८४ तर भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. शिवसेनेने सत्ता राखली होती. फडणवीस यांनी तेव्हा मनात आणले असते तर जुगाड करून मुंबई महापालिकेची सत्ता ताब्यात घेतली असती, पण त्यांनी मोठे मन केले. उद्धव यांना ते समजले नाही. पुढे ते शरद पवारांच्या नादी लागले. पवारांनी उद्धव यांची नाजूक नस हेरली. काँग्रेसला तयार केले. उद्धव, राष्ट्रवादी आणि काँग्रेस अशा विचित्र खिचडीचे सरकार सत्तेत आले.



ते चालणार नव्हतेच. अडीच वर्षात कोसळले. आज उद्धव एकटे आहेत. काँग्रेसने त्यांना सोडले. काँग्रेस स्वबळावर लढते आहे. काँग्रेसवाल्यांना टेन्शन नाही. हरण्याची त्यांना सवय झाली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीची मुंबईत फारशी ताकद नाही. असून नसून सारखे. कुणीच सोबत नाही म्हटल्यावर उद्धव यांना घाम फुटला असणार. शेवटचे शस्त्र म्हणून त्यांनी आपल्या चुलत भावाला म्हणजे राज ठाकरे यांना सोबत घेतले आहे. तब्बल २० वर्षांनंतर दोन ठाकरे एकत्र आले आहेत. मराठी अस्मितेच्या मुद्यावर एकत्र आले आहेत. दोघांच्या राजकीय युतीची चर्चा आहे. उद्धव या युतीसाठी उतावळे आहेत. मात्र, राज ठाकरे यांनी अजून आपले पत्ते उघड केलेले नाहीत. जागावाटप हा दोघांमध्ये कळीचा मुद्दा आहे. राज ठाकरे यांच्या महाराष्ट्र नवनिर्माण सेने म्हणजे मनसेकडे सध्या एकही खासदार, आमदार तर सोडा साधा नगरसेवकही नाही. अशा स्थितीत उद्धव ठाकरे भावासाठी किती जागा सोडणार आणि कोणत्या जागा सोडणार? दोघांमध्ये चर्चेचं गुऱ्हाळ सुरू आहे.

शिवसेनेतील फुटीनंतर तब्बल ४० पेक्षा अधिक माजी नगरसेवक एकनाथ शिंदे यांच्याकडे गेले आहेत. उद्धव यांच्याकडे उरलेल्यातल्या ३० माजी नगरसेवकांच्या जागा राज ठाकरे यांनी मागितल्या आहेत. उद्धव त्या देतील? नाजूक मुद्दा आहे, पण दुसरा मार्ग नाही. कारण परतीचे दोर केव्हाच कापले गेले आहेत. आता हे दोन भाऊ वेगळे लढतो म्हटले तर लोकांना ते आवडणार नाही. त्यांनाही ते कळते. पण वळलेले नाही. पाच दिवसांनी उमेदवारी अर्ज भरायला सुरुवात होत आहे. पुढे प्रचाराला फक्त १३ दिवस मिळणार आहेत. पण ठाकरे बंधूंची कसलीही तयारी नाही. रणनीती नाही. मेहनत घेणार नाही, लोकांकडे जाणार नाही तर मतं मिळणार कशी? 'आपल्याबद्दल मुंबईकरांची खूप सहानुभूती आहे, ठाकरे ब्रँड आपल्याला वाचवेल' असे उद्धव यांना वाटते. लढण्याची इच्छाच राहिली नाही, असे उद्धव यांच्याकडे पाहून वाटते. निवडणुका जिंकायच्या नाहीत, लढण्याचा देखावा मात्र करायचा. निकालानंतर ईव्हीएम, व्होटचोरी, मतदार याद्यांमधला घोळ या नावाने ओरडत सुटायचे. निवडणूक जिंकायचे एक तंत्र असते. संघटन लागते, प्रचार लागतो, घराघरात पोचावं लागतं यापैकी कुठल्याही आघाडीवर ठाकरे सेनेचा थांगपत्ता नाही. मराठी अस्मितेच्या नावावर मतं मागायची आणि राज्यसभेवर अमराठी माणसे पाठवायची हा यांचा मराठी बाणा मराठी माणूस पाहत आला. लोक या ढोंगीपणाला कंटाळले आहेत.

ठाकरे बंधूंच्या तुलनेत महायुतीची तयारी पाहा. भाजपाची सारी तयारी झाली आहे. अखेरचा हात फिरविणे बाकी आहे. फडणवीस यांनी आखलेली रणनीती तर फुलप्रूफ आहे. महायुती म्हणून निवडणूक लढवण्याचे त्यांनी तीन महिन्यांपूर्वीच सांगितलं आहे. एकी होणार नाही तिथे मैत्रीपूर्ण लढती होतील, असे सांगून फडणवीस मोकळे झाले. फडणवीस यांचा हा चक्रव्यूह अभेद्य असा आहे. पूर्वी काँग्रेसवाले असेच लढायचे. काँग्रेसमधलेच दोन गट लढायचे. त्यांच्यातलाच एक निवडून यायचा. तिसऱ्याला घुसूच देत नव्हते. फडणवीस यावेळी हाच डाव खेळत आहेत. भाजपा आणि शिंदे सेना एकमेकांशी लढली तरी शेवटी महायुतीच जिंकणार. म्हणजे सीट घरातच. नगरपालिका निवडणुका अशाच रणनीतीतून लढल्या गेल्या. कोकणातल्या कणकवलीचं उदाहरण बोलकं आहे. तेथे राणे बंधू आपसात लढले. निवडणुकीनंतर 'रवींद्र चव्हाण हे माझे मोठे बंधू' म्हणत नीलेश राणे पुढे आले. दोघांच्या लढतीत तिसऱ्याच फायदा होऊ नये म्हणून फडणवीस यांनी हा फॉर्म्युला शोधला आहे.

पुणे, पिंपरी चिंचवड येथे भाजपा आणि अजितदादांची राष्ट्रवादी याच फॉर्म्युल्यात आमनेसामने उतरले आहेत. मुंबईमध्ये उद्धव आणि राज ठाकरे यांची मतं फोडायचे डावपेच फडणवीस यांनी योजिले आहेत. शिंदे सेनेने ४-५ हजार मतं घेतली तरी ठाकरे सेनेच्या १० ते १५ जागा कमी होऊ शकतात. अजितदादांच्या राष्ट्रवादीला वेगळे उभं राहायला सांगितलं आहे. दादांचे उमेदवार ठाकरे बंधूंचीच मतं खातील. कोणता अजेंडा चालेल? ठाकरे बंधूंच्या मराठी अस्मितेचा की भाजपाच्या विकासाचा? मुंबईत मराठी मतदार ३८ टक्के आहे. दुसऱ्या क्रमांकावर मुसलमान २३ टक्के आहेत. विधानसभा निवडणुकीत मुस्लिमांनी ठाकरे सेनेला भरभरून मतं दिली होती. ५० वार्डांमध्ये मुस्लिम मतं निकाल फिरवू शकतात. ठाकरे सेना जिंकली तर एखादा खान महापौर होऊ शकतो, असे भाजपाकडून सांगितले जात आहे.

१७ टक्के उत्तर भारतीय मतदार आहेत. १५ टक्के गुजराती, राजस्थानी आहेत. मुंबईत २२७ जागा आहेत. बहुमतासाठी ११४ नगरसेवक पाहिजेत. गेल्या निवडणुकीत भाजपाला ८२ जागा मिळाल्या होत्या. यावेळी भाजपची तयारी आणि व्यूहरचना पाहता फडणवीस मैदान मारतील. एकूणच मुंबईची निवडणूक अतिशय चुरशीची आणि रोमहर्षक होणार आहे. नुकताच आलेला 'धुरंधर' नावाचा सिनेमा सध्या धुमाकूळ घालतो आहे. मुंबईतही निवडणुकीची धूम आहे. कोण होणार मुंबईचा 'धुरंधर?'

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

### रस्ते, अपघात आणि नागपूरचे औदासीन्य

नुकतीच वृत्तपत्रात बातमी वाचली एका टिप्परने हिट ॲण्ड रन केस मध्ये एका तरुण मुलाला गंभीर जखमी केले. त्यापूर्वी एक बातमी होती, मिहान पुलावर एका वाहनाने एका बुलेटस्वाराला धडक दिली. तो जागेवरच ठार झाला. ठार झालेला अनुज हा तरुण मुलगा आयआयएमचा विद्यार्थी होता. अजून किती बळी घेणार आहेत हे लोक? ही विकृत आणि क्रूर अपराधी मानसिकता आता संपवायलाच हवी. यापूर्वी सुद्धा हिट ॲण्ड रनच्या अपघाताची माहिती व त्यावर लिहिण्यात आले आहे. प्रताप नगरमध्ये मुख्य रहदारीच्या रस्त्यावर एका स्त्रीला उडवून एक कारचालक बेदरकारपणे निघून गेला. पोलिस अजूनही तपासच करतात आहे म्हणे! प्रत्येक चौकात सिग्नल तोडून जाताना दिसतात. मोटारसायकलवर तीन जणांनी जाणे हा हक्कच असल्यागत मुले जातात. अरेरावी करतात. याला कारण प्रत्येक चौक , सिग्नल आणि महत्त्वाच्या जागी पोलिस नसणे. नागपुरात वाहतूक पोलिस नसणे हा फार चिंतेचा विषय आहे. अजूनही नागपूरच्या महत्त्वाच्या रस्त्यांवर, चौकांमध्ये वाहतूक पोलिस नाहीत. विदर्भातील अपघाताच्या ५० टक्के अपघात एकट्या नागपुरात होतात असे वृत्तपत्रातच येते. पोलिसांची कमतरता असेल तर त्यांनी 'जन आक्रोश' वा तत्सम संस्थेची मदत घेऊन एका पोलिसासोबत किमान दोन वाहतूक सेवक घ्यावेत. हा फार गंभीर विषय आहे. आणि हिट ॲण्ड रन केसमधील आरोपी सुटता काम नये. लोकांची सुरक्षितता महत्त्वाची आहे याची जाणीव सरकारने ठेवावी. तसेच लोकांनीही आता सजग होऊन या घटनांकडे केवळ प्रेक्षक म्हणून बघणे योग्य नाही.

**राजेंद्र बेनोडेकर**/८४२२०९९९२५

## वाचक पत्रे

### मुलांचे मन घडवा

बालपण हा मानवी जीवनातील सर्वांत महत्त्वाचा टप्पा आहे. याच काळात व्यक्तिमत्त्वाची बीजे रोवली जातात. मुलांच्या विचारांची दिशा, सवयी, मूल्ये आणि आत्मविश्वास यांचा पाया बालपणातच घातला जातो. म्हणूनच, बालपणातच योग्य संस्कार, शिक्षण आणि भावनिक आधार देऊन आपण मुलांचे यशस्वी तरुण मन घडवू शकतो. आजच्या स्पर्धात्मक युगात केवळ गुणांवर आधारित यश अपुरे ठरते. सर्जनशीलता, निर्णयक्षमता, सकारात्मक दृष्टिकोन आणि आत्मविश्वास हे गुण तितकेच महत्त्वाचे आहेत. हे सर्व गुण मुलांमध्ये अचानक विकसित होत नाहीत; त्यांची सुरुवात लहानपणापासूनच होते. पालक, शिक्षक आणि समाज या तिघांचीही या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका असते.

बालपणात मुलांना प्रेमळ आणि सुरक्षित वातावरण मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अशा वातावरणातच मुले मुक्तपणे विचार करू शकतात, प्रश्न विचारतात आणि नवीन गोष्टी शिकण्याची उत्सुकता ठेवतात. मुलांना केवळ अभ्यासातच नव्हे, तर खेळ, कला, वाचन आणि सामाजिक उपक्रमांत सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन दिले पाहिजे. अपयश आल्यास त्यांना धीर देणे, चुका समजून घेण्यास मदत करणे आणि प्रयत्न करण्याची सवय लावणे हे यशस्वी मन घडवण्याचे महत्त्वाचे टप्पे आहेत.

मुलांमध्ये नैतिक मूल्ये, शिस्त, सहकार्य आणि जबाबदारीची भावना रुजवणे आवश्यक आहे. पालकांनी स्वतः आदर्श वर्तन ठेवले तर मुले त्याचे अनुकरण करतात. बालपणात दिलेले संस्कार, योग्य मार्गदर्शन आणि सकारात्मक अनुभव हे मुलांच्या संपूर्ण आयुष्यावर परिणाम करतात. आत्मविश्वास, कष्ट करण्याची तयारी आणि सकारात्मक विचारसरणी असलेले मूल पुढे जाऊन यशस्वी तरुण बनतो. शेवटी असे म्हणता येईल की, मुलांचे भविष्य घडवायचे असेल तर त्याची सुरुवात बालपणापासूनच करावी लागते. प्रेम, समजूतदारपणा, योग्य शिक्षण आणि प्रेरणा यांच्या साहाय्याने आपण आपल्या मुलांची यशस्वी, सक्षम आणि सुसंस्कृत तरुण मन घडवू शकतो. हेच समाजाच्या आणि राष्ट्राच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**सरोजा बालाजी निलेवार**/७२१८६००८९८

## आजचे संघगीत-७७

शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५

### आई तुझ्याच पायी मजला सुखे मरू दे

आई, तुझ्याच पायी मजला सुखे मरू दे
यश माप हे भरू दे ॥धृ॥

कसली विलोभने ही दिसतील ठायि ठायी
उडवीन ठोकरीने तव साउली असू दे ॥१॥

तव पुत्र कोटि कोटी परि भाग्य ना ललाटी
जाणीव जाळिते ही रजनी तरी जळू दे ॥२॥

निज संपदा घराला येता फिरून तिजला
पद दोन टाकण्याते मम देह हा असू दे ॥३॥

उधळीन प्राण माझे चरणास रक्त ताजे
हसरा मुखेंदु आई मम लोचनी असू दे ॥४॥

समरी ध्वजा चढावी गगनी उषा हसावी
जयनाद होउनीया श्रवणी तुझ्या पडू दे ॥५॥

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# डॉ. रवींद्र तांबोळींनी उलगडले विनोदाचे आत्मपर अंतरंग

## शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेस सोलापूरकरांचा प्रतिसाद



**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**
शालेय जीवनातील गमतीदार प्रसंग, महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाचे रंगतदार किस्से आणि शासकीय नोकरीतील, वैयक्तिक आयुष्यातील गमती जमती सांगत डॉ. रवींद्र तांबोळी (नांदेड) यांनी गुरुवारी विनोदाचे आत्मपर अंतरंग उलगडले. निमित्त होते महाराष्ट्र साहित्य परिषद शाखा सोलापूर आणि शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्ट सोलापूर आयोजित शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेचे.

व्याख्यानमालेच्या दुसऱ्या दिवशी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात डॉ. रवींद्र तांबोळी यांनी विनोदाचे आत्मपर अंतरंग या विषयावर मनोगत व्यक्त करत सोलापूरकरांना पोट धरून हसविले. व्याख्यानमालेचे यंदाचे २९ वे वर्ष आहे. प्रारंभी व्याख्यानमालेच्या दुसऱ्या पुष्पाचे उद्घाटन दीपप्रज्वलनाने झाले. याप्रसंगी व्यासपीठावर मसापाच्या अध्यक्षा डॉ. श्रुतीश्री वडगबाळकर, कार्याध्यक्ष किशोर चंडक, प्रमुख कार्यवाह डॉ. नरेंद्र काटीकर, प्रा. भीमगोंडा पाटील उपस्थित होते. यावेळी मागीलवर्षीच्या व्याख्यानमालेत घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेतील विजेते सुनेत्रा पंडित, रामकृष्ण अघोर, शैलेंद्र पाटील यांचा रोख रक्कम देऊन सत्कार करण्यात आला.

डॉ रवींद्र तांबोळी म्हणाले, हसणे ही मनुष्याला मिळालेली निसर्ग वृत्ती आहे. हसण्यामुळे दुःखावर फुंकर घातली जाते. इतरांवर विनोद करण्यापेक्षा स्वतःवर विनोद करणे हे अधिक वैशिष्ट्यपूर्ण आहे. यावेळी त्यांनी अभिनेत्री नीतू सिंग यांना लिहिलेले पत्र, वडिलांच्या कादंबरीवर निघालेला चित्रपट आदी किस्से ऐकवत सोलापूरकरांचे मनोरंजन केले. तसेच स्वलिखित पुस्तकातील काही भाग वाचून दाखवले.

कवी गोविंद काळे यांनी परिचय करून दिला. मसापचे कार्याध्यक्ष किशोर चंडक यांनी प्रास्ताविक केले. प्रा. भीमगोंडा पाटील यांनी सूत्रसंचालन तर बदीउज्जम्मा बिराजदार यांनी आभार मानले.

### व्याख्यानमालेत आज साहित्यावर अभिवाचन व विवेचनाचा

शेठ लोणकरणजी चंडक स्मृती व्याख्यानमालेत आज (शुक्रवारी) डॉ. वंदना बोकील - कुलकर्णी (पुणे) हे दवणाया विद्याधर पुंडलिक यांच्या साहित्यावर अभिवाचन व विवेचनाचा कार्यक्रम सादर करणार आहेत. सोलापूरकरांनी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात सायंकाळी ठीक ६ वाजता उपस्थित रहावे, असे आवाहन शेठ लोणकरणजी जगन्नाथजी चंडक ट्रस्टचे कार्यवाह किशोर चंडक यांनी केले आहे.

महत्वाचे...



## महावीर हायस्कूलमध्ये रक्तदान शिबिर व आनंद मेळावा संपन्न

**सोलापूर दि. १८ डिसेंबर-**
होटगी रोड विकास नगर येथील महावीर हायस्कूल मध्ये प. पु. गुरुदेव१०८ श्री समंतभद्र महाराज यांच्या जयंतीनिमित्त ३७ वे रक्तदान शिबिर संपन्न झाले. यानिमित्त प्रशालेत रांगोळी स्पर्धा, मेहंदी स्पर्धांचे आयोजन केले होते. त्याचबरोबर शाला बाह्य स्पर्धेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचाही भेटवस्तू व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. आनंद मेळाव्यात विद्यार्थ्यांनी विविध स्टॉल लावले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापिका सौ पाटील तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. शशिकांत मल्लाडे उपस्थित होते. रक्तदान शिबिरात ३६ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवला. कार्यक्रमाचे सूत्र संचालन श्री बसवराज बिराजदार यांनी केले.



## मल्लप्पा पुल्ली यांची पुण्यतिथी साजरी

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**
पद्मशाली शिक्षण संस्था संचलित सौ. भू. म. पुल्ली कन्या प्रशालेत थोर स्वातंत्र्यसैनिक कै. मल्लप्पा पुल्ली यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. अध्यक्षस्थानी पद्मशाली शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. श्रीनिवास कोंडी हे होते. याप्रसंगी देणगीदार रामदास पुल्ली हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात कै. मल्लप्पा पुल्ली यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. या वेळी व्यासपीठावर सौ.भू.म.पुल्ली कन्या प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्या गीता सादुल, उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल, उपमुख्याध्यापक तुकाराम श्रीराम, पर्यवेक्षक परमेश्वर बाबळसुरे व अधीक्षक अंबादास रच्चा हे उपस्थित होते. देणगीदार पुल्ली यांच्या हस्ते गरीब व होतकरू विद्यार्थिनींना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. उपप्राचार्य बाळकृष्ण गोटीपामुल यांनी आभार मानले.

## एस.टी. स्टॅन्डवर वृध्द महिलेचे मंगळसूत्र लंपास, अज्ञात महिलेविरुद्ध गुन्हा

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर**
येथील एस.टी. स्टॅन्ड परिसरात गर्दीचा फायदा घेत एका अज्ञात महिलेने ६० वर्षीय वृद्ध महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सिंधु भारत डोईफोडे वय ६०, रा. हिरेमठ हॉस्पिटल जवळ, बार्शी, सोलापूर दि. १६ डिसेंबर रोजी सायंकाळी ४.१० वाजण्याच्या सुमारास एस.टी. स्टॅन्ड सोलापूर येथून बार्शीकडे जाणाऱ्या बसमध्ये चढत असताना या गर्दीचा फायदा घेत करड्या रंगाची साडी परिधान केलेल्या एका अज्ञात महिलेने फिर्यादीच्या गळ्यातील सुमारे २.५ ग्रॅम वजनाचे व अंदाजे २५ हजार रुपये किंमतीचे सोन्याचे मणी मंगळसूत्र चोरून नेले.

घटनेची माहिती मिळताच फिर्यादी यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. अज्ञात चोरट्या महिलेविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा तपास पोलीस हवालदार परीट हे करीत आहेत.


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**उत्पादन आणि पुरवठा कार्य**

विभागीय स्टोअर ऑफिस सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. निविदा क्रमांक SUR/SR.DMM/T.NO. 96255648, तारीख: 17.12.2025. वर्णन: ड्रॅग क्रमांक -6068 .4 ला (1673 MM ) 60 च्या स्लीपर्ससाठी 6400 ओव्हररायडिंग डेरेलिंग स्विच 1 इन 8.5, /आउटचे उत्पादन आणि पुरवठा नवीनतम बदलांसह आणि स्पेसिफिकेशननुसार. निविदा बंद करण्याच्या प्रत्यक्ष तारखेपर्यंत जारी केलेल्या नवीनतम शुद्धिपत्रासह आयआरएस: टी-10-2025. प्रमाण: 36 संच. बयाणा रक्कम (भारतीय रुपये): रु.218380/- www.ireps.gov.in वर 12.01.2026 रोजी 11:30 नंतर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेत जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धिपत्र लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

वरिष्ठ डीएमएम/एसयूआर
मध्य रेल्वे, सोलापूर
DE/Sur-73
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है


### जाहीर नोटीस

**तमाम लोकांस विशेषतः मौजे वैराग, ता. बार्शी व आसपासचे परिसरातील लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,**

यात आमचे अशिल श्री. भरतेश नवीनचंद गांधी, रा. १३५९, मार्केट गल्ली, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर यांचे आधार कार्ड, पॅन कार्ड, रेशन कार्ड, मतदान कार्ड, मोटार वाहन परवाना यावर भरतेश नवीनचंद गांधी असे नांव नमुद असून, शाळेचे दाखल्यावर भरतेश नितिन गांधी असे नांव नमुद आहे. सदरील सर्व कागदपत्रांवरील व्यक्ती एकच असून, ती आमचे अशिल भरतेश नवीनचंद गांधी हेच आहेत. आमचे अशिल भारतीय नागरिक असून, त्यांना परदेश प्रवासासाठी परवाना (पासपोर्ट) काढणेकरीता सदरील सर्व नावांची व्यक्ती एकच असल्याचे जाहीर नोटीसीने प्रसिध्दीकरण करत आहेत.

तरी, या जाहीर नोटीसीने सर्वांना कळविण्यात येते की, वर नमुद आमचे अशिल श्री. भरतेश नवीनचंद गांधी यांचे नावाबद्दल कोणालाही, कसलीही, कोणतीही हरकत असल्यास विहीत मुदतीत अथवा ०७ दिवसांचे आत लेखी हरकत नोंदवावी. तद्नंतर कोणाचीही, कसलीही व कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

**सबब, ही जाहीर नोटीस दिली असे. दि. १८/१२/२०२५.**

**सही/-**
**ॲड. श्री. राजेश भारत काशीद**
M.A.,M.S.W.,L.L.M
मु.पो. पिंपरी (सा.), ता. बार्शी जि. सोलापूर
मो. नं. ९९२३५५५६८५, ९५५२५७४११०

### सोलापूर महानगरपालिका, सोलापूर

इंद्रभवन डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, रेल्वे लाईन-४१३००३
सोलापूर - सहा. अभियंता- भ.क्रं. ९४२२४५७९२४
Mail Id- smcasstlight@gmail.com

**जाहिर प्रसिध्दीकरण**

सो.म.पा. सार्वत्रिक निवडणूक २०२५-२०२६ करीता मा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं. -१ ते ७ नार्थकोट मैदान व मा. निवडणूक निर्णय अधिकारी क्रं. - १ ते ७ यांचे अंतर्गत मतदान केंद्र व मतमोजणी केंद्र या ठिकाणी तात्पुरत्या स्वरुपात विद्युत व स्पिकर व्यवस्थत्त करणे कामी सो.म.पा. संकेतस्थळ वरुन जाहीर प्रसिध्दी करण करण्यात येत आहे. निविदा क्रं. ११५७,११५८,११५९,११६०,११६१,११६२,११६३,११६४

निविदा भरण्याचे अंतिम दि. २०/१२/२०२५ दु. १.०० पर्यंत

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (विद्युत) करिता**
**सोलापूर महानगरपालिका, सोलापूर**

### जाहीर प्रसिध्दीकरण

स्पे.मु. नं. १३५/२०२४
नि.नि. ११

**बार्शी येथील सि.ज.सि. डी. साहेब यांचे न्यायालयात**

**अक्षय आनंद कुलकर्णी** - **वादी**
**विरुद्ध**
**रागिणी साहेबराव देशमुख** - **प्रतिवादी**

जाहीर प्रसिध्दीकरण सी.पी.सी.आर्डर ५ रूल २० प्रमाणे- यात वादी तर्फे विनंती अर्ज की,

सदर प्रकरणी यातील वादीने प्रतिवादी विरूध्द रक्कम वसुल होवून मिळणेकरीता सदरचा दावा मे. कोर्टात आणलेला आहे. परंतु यातील प्रतिवादीला समन्सची नोटीसची बजावणी केली असता यातील प्रतिवादी हे इथे राहत नाही, असा प्रतिवादीचे आईने सांगितले. तद्नंतर वादीने प्रतिवादीस सि.पी. सी. ऑर्डर ५ रूल १७ प्रमाणे डकवुन समन्सची बजावणी केलीसही सदर प्रतिवादी इथे राहत नाही असा शेरा मारून बेलीफ मार्फत रिपोर्ट दिलेला आहे. यातील प्रतिवादी हे सदर दाव्याच्या नोटीस / समन्स मिळू नये म्हणून वारंवार प्रतिवादीची आई हि जाणून बुजुन खोटी माहिती देत आहे. त्यामुळे वादीला यातील प्रतिवादी यांना नमुद दाव्याच्या नोटीस/समन्स अडचण निर्माण होवून सदरचा दावा पुढे चालविणेस कायद्याने बाधा येत आहे. तरी यातील प्रतिवादी यांना सदर प्रकरणाची नोटीस पोहच होणे आवश्यक आहे.

त्याअर्थी तुम्ही सामनेवाले हिने सदर अर्जाच्या कामी सदर जाहीर समन्स / नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अगर सदर प्रकरणाची पुढील नेमलेली तारीख ०३/०१/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता मे. कोर्टात या अर्जाच्या कामी स्वतः अगर वकीलामार्फत हजर राहुन व आपला पत्ता मेमो दाखल करुन तुमचे म्हणणे या कामी दाखल करावे. तुम्ही सदर अर्जाचे कामी नेमलेल्या तारखेस हजर न राहिल्यास अगर तुमचे म्हणणे दाखल न केल्यास तुमचे काहीही म्हणणे नाही असे मे. कोर्टाचे तुमच्या विरुध्द एकतर्फा आदेश होतील. मागुन तक्रार चालणार नाही. कळावे हे जाहिर समन्स/नोटीस मे. कोर्टाच्या सही शिक्क्यानिशी दिले. दि. १०/१२/२०२५

**सही/-** **क.लिपीक** | शिक्का | **सही/-** **सहाय्यक अधिक्षक** **दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर बार्शी, ता. बार्शी, जि. सोलापूर**

### मे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, उत्तर सोलापुर, सोलापूर यांचे समोर

**सोलापुर जिल्हा महसुल कर्मचारी सहकारी पतसंस्था नियमित सोलापुर**
सिटी सर्व्हे नं. ८४१३, दुसरा मजला, जुने जिल्हाधिकारी आवार, सोलापुर ४१३००३

जा क्र./उप/६५६/२०२५ — दि. १८-१२-२०२५

**लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापुर** -- **अर्जदार**
**विरूध्द**
**(खालील तपशिलातील नमुद केलेले थकबाकीदार सभासद)** -- **जाब देणार**

| अ. क्र. | दावा क्र. | दावा रक्कम | प्रतिवादी नंबर | प्रतिवादीचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|
| १ | ९९३/२०२५ | १,९७,३४३/- | १ | १. श्री. माचन भास्कर भैरवनाथ रा.मु पो. ६१३/२/अ गोदुताई विडी घरकुल कुंभारी रोड २ नं. पाणीटाकी जवळ सोलापूर |
| | | | २ | २. श्री. गाजंगी वासुदेव अंबादास रा.मु पो. १३६ विनोबा भावे झोपडपट्टी भद्रावती पेठ सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. कैंचीगुंडी नागेश नरसप्पा रा. मु. पो. ६६९ इंदिरा नगर सोलापूर |
| २ | ९९४/२०२५ | २,६९,७९०/- | २ | २. श्री. धाकडे विजयकुमार माधवराव रा. मु. पो. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर |
| ३ | ९९६/२०२५ | ६,७५,०६०/- | २ | २. श्री. राठोड जगन्नाथ अंबादास रा.मु.पो. एकोंडीवाडी ता. उमरगा जि. धाराशिव |
| ४ | ९९७/२०२५ | ६५,०५१/- | १ | १. श्री. रेणुगुंटा दिपक राजेंद्र रा.मु पो. बी १२४ कुंभारी गोदुताई विडी घरकुल कुंभारी सोलापूर |
| | | | २ | २. श्री. गोसकी रविकुमार जर्नादन रा.मु पो. प्लॉट नं. ८५ गोदुताई विडी घरकुल कुंभारी रोड सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. निली महेश चंद्रकांत रा. मु. पो. प्लॉट नं. ६९ श्रीदेवी नगर नवीन हनुमान मंदीर जवळ एम आय डी सी सोलापूर |
| ५ | ९९८/२०२५ | २,२०,२४५/- | २ | २. श्री. नल्ला नरेंद्र नागेश रा. मु. पो. दत्त मंदिर जवळ ३२३ रविंद्र नगर जवळ शांती नगर जिल्हा न्यायालय सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. अल्ली गणेश रामदास रा. मु. पो. प्लॉट नं. ९४ स्वामी समर्थ विडी घरकुल कुंभारी सोलापूर |
| ६ | १००१/२०२५ | १,०९,६२७/- | ३ | ३. श्री. गवळी विजय रामकृष्ण रा. मु. पो. विरवडे खु ता. मोहोळ जि. सोलापूर |
| ७ | १००२/२०२५ | ७०,७२६/- | १ | १. श्री. मोगरे सचिन मंदिप रा.मु. पो. २७/५ महादेव मंदिर जवळ निराळे वस्ती सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. संगा जयराम कुडलिंक रा.मु.पो. २९०४ विडी घरकुल हैद्राबाद रोड सोलापूर |
| ८ | १००५/२०२५ | ३,३४,०६८/- | १ | १. श्री. येरनाळे राजेंद्र तानाजी व रा.मु. पो. डोणगांव ता.उ. सोलापूर जि. सोलापूर |
| | | | २ | सह कर्जदार सौ उषा तानाजी येरनाळे रा.मु. पो. डोणगांव ता.उ. सोलापूर जि. सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. शेख बिलाल वजीर रा.मु. पो. डोणगांव ता.उ. सोलापूर जि. सोलापूर |
| ९ | १००४/२०२५ | ९५,८५१/- | १ | १. श्री. कोमुल प्रफुल अजय रा. मु.पो. प्लॉट नं. १११५ स्वामी समर्थ विडी घरकुल पो. कुंभारी ता.द. सोलापूर |
| | | | २ | २. श्री. गुत्तीकोंडा मनोहर नरसिंह रा. मु. पो. प्लॉट नं. १७/१११ भारतमाता इंदिरा नगर सोलापूर |
| | | | ३ | ३. श्री. सामल शंकर भुमय्या रा.मु. पो. ५५० वी आर इंदिरा नगर झोपडपट्टी सोलापूर |

यात वादी पतसंस्था यांनी दाखल केलेल्या अर्जातील वर नमूद केलेल्या प्रतिवादी यांचे पत्ते उपलब्ध होत नसल्यामुळे/पत्तावर आढळुन येत नसल्याने /अपुरा पत्ता असल्याने सदरचे जाहीर समन्स देणेत येत आहे.

प्रतिवादी यांना जाहीर समन्सद्वारे कळविणे येते की, उपनिर्दिष्ट अर्जासंबंधी आपले म्हणणे मांडणेसाठी स्वतः जातीने अथवा वकिलामार्फत दिनांकः-२९/१२/२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. कागदपत्रासह या कार्यालयात हजर रहावे.

प्रतिवादी यांनी तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास त्यांच्या गैरहजेरीत अर्जाची सुनावणी घेण्यात येईल व पुढील योग्य तो निर्णय केला जाईल.

आज दि. १८/१२/२०२५ रोजी माझी सही व कार्यालयाचे मुदेसह हे जाहीर समन्स दिले आहे

स्थळ -सोलापुर
दि - १८/१२/२०२५
शिक्का
**सही/-**
**(श्री.भवर.द.श)**
**सहाय्यक निंबधक सहकारी संस्था, उत्तर सोलापूर**


**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**विद्युतीकरण काम**

मध्य रेल्वे, सोलापूर येथील वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (TRD) यांनी भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रॅलवेज ई खरेदी वेबसाइट www.Ireps.gov.in वर खालील कामांसाठी प्रतिष्ठित, अनुभवी आणि परवानाधारक विद्युत कंत्राटदारांकडून ऑनलाइन ई-निविदा मागवल्या आहेत. निविदा क्रमांक SUR/TD/T/2025/29R, दिनांक: 17.12.2025. कामाचे नाव: सोलापूर विभागातील वायर नसलेल्या पिट लाईन्स/साइडिंगचे विद्युतीकरण. (पुनर्निमंत्रण). अंदाजे खर्च: रु. 1,53,83,701.79. बोली सुरक्षा: रु. 2,26,900/-. पूर्ण कालावधी: 12 महिने. ऑफरची वैधता. 60 दिवस. वेबसाइटवर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ: 12.01.2026 दुपारी 3:00 वाजता.

**वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता** (TRD),
**मध्य रेल्वे, सोलापूर.**
DE/Sur-70
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**डिजिटल अल्ट्रासोनिक सिंगल वर्क**

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने विभागीय स्टोअर ऑफिस सेंट्रल रेल्वे, सोलापूर खालील कामांसाठी सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. निविदा क्रमांक SUR/SR.DMM/T.NO. 96255333, तारीख: 17.12.2025. वर्णन: डिजिटल अल्ट्रासोनिक सिंगल रेल टेस्टर ज्यामध्ये 9 प्रोब रंगीत सिग्नल आणि सतत रेकॉर्डिंगसह रिअल ए स्कॅन पल्स इको आहे. ठऊझ्ज स्पेसिफिकेशन क्रमांक- MC/NDT/128/2007 (इ-स्कॅन) Rev-IV ऑगस्ट-2021 सह परिशिष्ट-1 (जोडलेले) नुसार प्रत्येक प्रोबच्या इ स्कॅन स्टोरेजसह डेटा सेटअपसह ॲक्सेसरीजची यादी. प्रमाण: 4 बयाणा रक्कम (INR): रु. 109320/-. www.Ireps.gov.in वर 08.01.2026 रोजी 11:30 नंतर निविदा बंद करण्याची तारीख आणि वेळ संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइटला वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे जेणेकरून या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल. वेबसाइट: www.ireps.gov.in

**Sr.DMM/SUR**
**सेंट्रल रॅलवे, सोलापूर.**
DE/Sur-71
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**उत्पादन आणि पुरवठा कार्य**

विभागीय स्टोअर ऑफिस सेंट्रल रेल्वे, सोलापूर भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने रेल्वेच्या ई-प्रोक्योरमेंट वेबसाइट www.ireps.gov.in वर सक्षम, प्रतिष्ठित कंपन्या/कंत्राटदारांकडून खालील कामांसाठी ऑनलाइन ई-निविदा मागवत आहे. निविदा क्रमांक SUR/SR.DMM/T.NO 96255643, तारीख: 17.12.2025. वर्णन: RDSO ड्रॅग क्रमांक T5849 नुसार 60 किलो रॅग्लडसाठी जॉग्ल्ड फिश प्लेट्सचे उत्पादन आणि पुरवठा, जॉग्ल्ड फिश प्लेट्समध्ये (1) RDSO ड्रॅग क्रमांक T-5849-2 क्रमांकांना 4 छिद्रे असलेल्या जॉग्ल्ड फिश प्लेट्स, (II) ड्रॅग क्रमांक T-5849-2 क्रमांकांना 4 छिद्रे असलेल्या जॉग्ल्ड फिश प्लेट्स, (II) ड्रॅग क्रमांक T-5849-2 क्रमांकांना 4 छिद्रे असलेल्या बोल्ट आणि नट्स असतात. क्रमांक टी-11513-4 क्रमांक, (III) सिंगल कॉइल स्प्रिंग वॉशर RDSO DRg क्रमांक T-10773-4 क्रमांक आणि (Iv) स्पेशल वॉशर (50X50 मिमी) आणि रेखाचित्रानुसार 27 मिमी व्यासाचे छिद्र असलेले 10 मिमी जाडीचे - 8 क्रमांक तपशील: फिश प्लेट्स IRS:T-1-2021 (Rev.01) नुसार असाव्यात (निविदा बंद होण्याच्या तारखेपर्यंत नवीनतम बदल आणि सुधारित तपशीलांसह). प्रमाण: 2584 संच. Eamest मनी (INR): रु.267100/-. www.ireps.gov.in वर 14.01.2026 रोजी 11:30 नंतर निविदा बंद होण्याची तारीख आणि वेळ संभाव्य निविदाधारकांना या निविदेसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात घेण्यासाठी निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वारंवार वेबसाइटला भेट देण्याचा सल्ला देण्यात येत आहे. वेबसाइट: www.ireps.gov.in

**Sr.DMM/SUR**
**मध्य रेल्वे, सोलापूर.**
DE/Sur-72
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from "**JAYABEN BHAVANJIBHAI CHAUHAN**" to "**JAYA BHAVANJI CHAUHAN**" for passport issuance."

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from "**KAJAL UMESHKUMAR CHAUHAN**" to "**KAJAL UMESH CHAUHAN**" for passport issuance."

**CHANGE IN NAME**

"I am changing my name from "**UMESHKUMAR BHAVANJIBHAI CHAUHAN**" to "**UMESH BHAVANJI CHAUHAN**" for passport issuance."

**मध्य रेल्वे**
**ई-टेंडर सूचना**

उपमुख्य विद्युत अभियंता/बांधकाम/नियोजन मध्य रेल्वे, ३ मजली, नवीन प्रशासकीय इमारत, डी. एन. रोड, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई - ४०० ००१, भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्या वतीने खालील कामांसाठी प्रतिष्ठित कंत्राटदारांकडून वेबसाइटद्वारे ऑनलाइन खुल्या निविदा मागवत आहेत: ई-टेंडर सूचना क्रमांक एलसी/सीएसएमटी/सीआरपी/पीएमएस/२०२५/०१/आर१ दिनांक-१६.१२.२०२५. कामाचे नाव: मध्य रेल्वेच्या भुसावळ, नागपूर, पुणे, सोलापूर विभाग येथे २×२५ केव्ही टीएसएस/एसएसपी/एसपी बांधकामासाठी प्रकल्प व्यवस्थापन सेवा प्रदान करण्यासाठी प्राधिकरण अभियंता नियुक्त करण्यासाठी प्रस्ताव (आरएफपी) विनंती. अंदाजे निविदा किंमत: रु.२३,३८,००,९६९.०८ (रुपये तेवीस कोटी, अठ्ठावीस लाख, नऊशे एकोणसत्तर आणि आठ पैसे फक्त). बयाणा रक्कम जमा (EMD): रु. १३, १९,०००/- (रुपये तेरा लाख, एकोणीस हजार फक्त). बोलीचा प्रकार: सामान्य निविदा. बोली प्रणाली: दोन पॅकेट प्रणाली. बोलीचा प्रकार: प्रत्येक वेळापत्रकासाठी एकच दर. निविदा दस्तऐवजाची किंमत: शून्य. सेवा पूर्ण करण्याचा अंदाजे कालावधी: ३६ (छत्तीस) महिने पावसाळा समाविष्ट आहे. ऑफरची वैधता: बोली देय तारखेपासून १२० (एकशे वीस) दिवस. वेबसाइट पत्ता: http://www.ireps.gov.in निविदा कागदपत्रांची उपलब्धता: निविदा सूचना आणि निविदा कागदपत्रे वरील वेबसाइटवर पाहता येतील. बोली-पूर्व परिषदेची तारीख आणि वेळ: ०२.०१.२०२६ रोजी १२.०० वाजता. प्रश्न स्वीकारण्याची अंतिम तारीख: ०८.०१.२०२६. निविदा देय तारीख आणि वेळ: ३०.०१.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता. इमारत उघडण्याची तारीख आणि वेळ: ३०.०१.२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता. जर त्या तारखेला सुट्टी जाहीर झाली तर, इमारत/निविदा वर सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या दिवशी त्याच वेळी उघडल्या जातील. कन्सोर्टियम/संयुक्त उपक्रम: परवानगी आहे- ३ सदस्य. वर नमूद केलेल्या कामांसाठी निविदाधारकांसाठी महत्त्वाच्या सूचना: अ) निविदा केवळ ई-निविदा प्रक्रियेद्वारेच भरल्या जातील. सर्व इच्छुक निविदाधारकांना प्रथम वेबसाइटवर नोंदणी करणे आवश्यक आहे. ब) संभाव्य निविदाधारकांना सल्ला देण्यात येतो की त्यांनी इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्यांची ऑफर सादर करण्यापूर्वी, अटी आणि शर्ती, पात्रता निकष इत्यादींबद्दल निविदा तपशीलांचा संदर्भ घ्यावा. क) वेळोवेळी जारी केलेले निविदा दस्तऐवज आणि शुद्धीपत्रक निविदा उघडण्याच्या किमान १५ दिवस आधी या वेबसाइटवर उपलब्ध आहेत आणि ते वेबसाइटवर पाहता येतील. ड) आर्थिक दर पृष्ठावर प्रविष्ट केलेले आणि योग्यरित्या डिजिटल स्वाक्षरी केलेले दर केवळ विचारात घेतले जातील. ई) जोडल्या जाणाऱ्या कागदपत्रांवर निविदाकर्त्याने त्याच्या मुख्य भागावर स्वाक्षरी केली पाहिजे.

DE-752
खतरनाक व विस्फोटक सामान के साथ यात्रा करना दंडनीय अपराध है


### श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर

मुख्य कार्यालय : ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२
फोन -०२१७-२६२२९३४४ / २६२२९३३

**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार स्थावर मालमत्तेचे फेरजाहीर लिलाव व विक्री नोटीसे**

ज्या अर्थी सही करणार, विशेष वसुली व विक्री अधिकारी, श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर हि संस्था महाराष्ट्र कायदा १९६१ अन्वये नोंदणीकृत संस्था असून, त्यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार दिनांक १८/०५/२०२२ रोजी मागणी नोटीस कर्जदार लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा. बालकिसन विष्णुदास मंत्री रा.६, महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर व जामीनदार १. लक्ष्मीकांत विष्णुदास मंत्री रा. ६, महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर २. प्रकाश विष्णुदास मंत्री रा. ६, महावीर मार्केट, फलटण गल्ली, सोलापूर यांना पाठवून रक्कम रुपये १,५६,०९,६७९/- या वर दिनांक ०१/१०/२०२१ पासून पुढे ही सर्व रक्कम परतफेड होईपर्यंत द.सा.द.शे. १४% दराने होणाऱ्या व्याजाची रक्कमची मागणी केलेली होती व आहे. सदर नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून थकबाकीदार यांनी सदर थकीत रक्कम जमा करण्यास कसूर केलेला आहे. तरी बँकेने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ च्या नियम १०७ मधील तरतुदीनुसार पुढील कारवाई करत, सदर स्थावर मिळकतीचे कायदेशीररित्या ताबा घेतलेले आहे. तरी सदर वर नमूद धकीत कर्ज रक्कमेपोटी बँकेने या खाली नमूद केलेले स्थावर मालमत्तेचा जाहीर लिलाव जेथे आहेत व जैसे आहेत अशा त्या त्या मिळकती त्या त्या परीस्थिती मध्ये विक्री करणार आहेत.

**जाहिर लिलाव व विक्री करण्यात येणाऱ्या मालमत्तेचे वर्णन पुढील प्रमाणे असे**

| अ. नं | कर्जदार नांव व पत्ता | डि.सब डि. सोलापुर तालुका दक्षिण सोलापूर येथील मौजे मुस्ती येथील बालकिसन विष्णुदास मंत्री यांच्या मालकी वहिवाटीच्या खालील मिळकती | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | कर्जदार- लक्ष्मीरमण असोसिएटस प्रोप्रा. बालकिसन विष्णुदास मंत्री | मिळकतीचे वर्णन | पूर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस | राखीव किमंत |
| | | गट नं. २२५/१, क्षेत्र ०.३४.०० हे.आर.चौ. मी., आकार ०.१३ | उपलब्ध नाही. | | | | रु. २,५५,०००/- |
| | | २२५/४, क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी., आकार ०.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२६ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | | २२५/५ क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी., आकार ०.३५ | गट नं. २२५/६ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. गट २२५/४ पैकी ची शेतजमीन | गट नं.२२५/२ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | | २२५/६. क्षेत्र ०.८२.०० हे.आर. चौ.मी.. आकार ०.३५ | गट नं. २२७ ची शेतजमीन | गट नं. २२३ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/५ पैकी ची शेतजमीन | गट नं. २२५/५ पैकी ची शेतजमीन | रु. ६,१५,०००/- |
| | लिलावाचे ठिकाण तारीख व वेळ | श्री महावीर अर्बन को-ऑप बँक ली., सोलापूर ६०/६१, पूर्व मंगळवार पेठ, सोलापूर-४१३००२ **बंद लिफाफ्यात निविदा सादर करणेचे दिनांक - २०/०१/२०२६** वेळ - सकाळी ११ ते दुपारी ५ वाजेपर्यंत **निविदा उघडण्याची तारीख व वेळ दिनांक २१/०१/२०२६ सायं. ५:३० वा.** | | | | | |
| | ३१.०३.२०२५ अखेर येणेबाकी | रु.३,७१,७४,५६६/- व त्यापुढे होणारे व्याज, दंड व्याज, सरचार्ज व इतर खर्च | | | | | |

**टिप-**
१. लिलावात भाग घेणार यांनी राखीव किमतीच्या १०% बयाणा रक्कम भरणा केल्याशिवाय लिलावात भाग घेता येणार नाही. बयाणा रक्कम दि.१९/०१/२०२६ दुपारी ३:०० वाजेपर्यंत डिमांड ड्राफ्ट/आर.टी.जी.एस. अथवा पे ऑर्डर ने भरणा करावी.
२. लिलावाच्या अटी व शर्ती लिलावाच्या दिवशी लिलावापूर्वी वाचून दाखविण्यात येईल आणि त्या बँकेच्या सूचना पत्रकामध्ये दिले जातील.
३. लिलावापूर्वी थकबाकीदाराने रक्कम भरल्यास लिलाव रद्द करण्यात येईल,
४. लिलाव मिळकतीसंबंधी अधिक माहिती पाहिजे असल्यास बँकेच्या प्रधान कार्यालयात संपर्क साधावा.

**दिनांक - १८/१२/२०२५**
**स्थळ - सोलापूर**

**सही**
**विशेष वसुली व विकी अधिकारी**
**श्री महावीर अर्बन को ऑप बँक ली, सोलापूर**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## कोपा डेल रेमध्ये रिअल, ॲटलेटिको माद्रिदचे विजय

**माद्रिद :** रिअल माद्रिदने तिसऱ्या श्रेणीतील तालावेराविरुद्धच्या रोमांचक सामन्यात ३-२ असा विजय मिळवून कोपा डेल रे स्पर्धेच्या चौथ्या फेरीत प्रवेश केला. कायलिन एमबाप्पेने ४१व्या मिनिटाला पेनॉल्टी स्पॉटवरून माद्रिदला आघाडी मिळवून दिली आणि त्यानंतर पाहुण्या संघाचा दुसरा गोल घडवून आणला. ७९व्या मिनिटाला नाहूएल अरोयोने तालावेरासाठी एक गोल करून पिछाडी कमी केली.

## सोम्याश्रीच्या भेदक गोलंदाजीमुळे साळुंखे अकादमीची गुलबर्गावर मात

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**



मास्टर्स क्रिकेट अकादमी च्या १२ वर्षीखालील लेदर बॉल क्रिकेट स्पर्धेत सौम्याश्री बारंगुळेच्या (५-३४) भेदक गोलंदाजीमुळे नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमीने गुलबर्गा येथील क्रिकेट किंग्डम वर ३ गडी राखून मात केली. डोणगाव येथील पुष्प अकादमीच्या मैदानावर सुरू असलेल्या या स्पर्धेत गुलबर्गा संघाने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना ४४.३ षटकांत सर्वबाद १२४ धावा केल्या. नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमीकडून सौम्यश्री बारंगुले ३४ धावांत ५ बळी तर समर्थ शिंदे ने २३ धावांत २ बळी टिपले. विजयी लक्ष्य नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमीने २८ षटकांत ७ गडी गमावित गाठले. त्यांच्या समर्थ माळीने नाबाद ५८ धावा केल्या. गुलबर्गाकडून चरण रेड्डीने ४ धावांत २ गडी बाद केले. हा सामना नागेश साळुंखे क्रिकेट अकॅडमी ने ३ गडी राखून हा सामना जिंकले. सामन्यातील सामानावीर पुरस्कार सौम्याश्री बारंगुलेला देण्यात आली

## गौडगावच्या श्रेयस चव्हाणची महाराष्ट्र बेसबॉल संघात निवड

**वैराग, दि. १८ डिसेंबर-**



बार्शी तालुक्यातील गौडगाव येथील श्रेयस चव्हाण याची दिल्ली येथे आयोजित होणाऱ्या 'राष्ट्रीय बेसबॉल स्पर्धासाठी १७ वर्षांखालील महाराष्ट्र संघात निवड झाली. ग्रामीण भागातील एका खेळाडूने थेट राष्ट्रीय स्तरावर मजल मारल्याने संपूर्ण जिल्ह्यातून त्याच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. श्रेयस हा क्रीडाप्रेमी राजाभाऊ चव्हाण यांचा मुलगा असून, त्याने सुरुवातीपासूनच या खेळात प्रचंड मेहनत घेतली आहे. विविध जिल्हा आणि राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये त्याने आपल्या अष्टपैलू कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते. त्याच्या याच सातत्यपूर्ण कामगिरीची दखल घेत निवड समितीने त्याची महाराष्ट्र राज्याच्या संघात निवड केली आहे.

# भारताचे मालिका विजयाचे लक्ष्य

**◆ अहमदाबाद, १८ डिसेंबर**



दक्षिण आफ्रिकेशी दोन हात करण्यास उत्सुक असलेले भारतीय खेळाडू

१९ डिसेंबर रोजी शुक्रवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात पाचवा व निर्णायक पाचवा टी-२० आंतरराष्ट्रीय सामना होणार आहे. सायंकाळी ७ वाजता सामन्याला सुरुवात होईल.

पाच सामन्यांच्या टी-२० मालिकेत भारताने २-१ अशी आघाडी मिळविली आहे, त्यामुळे, हा सामना स्पर्धेतील एक महत्त्वाचा क्षण ठरणार आहे, कारण यजमान संघ मालिका जिंकण्याचा प्रयत्न करेल, तर दक्षिण आफ्रिका आपल्या आशा जिवंत ठेवण्याचे ध्येय ठेवेल. दक्षिण आफ्रिकेला मालिका बरोबरीत सोडविण्याची संधी आहे.

सर्वच विभागांमध्ये शिस्तबद्ध कामगिरी करून वर्चस्व मिळवल्यामुळे भारतीय संघ आत्मविश्वासाने या सामन्यात उतरत आहे. फलंदाजीच्या फळीने लवचिकता आणि खोली दाखवली आहे, खेळाडूंनी महत्त्वाच्या क्षणी चांगली कामगिरी केली आहे, तर गोलंदाजीच्या आक्रमणाने योग्य वेळी बळी मिळवून दबाव कायम ठेवला आहे. संघ व्यवस्थापन आतापर्यंत उपयुक्त ठरलेला समतोल कायम ठेवण्यास उत्सुक असेल, विशेषतः अशा खेळपट्टीवर जिथे फलंदाजीतील सकारात्मक दृष्टिकोनाला यश मिळण्याची अपेक्षा आहे.

लखनौमधील सामन्यात भारतासाठी एक सकारात्मक बाब ही होती की, वैयक्तिक सुटीवर गेलेला जसप्रीत बुमराह संघात परतला होता. तो त्याच्या मूळ गावी अहमदाबादमध्ये खेळण्याची शक्यता आहे, मात्र दुसरा अहमदाबादचा खेळाडू अक्षर पटेल आजारपणामुळे संघाबाहेर झाला आहे. तथापि, शुभमन गिलच्या पायाच्या बोटाला दुखापत झाल्याबद्दल काही बातम्या येत होत्या, ज्यामुळे संजू सॅमसनला खेळण्याची संधी मिळू शकते.

दरम्यान, दक्षिण आफ्रिकेसमोर जिंकणेच आवश्यक अशी परिस्थिती आहे. २-१ ने पिछाडीवर असूनही, पाहुण्या संघाने आपल्या स्फोटक फलंदाजी आणि वेगवान गोलंदाजीच्या जोरावर भारताला आव्हान देण्याची क्षमता दाखवून दिली आहे. अहमदाबादमध्ये त्यांना सातत्य राखण्याची गरज असेल, विशेषतः २० षटकांमध्ये आपल्या योजनांची अंमलबजावणी करण्याच्या बाबतीत आहे. नरेंद्र मोदी स्टेडियम हे सपाट खेळपट्टी व वेगवान आउटफिल्डसाठी ओळखले जाते, त्यामुळे येथे मोठ्या धावसंख्या होण्याची शक्यता असते. तथापि, रात्रीच्या प्रकाशात, जे गोलंदाज आपल्या गतीमध्ये बदल करतील व खेळपट्टीवरील कोणत्याही मदतीचा फायदा घेतील, ते निर्णायक भूमिका बजावू शकतात. मोठ्या संख्येने आणि उत्साही प्रेक्षक गॅलरी भरण्याची अपेक्षा असल्याने, सामन्यातील वातावरणामुळे स्पर्धेत आणखी तीव्रता येईल. ◂(वृत्तसंस्था)

**भारत वि. दक्षिण आफ्रिका पाचवा टी-२० सामना**

**स्थळ :** नरेंद्र मोदी स्टेडियम, अहमदाबाद

**वेळ :** सायंकाळी ७.०० वाजतापासून

**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर



## राज्य व्हॉलिबॉल स्पर्धेत पीएसएफ संघास विजेतेपद

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

विजय उमाकांत राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त झालेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेत येथील पीएसएफ संघाने विजेतेपद पटकाविले. दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुळेगाव तांडा येथे विजय उमाकांत राठोड यांच्या वाढदिवसानिमित्त ही स्पर्धा आयोजित केली होती. यात राज्यातील २० संघानी भाग घेतला होता. अंतिम सामन्यात येथील पीएसएफ संघाने मुळेगाव तांड्याच्या युआर बॉईज संघावर २०-२५, २१-१५ व २३-२५ अशी मात केली. विजेत्या संघास २५ हजार व उपविजेत्यास १५ हजार तर तृतीय बक्षिस मुंबईच्या जेबी बॉईज या संघास ट्रॉफी व रोख रक्कम रु. ७ हजार ५०० रुपये रोख बक्षिस देण्यात आले. विजेत्यांना ट्रॉफी व रोख रक्कम तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष मनोज राठोड, सरपंच विजय उमाकांत राठोड, बोरामणीचे माजी उपसरपंच अंकुश राठोड, कांतु सावकार, राहुल गुरुनाथ पवार, काशिनाथ चव्हाण, मनोज पवार, योगिनाथ पवार, लक्ष्मण राठोड, रामु राठोड, आदीच्या हस्ते देण्यात आले.

# पंचाचार्य प्रशालेत क्रीडा सप्ताह



**अक्कलकोट, दि. १८ डिसेंबर-**

श्रीगुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य हायस्कूल गौडगाव बुद्रुक येथे क्रीडा ज्योत प्रज्वलनाने क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली.

प्रारंभी विद्यार्थ्यांनी क्रीडा ज्योत संचलन करत मैदानात प्रवेश केला. त्यानंतर संस्थेचे प्रतिनिधी योगीराज हिरेमठ यांच्या हस्ते क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले. याप्रसंगी क्रीडा सप्ताहाचे महत्व विशद करत विद्यार्थ्यांना खेळाचे महत्व शिस्त व संघभावना बाबत मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी क्रीडा प्रमुख परमेश्वर व्हसुरे, मुख्याध्यापक कल्याणी देशट्टी, पर्यवेक्षक लाडप्पा शिंदे, क्रीडाशिक्षक भीमाशंकर सोलापूरे आदी उपस्थित होते.

या क्रीडा सप्ताहदरम्यान कबड्डी, खो-खो,धावणे,लिंबू चमचा व संगीत खुर्ची आदी आदी क्रीडा स्पर्धे चे आयोजन करण्यात आले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी एम. व्ही. स्वामी,एस व्ही हिरेमठ, बी.एम. पोतदार, आर. एस. लिंबीतोटे, एस. एम. चोलले, जी. एस. नागशेट्टी, टी. के. जाधव, एस. के. घोडके, पी. व्ही सोनकांबळे, एम. जी. सालीमठ, ए. व्ही. ताराके, के. आर. दानशेट्टी, एस. व्ही. हिंडोळे, एल. एस. चौधरी, आर. एस. चानकोटे, सोनाली साठे व अशोक गुरव यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय जीत कुने डो स्पर्धेत महाराष्ट्रास सर्वसाधारण विजेतेपद

### सोलापूरच्या ६० खेळाडूंचा सहभाग



**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

दिल्लीतील तालकटोरा स्टेडियम येथे झालेल्या ३६ वी राष्ट्रीय जीत कुने डो स्पर्धेत महाराष्ट्राने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. यात असोसिएशन ऑफ जीत कुने डो मार्शल आर्ट स्पोर्ट्स सोलापूरच्या ६० विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन फाईट व काता या दोन्ही प्रकारात प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक संपादिला.

या स्पर्धेसाठी १८ राज्यातून विद्यार्थ्यांचा सहभाग होता. स्पर्धेचे उद्घाटन असोसिएशन ऑफ ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशनचे जनरल सेक्रेटरी ग्रँडमास्टर शंकरलाल गिहारा व दिल्लीतील प्रमुख मान्यवराच्या उपस्थित झाला.

याप्रसंगी सोलापूरचे ग्रॅन्ड मास्टर तथा ऑल इंडिया जीत कुने डो फाउंडेशन चे राष्ट्रीय उपाध्यक्ष युवराज गायकवाड, मागास समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, किर्तीपाल गायकवाड, टेक्निकल डायरेक्टर मास्टर किशोर चंदनशिवे, भास्कर देडे, आनंद जाधव, प्रल्हाद जाधव, सोलापूर जिल्हाप्रमुख अभिजीत गायकवाड, सम्राट गायकवाड, नागेश कांबळे, संदिप गायकवाड, लेडिज कोच वैभवी दळवी, किमया सपाटे, सुमित पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.




## राज्य डॉजबॉल स्पर्धेत व्हॅलेंटाईन स्कूलच्या २८ विद्यार्थ्यांचा सहभाग

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

श्री वटवृक्ष स्वामी समर्थ महाराज अक्कलकोट व सोलापूर जिल्हा डॉजबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने ४ थी सबज्युनिअर व सिनिअर डॉजबॉल अजिंक्यपद स्पर्धा दिनांक अक्कलकोट फत्तेसिंह ग्राउंड झाली. यात व्हॅलेंटाईन सर्कल इंग्लिश मिडीयम स्कूलचे २८ विद्यार्थ्यांनी सहभागी झाले होते.

या विद्यार्थ्यांना सर्टिफिकेट व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच या विद्यार्थ्यांना सोलापूर जिल्हा डॉजबॉल संघटनेचे संचालक व क्रीडा विभाग प्रमुख संतोष पाटील व मोनिका जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष उमाकांत मेंढापूरे उपाध्यक्ष यमुना दिड्डी, सचिव संतोष गड्डम, सहसचिव नागेश शेंडगे, मुख्याध्यापिका जी. एच. कल्याणी, पर्यवेक्षिका सुनिता मंद्रुपकर व नागमणी पेगडा यांनी अभिनंदन केले.

# तुळजापूरच्या शौर्य इलेव्हनला विजेतेपद

### स्व. कृष्णात बोबडे चषक टेनिस क्रिकेट स्पर्धा



**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.१८ डिसेंबर-**

स्व. लोकनेते कृष्णात (दादा) बोबडे यांच्या पाचव्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित केलेल्या टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत तुळजापूरच्या शौर्य इलेव्हन संघाने विजेतेपद पटकाविले. अंतिम सामन्यात त्यांनी टेंभूर्णीच्या मॉर्निंग क्रिकेट क्लबला हरविले.

या स्पर्धेच्या बक्षीस वितरण समारंभात सोलापूर जिल्हा सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघाचे चेअरमन व भाजपा नेते रणजितसिंह बबनराव शिंदे व भाजपचे तालुकाध्यक्ष योगेश बोबडे यांच्या हस्ते विजेत्या व मानकरी संघांना बक्षिसांचे वितरण करण्यात आले. विजेत्याला आकर्षक ट्रॉफीसह रोख १ लाख २३ हजार ३३३ उपविजेत्यास ६१ हजार ३३३ रुपये देण्यात आले. तृतीय यंगर्स बारामती क्रिकेट संघास ३१ हजार ३३३ तर चतुर्थ क्रमांकाचे २१ हजार ३३३ पारितोषिक निमगाव मगर संघास देण्यात आले. तसेच सर्वोत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक आदी खेळाडूंना ट्रॉफी व सायकल देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी टेंभुर्णीच्या सरपंच सुरजाताई बोबडे, उपसरपंच राजश्रीताई नेवसे, स्पर्धेचे आयोजक गौतम कांबळे ग्रामपंचायत सदस्य शहाजी गायकवाड, संदीप देशमुख, रवी कुनाळे यांच्यासह टेंभुर्णी व परिसरातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुदर्शन पाटील यांनी केले

# पुरुष गटात सोलापूरसह मुंबई, पुणे, सांगलीची विजयी सलामी

### ६१व्या राज्य खो-खो अजिंक्यपद स्पर्धा





**तभा वृत्तसेवा,**
**बीड, दि. १८ डिसेंबर-**

महाराष्ट्र खो-खो असोसिएशनच्या मान्यतेने आणि बीड जिल्हा ॲम्युचर खो-खो संघटनेच्या आयोजनाखाली बीड येथील श्रीमंत योगी छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुलात सुरू झालेल्या ६१ व्या पुरुष व महिला राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी बलाढ्य संघांनी विजयी सलामी देत आपली ताकद दाखवून दिली. पुरुष गटात सोलापूर, मुंबई, पुणे, सांगली, मुंबई उपनगर, तर महिला गटात धाराशिव, पुणे, रत्नागिरी संघांनी यशस्वी सुरुवात केली.

सकाळच्या सत्रात सोलापूरने नांदेडचा ४५२० असा पराभव केला. सोलापूरकडून अजित रणदिवे (२.४० मि. संरक्षण व ४ गुण), प्रतीक शिंदे (२.२० मि. संरक्षण व ४ गुण), तर जुबेर शेख (१.१० मि. संरक्षण व तब्बल १० गुण) यांनी जोरदार खेळ केला. मुंबईने हिंगोलीवर ५६८ असा एकतर्फी विजय मिळवला. मुंबईकडून हितेश आग्रे (नाबाद २.२० मि. संरक्षण व ६ गुण), सम्यक जाधव (१.४६ मि. संरक्षण व २ गुण), व वेदांत देसाई (१.५० मि. संरक्षण व ४ गुण) यांची कामगिरी दमदार झाली.

पुण्याने छत्रपती संभाजीनगरचा ५३१८ असा पराभव केला. पुण्याकडून प्रतीक वाईकर (३.२० मि. संरक्षण व २ गुण), शुभम थोरात (२.२० मि. संरक्षण) व अथर्व दहाणे (२.५० मि. संरक्षण) यांची खेळी छान झाली.

ठाणे विरूध्द पालघर सामना मध्यंतराला १५-१५ असा बरोबरीत होता. मात्र त्यानंतर ठाण्याने लौकिकाला साजेसा खेळ करत पालघरचा ४३-२९ असा १४ गुणांनी पराभव केला. ठाण्याकडून हर्षित कोळी (२.३९, २.१० मि. संरक्षण व २ गुण), शुभम डगळे (१.३० मि. संरक्षण व ६ गुण), तर पराभूत पालघरकडून निमेश कलपणे (१.५० मी. संरक्षण व ८ गुण), आकाश मठकर (१.३० व २.१० मि. संरक्षण व २ गुण) यांनी शेवटपर्यंत दमदार लढत दिली.

अहिल्यानगरने जालन्यावर ४५-१२ अशी ३३ गुणांनी मात केली. अहिल्यानगर कडून नरेंद्र तातकडे (३.१० मि. संरक्षण), पृथ्वीराज (२.५० मि. संरक्षण), विशाल दुकळे (नाबाद १.५० मी संरक्षण व ४ गुण) यांची खेळी उत्कृष्ट झाली.

**महिला गटात धाराशिव, पुणे, रत्नागिरीची दमदार सलामी**

महिला गटात धाराशिवने परभणीचा ५७१० असा पराभव केला. धाराशिवकडून जान्हवी पेठे (३.२० मि. संरक्षण व १० गुण), प्रणाली (३.१० मि. संरक्षण व ६ गुण), व संध्या सुरवसे (३.१० मि. संरक्षण व ८ गुण) यांची कामगिरी बहारदार झाली.

पुण्याने सिंधुदुर्गचा ५५१२ असा सहज पराभव केला. पुण्याकडून साक्षी करे (३ मि. संरक्षण व २ गुण), दिपाली राठोड (दोन्ही डावात नाबाद १.३०, २.२० मि. संरक्षण व ८ गुण), भाग्यश्री बडे (२ मि. संरक्षण व १० गुण). तर पराभूत सिंधुदुर्गकडून सानिया पालेकर ( ४ गुण) यांनी धमाकेदार खेळ केला. रत्नागिरीने छत्रपती संभाजीनगरवर ४२१४ अशी मात केली. रत्नागिरीकडून सायली कर्लेकर (२.३० मि. संरक्षण व २ गुण), ऐश्वर्या सावंत (नाबाद दोन्ही डावात २, २ मि. संरक्षण व ४ गुण), वैष्णवी फुटक (८ गुण), अपेक्षा सुतार (२.२० मि. संरक्षण व २ गुण) तर पराभूत संभाजीनगरकडून कोमल भागवत ( १.१० मि. संरक्षण) यांनी दमदार कामगिरीची नोंद केली.

**इतर निकाल : पुरुष गट :** सांगलीने बीडचा ४०२०, मुंबई उपनगरने सिंधुदुर्गचा ४६२२ व धाराशिवने लातूरचा ६७१२ असा दणदणीत पराभव केला.

**महिला :** सांगलीने जळगावचा ४२२ असा दणदणीत पराभव केला, तर सोलापूरने हिंगोलीवर सहज मात केली.




# आर्किड महाविद्यालयास विजेतेपद; सोलापूर विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशिक्षण विद्यापीठ लोणेरे रायगड अंतर्गत सोलापूर विभागीय व्हॉलिबॉल स्पर्धेत येथील एन. के. आर्किड अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या महिला संघाने सलग दुसऱ्यांदा विजेतेपद पटकाविले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट महिला खेळाडू म्हणून महाविद्यालयाची उत्कर्षा पाटीलने उत्कृष्ट स्मॅशरची कामगिरी केली.

लातूर येथे झालेल्या स्पर्धेत या स्पर्धेमध्ये ऑर्किड महाविद्यालयाच्या महिला संघाने सुरुवातीला जी टी एम सी नांदेड, मातोश्री नांदेड, शिवाजी फार्मसी परभणी, ए जे पाटील सोलापूर या संघावर विजय संपादन केला. अंतिम सामन्यात एम.डी.ए. कोळपा लातूर या संघावर विजय मिळविला. या स्पर्धेचे पारितोषिक वितरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे सिनेट व व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा सचिन गायकवाड यांच्या हस्ते संपन्न झाला. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष अंकुश चव्हाण, सचिव विलास पाटील, प्राचार्य डॉ बी. के. सोनगे, उपप्राचार्य डॉ श्रीनिवास मेतन, डॉ विनायक पत्की यांनी अभिनंदन केले.

**संघातील खेळाडू :** प्राजक्ता ताकभाते (कर्णधार), श्रुती वाघमारे, श्रुति कात्रट, शेजल पवार, वैष्णवी महानवर, साक्षी गवळी, खुशबू शेख, धनश्री साळुंखे, करिष्मा शिंदे, उत्कर्षा पाटील, श्रावणी इंगळे, योगेश्वरी मलंगे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्वाचे...



### आदर्श शिक्षक महादेव नाईकनवरे यांच्या अमृत महोत्सवानिमित्त तीन दिवसीय मंचरी पारायण

**जेऊर, दि.१८ डिसेंबर**

समाजातील चांगला माणूस घडवण्याचे काम शिक्षक करत असतात त्यामुळे प्रत्येकाच्या जीवनात शिक्षकांचे महत्व असाधारण आसल्याने त्यांचा आदर व सन्मान नेहमी केला पाहिजे असे प्रतिपादन मकाई कारखान्याचे माजी चेअरमन दिग्विजय बागल यांनी शेटफळ येथील आदर्श शिक्षक महादेव नाईकनवरे गुरुजी यांच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित तीन दिवसीय मंचरी पारायण सोहळा सांगता व नागरी सन्मान कार्यक्रमात बोलताना केले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून तालुका खरेदी विक्री संघाचे चेअरमन शंभूराजे जगताप, जेऊरचे सरपंच पृथ्वीराज पाटील, विठ्ठल पाटील महाराज हे होते. यावेळी विठ्ठल पाटील महाराज, शंभूराजे जगताप सरपंच पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक गजेंद्र पोळ यांनी केले. यावेळी कीर्तनकार विलास सरडे महाराज, जगताप महाराज कालठाण, चंद्रकांत सरडे, राजेंद्रकुमार बारकुंड, दत्तात्रय सरडे, केरुजी गव्हाणे, सत्यवान लबडे, गणेश मोरे व माजी विद्यार्थ्यांची भाषणे झाली कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रणजीत शिंदे यांनी केले तर आभार बापू महाराज नाईकनवरे यांनी मानले. या कार्यक्रमाला शेलगावचे सरपंच अमर ठोंबरे, महापौर केसरी पैलवान विजय गुटाळ, बाजार समितीचे संतोष वारगड, माजी संचालक दादासाहेब लबडे, सरपंच काकासाहेब लबडे, माजी सरपंच पांडुरंग लबडे, भुजंग जाधव यांच्यासह तालुक्यातील विविध क्षेत्रातील मंडळी उपस्थित होती.



### तेलगाव सिना येथे आद्य कवी महर्षी वाल्मिक मूर्ती प्राणप्रतिष्ठापना उत्साहात

**बंकलगी, दि.१८ डिसेंबर-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील सीना तेलगाव येथे रविवार दि.१४ डिसेंबर रोजी आद्य कवी महर्षी वाल्मिक यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा सोहाळा उत्साहात संपन्न झाला. १५१ सुवासिनींनी कळस घेऊन नदीतून जलपूजन करून पाणी भरून आणले. नंतर नुरदय्या स्वामीजींच्या हस्ते प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. या कार्यक्रमासाठी धाडस संघटना अध्यक्ष व शिवसेना ऊबाठा उपनेते शरद कोळी, ऊबाठा शिवसेना उपनेत्या शुंभागी पाटील, संतोष पाटील, साईनाथ अंभगराव, गणेश अंकुशराव, गणेश आसबे, पीएसआय क्षिरसागर, सुदर्शन अवताडे, रमेश आसबे, संतोष वाकसे, नागेश बिराजदार, नागेश गाडेकर, प्रकाश घोडके, रवि घंटे, संस्कार फांउडेशनचे प्रमोद तम्मनवार, माजी संपादक अभय दिवाणजी, लक्ष्मण जाधव, शितलताई गवळी, बापू जमादार, बाबूराव कोळी, धोंडप्पा रुपनुरे, औदुंबर बंडगर, विद्या हाक्के, निखिल भोसले उपस्थित होते. कार्यकमाचे संयोजक धाडस संघटना उपाध्यक्ष दत्तात्रय छत्रे व शालेय विद्यार्थी, ग्रामस्थ, सरपंच रेवणसिद्ध पुजारी, धाडस ग्रुप व युवक कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य लाभले



### सांगोला तालुका पेन्शनर संघटनेच्या वतीने पेन्शनर डे साजरा

**सांगोला,दि.१८ डिसेंबर -**

जीवनामध्ये सुखी, आनंदी व निरामय जीवन जगण्यासाठी दिवसाची सुरुवात ओम काराने करावी व याचे प्रात्यक्षिक सर्वाकडून करून घेऊनच, आनंदी जीवन जगा व यासाठी ध्यानधारणा गरजेचे आहे असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सेवानिवृत्त प्राथमिक शिक्षक संघटनेचे राज्याध्यक्ष शिवानंद भरले यांनी केले. ते सांगोला तालुका पेन्शनर संघटनेच्या वतीने आयोजित पेन्शनर डे या कार्यक्रमात बोलत होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून सेवानिवृत्त मयत शिक्षक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. यावेळी पेन्शनर संघटनेच्या कार्यालयाचे उद्घाटन शिवानंद भरले यांच्या शुभहस्ते व जिल्हाध्यक्ष सुभाष फुलारी, उपाध्यक्ष शंकर जाधव, कार्याध्यक्ष काळापा सुतार, संघटक शांतआप्पा कांबळे, संघटनेचे अध्यक्ष वसंत दिघे, सल्लागार शंकर सावंत, सिद्धेश्वर झाडबुके, दिनकर घोडके, विलास नलावडे यांच्या उपस्थितीत करण्यात आले. याप्रसंगी संघटनेतर्फे जागेचे मालक रविंद्र माने, कवी शिवाजी बंडगर, रविराज शेटे तसेच ७५ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सेवानिवृत्त शिक्षक सदाशिव साबळे, जयवंत नागणे, महादेव चौगुले, शाहू गडहिरे, महादेव कांबळे, यशवंत मोहिते, पांडुरंग शिंदे, मनोहर शिंदे, गुंडाराम शिंदे, लक्ष्मण सावंत, सुमन सरगर, वसंत लिगाडे, आनंदा वाघमारे, सदाशिव कांबळे, मोहम्मद मुलानी, विठ्ठल मोहिते, अरविंद डोंबे, प्रभाकर कसबे, सुखदेव कदम, शंकर सावंत, सिद्धेश्वर झाडबुके यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वसंतराव दिघे, सूत्रसंचालन संचालिका प्रतिभा शेंडे व सिद्धेश्वर झाडबुके यांनी केले. आभार दत्तात्रय खामकर यांनी मानले.

## निधन वृत्त...

### रामचंद्र आडसुळ



**मंगळवेढा, दि. १८ डिसेंबर-**

नागणे गल्ली येथील श्रीसंत दामाजी साखर कारखान्याचे सुरक्षा कर्मचारी रामचंद्र गोपीनाथ आडसुळ यांचे गुरुवार, दि. १८ डिसेंबर रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी ते ५२ वर्षाचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, दोन मुली, आई, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद बांधकाम विभाग मंगळवेढ्याचे सेवानिवृत कर्मचारी रावसाहेब आडसूळ व दिलीप आडसुळ यांचे ते बंधु होत.

# विठ्ठल मूर्तीच्या चरणांची होतेय झीज; पुन्हा करावा लागणार वज्रलेप

## पुरातत्व विभागाच्या तज्ञांनी विठ्ठल मूर्तीची पाहणी करून दिला अहवाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ डिसेंबर -**

महाराष्ट्राचे आराध्य दैवत असणाऱ्या पंढरपूरच्या विठ्ठल मूर्तीच्या चरणांची झीज होत आहे. याबाबत पुरातत्व विभागाच्या तज्ञांनी विठ्ठल मूर्तीची पाहणी करून अहवाल दिला आहे. याबाबत शासनाच्या विधी व न्याय विभागाने परवानगी दिल्यावर विठ्ठल मूर्तीवर वज्रलेप होणार आहे. या आधी ही पांडूरंगाच्या चरणांची झीज झाली होती. त्यावेळी वज्रलेप लावण्यात आला होता. यावेळी ही हीच प्रक्रीया पार पडणार आहे. दरम्यान श्री विठ्ठल मूर्तीवर वज्रलेप करण्याची आता ही पाचवी वेळ असेल.

पंढरपूरची विठ्ठल मूर्ती ही स्वयंभू समजली जाते. याच विठ्ठल मूर्तीच्या चरणांची सध्या झीज होत आहे. भारतातील एकमेव असे तीर्थक्षेत्र आणि देवता म्हणून विठ्ठलाकडे पाहिले जाते की जिथे स्पर्श दर्शन आहे.



त्यामुळेच विठ्ठलाच्या चरणांची झीज होताना दिसते. याबाबत काही महिन्यांपूर्वी पुरातत्व विभागाच्या तज्ञ अधिकाऱ्यांनी विठ्ठल मूर्तीची सखोल पाहणी केली. यानंतर विठ्ठल मूर्तीच्या जतन आणि संवर्धनाबाबत श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती अर्थात मंदिर प्रशासनास तसा अहवाल दिला. हा अहवाल पुरातत्व विभागाने सादर केला आहे.

पुरातत्व विभागाने दिलेला अहवाल मंदिर समितीने शासनाच्या विधी व न्याय विभागाकडे मार्गदर्शनासाठी आणि परवानगीसाठी सादर केला आहे. राज्याच्या विधी व न्याय विभागाच्या परवानगी नंतरच विठ्ठल मूर्तीवर वज्रलेप करण्याबाबतचा अंतिम निर्णय होणार असल्याचे मंदिर प्रशासनाकडून समजत आहे.

### यापुर्वी चार वेळा करण्यात आला वज्रलेप

पंढरपूरच्या विठ्ठल मूर्तीवर कोरोना काळात सन २०२० मध्ये २३ आणि २४ जुलै रोजी मूर्ती जतन आणि संवर्धनासाठी लेपन करण्यात आले होते. विठ्ठलाच्या मूर्तीवर सर्वप्रथम १९८८ साली लेपन करण्यात आले होते. यानंतर २००५ , २०१२ आणि २०२० साली वज्रलेप करण्यात आला. या वज्रलेपला इपॉक्सी लेप या नावाने देखील संबोधले जाते.

**- महेश भंडारकवठेकर**

# आज शेतशिवारात घुमणार 'चाऊर चाऊर चांगभले'...चा गजर

### वेळ आमावस्ये निमित्त होणार पांडवपूजा

### खास गावरान जेवणाचा बेत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

जिल्ह्यात शुक्रवार दि.१९ डिसेंबर रोजी वेळआमावस्येनिमित्त शेतशिवारातील पिकांच्या रक्षणार्थ पांडवपूजा केली जाणार आहे. यानिमित्त शेतशिवारात चाऊर चाऊर चांगभले..चा गजर घुमणार आहे.

मार्गशीर्ष आमावस्येला शेतशिवारातील पिकांच्या रक्षणासाठी प्रतिकात्मक पांडवपूजा केली जाते. यानिमित्त विशेष नैवेद्य दाखवला जातो. सर्व पालेभाज्यांची एकत्रित केलेली गरगट्टा अर्थात भज्जीची भाजी, बाजरीचे उंडे, चविष्ट अंबिल (मठ्ठा), शेंगापोळी, वाग्याची भाजी, बाजरीची व ज्वारीची भाकरी, गव्हाची खीर, भात, आमटी असा विशेष नैवेद्य या पूजेवळी दाखवला जातो. पांडवपूजेवेळी मांडण्यात आलेल्या प्रतिकात्मक देवतांना पिकांच्या रक्षणाची विनवणी केली जाते. त्यांना प्रदक्षिणा घालताना पाण्याचे व अंबिलाचे वावरात शिंपण करीत चाऊर चाऊर चांगभले... पाऊस आला चल भले...असा गजर केला जातो. दुपारच्या निरव शांततेत प्रत्येक शेतातून घुमाणारा हा गजर संपूर्ण शिवारात निनादतो. या पूजेनंतर शेतात आप्तेष्टांसह जेवणावळीला सुरूवात होते. खास गावरान मेनूवर ताव मारत प्रत्येक जण तृप्तीची ढेकर देतो. यावेळी शेतातील बोरे, चिंचा, हरभरा, मका, ऊस याचा आस्वादही घेतला जातो. सायंकाळी पांडवपूजेवेळी वापरलेली पिकांच्या धाटांची लक्ष्मीची पाटी तयार केली जाते. शेतमालक ती पाटी डोक्यावर घेऊन वाजत गाजत नवधान्यरूपी लक्ष्मी घरी घेऊन येतो. हा आनंदसोहळा ग्रामीण भागात विशेष असतो.

# मेफेड्रॉन अंमली पदार्थ खरेदी-विक्री प्रकरणी अटकेतील आरोपीस सशर्त जामीन

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि.१८ डिसेंबर**

मेफेड्रॉन एमडी ड्रग्स अंमली पदार्थ खरेदी-विक्री प्रकरणी अटकेतील मेहमूद अब्दुल गनी शेख या आरोपीस सोलापूर येथील जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी सशर्त जामीन मंजूर केला.



मेफेड्रॉन एम डी ड्रग्स या प्रतिबंधित अंमली पदार्थाच्या खरेदी-विक्री प्रकरणात जेल रोड पोलीस ठाण्यात दि. २८ सप्टेंबर २५ रोजी गुन्हा नोंदविण्यात आला होता. पोलीस ठाण्याच्या पथकाने कर्णिक नगर क्रिडांगणा जवळील मोकळ्या मैदानात सापळा रचून कारवाई केली असता अमिर हमजा अखलाख दिना या इसमाच्या ताब्यातून २९ ग्रॅम मेफेड्रॉन (एम डी), इलेक्ट्रॉनिक वजनकाटा आणि चार प्लॅस्टिक पाऊच असा एकूण ७२ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल मिळून आल्याची नोंद आहे. चौकशीत अमिर हमजाने सदर अंमली पदार्थ अटकेतील आरोपी मेहमूद अब्दुल गनी शेख याच्याकडून मिळवून सोलापूरात विक्रीसाठी आणल्याचे सांगितले. या खुलाशानंतर दोघांविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला. मेहमूद अब्दुल गनी शेख यास अटक करण्यात आली. त्यानंतर त्याने जिल्हा व सत्र न्यायालयात जामिनासाठी अर्ज दाखल केला होता. या बाबत आरोपी निर्दोष असून त्याचा थेट सहभाग सिद्ध करणारा ठोस पुरावा उपलब्ध नाही. तपास पूर्ण झाला असून आरोपी पुराव्यावर परिणाम करणार नाही आणि त्याचा कोणताही गुन्हेगार पूर्व इतिहास नाही. असा युक्तिवाद आरोपीतर्फे ॲड. कदीर औटी यांनी केला. सदर युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश योगेश राणे यांनी आरोपी मेहमूद अब्दुल गनी शेख यास सशर्त जामीन मंजूर केला आहे. या प्रकरणात ॲड. दत्तात्रेय कापुरे, ॲड. वैभव बोंगे, ॲड. ओंकार फडतरे, ॲड. रोहित थोरात, ॲड. मोहीम पठाण, ॲड. शिवरत्न वाघ, ॲड. मनिष बाबरे, ॲड. अभिषेक नागटिळक, ॲड. अजय वाघमारे आणि ॲड. त्वरिता वाघ यांनी कामकाज पाहिले.

# माजी सैनिक सचिन पवार यांची एमपीएससीद्वारे दोन पदाला गवसणी

**तभा वृत्तसेवा,**
**जेऊर, दि.१८ डिसेंबर-**

भारतीय सेनेतून निवृत्त झाल्यानंतर पोफळजच्या माजी सचिन पवार यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षा पास होऊन एकाच वेळी कर सहाय्यक व लिपिक आशा दोन पदाला गवसणी घातली आहे.

पोफळज (ता.करमाळा) येथील सचिन पवार २००२ मध्ये भारतीय सेनेमध्ये शिपाई पदावर दाखल झाले गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात सेनेच्या सेवेतून निवृत्त झाले. २२ वर्षे भारतीय सेनेत एअर फोर्स मध्ये सेवा केली. सेवानिवृत्तीनंतर अनेक खाजगी कंपन्या व इतर ठिकाणी नोकरीची संधी त्यांना उपलब्ध होती. परंतु त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा



आयोगाच्या वतीने घेण्यात येणाऱ्या परीक्षेचा ऑनलाइन अभ्यास सुरू केला. पहील्याच प्रयत्नात एकाच वेळी कर सहाय्यक व लिपिक या पदावर त्यांची निवड झाली. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे. या यशाबद्दल बोलताना ते म्हणाले आमच्या कंपनीचे को कर्नल अर्जुन चितळे यांनी या परीक्षा देण्यासाठी मला प्रोत्साहित केले. तर माझे यश म्हणजे माझ्या आई-वडिलांचे आशीर्वाद सर्व मित्रमंडळी व कुटुंबातील सर्वांचे सहकार्य विशेष म्हणजे माझा अभ्यास व्हावा म्हणून माझ्या पत्नीने केलेले प्रयत्न या गोष्टी महत्वाच्या ठरल्या. या सर्वामुळे मी एकाच वेळी दोन्ही परीक्षेत यशस्वी होऊन दोन पदावर माझी निवड झाली आहे. या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत असून अभिनंदन केले जात आहे.

# पिलीव बाजारपेठेतील मुख्य रस्त्याची प्रचंड दुरवस्था

### फक्त निवडणुकीत आश्वासनाची खैरात

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव, दि. १८ डिसेंबर-**

माळिशरस तालुक्यातील पिलीव ही आसपासच्या १० ते १५ गावांसाठी मुख्य बाजारपेठ आहे.तर दर मंगळवारी येथे मोठा बाजार भरतो. या बाजारासाठी आसपासच्या खेडेगावातून मोठ्या प्रमाणात नागरिक येतात. स्थानिक नागरिकांची तसेच दुचाकी व चारचाकी वाहनांची कायम वर्दळ या मुख्य बाजारपेठेतून असते. परंतु या मुख्य बाजारपेठेतील रस्त्यांची सध्या प्रचंड दुरावस्था झाली आहे. रस्त्यावर प्रचंड खड्डे पडले आहेत. ते दुरूस्त करण्याची मगाणी होत आहे.

याठिकाणी जलजीवन योजनेअंतर्गत नवीन पाईप लाईनचे काम केल्यामुळे सुद्धा रस्त्याची दुरावस्था झाली आहे. मंगळवारच्या बाजार दिवशी तसेच इतर दिवशी सुद्धा वाहतुकीची प्रचंड कोंडी होते. यामुळे नागरिक, विद्यार्थी तसेच व्यापारी यांना प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. रस्त्याचा विषय फक्त ग्रामपंचायत निवडणुकीतच निघतो पण नंतर तो विषय मागे पडतो अशी परिस्थिती आहे. पिलीव बसस्थानक ते वेशीपर्यंत रस्ता करण्यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आवश्यक आहे. यासाठी मोठ्या जनरेटयाची गरज आहे. यासाठी मोठा निधी राज्य सरकार किंवा केंद्र सरकार पण सध्या देशात व राज्यात भाजपप्रणीत सरकारे सत्तेत आहेत. तालुक्यातील आमदार व खासदार विरोधी गटाचे आहेत. यामुळे या गावाला एवढा मोठा निधी उपलब्ध होईल असे वाटत नाही.सत्ता कोणाचीही येवो पण पिलीव बाजारपेठेतील मुख्य रस्त्याचे दर्जेदार काम व्हावे, अशी मागणी पिलीवकरांमधून

# थंडी वाढली : मुक्या जनावरांना मायेची ऊब

### निसर्गप्रेमींनी गोठ्यामध्ये जाऊन केली जनजागृती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर,दि.१८ डिसेंबर-**

मागील काही दिवसापासून सोलापूर जिल्ह्यात थंडीचा कडाका वाढला आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असताना त्याचा परिणाम जनावरांच्या आरोग्याचा होऊ शकतो, त्यामुळे हिवाळ्यात जनावरांच्या आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

जिल्ह्यात जवळपास पाच लाखापेक्षा अधिक गाय, बैल, म्हैस, व तसेच शेळ्या यांची संख्या मोठी आहे. शहरात मागील काही दिवसापासून थंडीचा कडाका आहे. माणसांप्रमाणे मुक्या जनावरांना देखील या गारव्याचा त्रास होतो. हे लक्षात घेता बाळे येथील निसर्ग प्रेमी दीपक करकी, ऋषिकेश हरसुरे यांनी थंडीपासून मुक्या जीवाला मायेची ऊब मिळावी म्हणून गोठ्यामध्ये जाऊन जनावरांचे रक्षण करायचे असेल तर सर्वप्रथम थंडीपासून त्याचा बचाव करणे महत्त्वाचा आहे. गोठ्यात गाय, बैल, म्हैस या मुक्या जनावरांना ब्लँकेट घालून गरमी उपलब्ध केली आणि जनावरांच्या रक्षणासाठी जनजागृती करण्यात आली.



### याची केली जनजागृती...

✻ लहान वासरे शेळ्या यांचे सध्याच्या थंडीपासून संरक्षण करणे गरजेचे आहे. ✻ गोठ्याला बारदान शेडनेटचे पडदे लावावेत. गोठ्यामध्ये उष्णता टिकून राहण्याची बल्बचा वापर करावा. शक्य झाल्यास शेकोटी पेटवावी थंडीपासून बचाव करता येईल. ✻ सध्या शहरात थंडीचा कडाका वाढला आहे, मुक्या जनावरांना थंडीपासून संरक्षण देणे गरजेचे आहे माणसांप्रमाणे जनावरांना देखील थंडीचा त्रास होतो. याकरता थंडीच्या संरक्षणासाठी मायेची ऊब गरजेची आहे.

**- दिपक करकी, निसर्गप्रेमी, बाळे.**

# मोकाट जनावरे अन् भटक्या कुत्र्यांचा पंढरपूरकरांना होतोय उपद्रव


### शहर आणि उपनगरातील जवळपास सर्वच रस्त्यांवर मोकाट जनावरे

### भटकी कुत्री अक्षरशः कळपाने फिरताना आढळतात

### मोकाट जनावरांमुळे रस्त्यांवर वारंवार अपघात

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.१८ डिसेंबर -**

पंढरपूर शहर आणि उपनगरातील जवळपास प्रत्येक मार्गावरुन प्रवास करताना भटकी जनावरे आणि भटक्या कुत्र्यांचे कळप वाहनांना आडवे येतात व दुर्घटना घडतात. याबरोबरच मोकाट गाढवे, डुकरांचा तर त्रास निराळाच. शहरात हे प्रकार नित्याचेच असले तरी याबद्दल ना नागरिक ओरड करतात, ना पालिका बंदोबस्त करते. विद्यार्थ्यांचा, नागरिकांचा, वाहनधारकांचा जीव धोक्यात आणणाऱ्या मोकाट जनावरांना अभय कोण देते? जनावरांना कोंडवाड्यांची हवा का दाखविली जात नाही? जनावरांचा हा उच्छाद पालिका का सहन करते? कोणाची आहेत ही जनावरे? त्यांना कशासाठी सवलत दिली जाते असे एक ना अनेक प्रश्न देखील या निमित्ताने उपस्थित होत आहेत.





### लाखोंची कमाई मात्र दंडाचा पत्ता नाही

शहरातील मोकाट जनावरांच्या माध्यमातून अनेक जनावरांचे मालक लाखों रुपयांची कमाई करतात. गायी, म्हशी तसेच त्यांची वासरे विकत घेतल्यानंतर त्यांना चक्क रस्त्यावर सोडून दिले जाते. या जनावरांचा उपद्रव इतरांना होत असला तरी जनावरांचे मालक मात्र (उदा.गाई, म्हशीच्या दूध विक्रीतून तसेच गाढवांवरुन वाळू वाहून) त्यावर लाखों रुपयांची कमाई करतात. विशेष म्हणजे या मोकाट जनावरांचा प्रचंड त्रास जाणवत असला तरी पालिका देखील त्यांच्यावर कोणतीही कारवाई करीत नाही.

### कळपाने फिरतात जनावरे

शहरातील प्रदक्षिणा मार्ग, इंदिरा गांधी भाजी मंडई ते गजानन महाराज मंदिर रस्ता, बेलीचा महादेव, काळामारुती, स्टेशन रस्त्यावर, कृष्णाचा हौद मंडई परिसरात, नवीपेठ, जुनीपेठ, भादुले चौक, विठ्ठल मंदिर परिसर तसेच आजुबाजूचे लहान लहान बोळ, भक्तीमार्गावरील आदर्श प्राथमिक विद्यालय परिसर, सरगर चौक रस्ता, चंद्रभागा बसस्थानकाच्या समोरील रस्ता याशिवाय गणेशनगर, मनिषानगर, लिंकरोड, गुरुकृपा सोसायटी, टाकळी रस्ता, तुळशीवृंदावन परिसर आदी परिसरात अशी मोकाट जनावरे अगदी कळपाने फिरताना दृष्टीस पडतात.

### अशी होवू शकते शासकीय कारवाई

मोकाट जनावरे रस्त्यांवर सोडून त्यांचा इतरांना उपद्रव झाल्यास मुंबई पोलिस अँक्ट नुसार जनावरांच्या मालकांवर गुन्हा दाखल करण्यात येतो. यामध्ये एक महिन्याची शिक्षा आणि तीन हजार रुपये दंड होवू शकतो. तसेच असा प्रकार वारंवार केल्यास सहा महिन्याची शिक्षा आणि पाच हजार रुपये दंड होवू शकतो. पालिकेच्या कर्मचाऱ्यांना कारवाई करताना रोखण्याचा प्रयत्न केल्यास सरकारी कामांमध्ये अडथळा आणल्या प्रकरणी कारवाई करुन प्रत्येक जनावरांमागे पाचशे पन्नास रुपये दंड, चाऱ्यासाठी दररोज साठ रुपये अशी आकारणी करता येते.

### कारवाईचा फार्स

वर्षभरात आषाढी यात्रेच्या अगोदर फक्त नगरपालिकेकडून मोकाट जनावरे पकडण्याचा केवळ फार्स केला जातो. त्यावर हजारो रुपयांचा खर्च देखील दाखविण्यात येत असतो. मात्र एरव्ही शहरातील नागरिकांना मोकाट जनावरांच्या त्रासातून मुक्त करण्यासाठी मोकाट जनावरांना पकडण्याची कोणतीही तसदी पालिका घेत नसल्याचे दिसून येते.

## महत्वाचे...



### नू.म.वि.च्या प्रांगणी बहारला राग दरबारी

**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

नुमवि शिशु शाळेचे स्नेहसंमेलन अतिशय उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुण्या म्हणून डॉ. संध्या जोशी या उपस्थित होत्या त्याचबरोबर शाळा समितीचे अध्यक्ष राजेश पटवर्धन, शाळा समिती सदस्य दामोदर भंडारी, पराग ठाकूर व नियामक मंडळ सदस्य सुधीर काळकर तसेच नुमवि शिशु शाळेच्या मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी व कार्याध्यक्ष वैशाली पाटील व्यासपीठावर उपस्थित होते. दीपप्रज्वलनानंतर ईशस्तवन सादर झाले. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून यावेळेसची कल्पना अशी होती की प्रत्येक गीत हे वेगवेगळ्या रागातून निवडलेले होते त्यावर शाळेतील चिमुकल्यांनी बहारदार नृत्य सादर केले आणि कार्यक्रम सुंदर सादर झाला. यावेळी सर्व दैनिकातील पत्रकारांना आमंत्रित केले होते. मुख्याध्यापिका अर्चना कुलकर्णी यांच्या अमोल मार्गदर्शनाखाली सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी कार्यक्रम उत्तम पार पाडला. यावेळी बहुसंख्येने पालक उपस्थित होते. त्यांनीही आपल्या मुलाचे कौतुकाने कार्यक्रम पाहिला व सहकार्य केले. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अंकिता कुलकर्णी व स्नेहा गजेंद्रगडकर यांनी केले.

### नूतन प्रशालेत आज आरोग्य शिबिर

**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

विजापूर रोड जयकुमार नगर येथील श्री नूतन प्रशालेत परमपूज्य गुरुदेव १०८ समंतभद्र महाराज यांच्या जयंतीनिमित्त



मोफत आरोग्य शिबिर शुक्रवारी १९ डिसेंबर रोजी सकाळी ९ ते दुपारी १२ पर्यंत आयोजित केले आहे. या शिबिरामध्ये, बीपी, रक्तातील शुगर, शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाण, हृदयाची ठोक्याचे प्रमाण, शरीरातील ऑक्सिजन लेवल, मोफत तपासले जाणार आहेत. परिसरातील जास्तीत जास्त नागरिकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्याध्यापक श्री शहापुरे व अखिल भारतीय जैन सैतवाल संस्थेचे अनंतकुमार रणदिवे यांनी केले आहे.




### प्रमोद डोंबे यांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन प्रदान

**सांगोला, दि. १८ डिसेंबर -**

रयत शिक्षण संस्थेच्या सांगोला तालुक्यातील मांजरी हायस्कूल येथील सहशिक्षक प्रमोद अरविंद डोंबे यांना शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एज्युकेशन २०२६-२०२७ रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते व खा.सुप्रिया सुळे, शास्त्रज्ञ डॉ.अनिल काकोडकर, कोकण कृषी विद्यापीठाचे माजी कुलगुरू मगर यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आली. हा सन्मान सोहळा मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे संपन्न झाला. शिक्षण क्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या मूल्यमापन या विषयावर नवोन्मेष, संशोधनात्मक दृष्टिकोन आणि गुणवत्तावाढीसाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत ही फेलोशिप प्रमोद डोंबे यांना प्रदान करण्यात आली. यासाठी त्यांना रयत शिक्षण संस्थेचे सहसचिव पवार, मध्य विभागाचे विभागीय अधिकारी जगदाळे, सहा.विभागीय अधिकारी निकम, दाभाडे, विद्यालयाचे मुख्याध्यापक उत्तम रायभान, पर्यवेक्षक मासाळ व सर्व सेवक वृंद यांचे मार्गदर्शन लाभले.



### सोलापूर जिल्हा शिवसेना उपप्रमुखपदी सुनिल कटारे

**अक्कलकोट दि १८ डिसेंबर**

माजी मंत्री व शिवसेना नेते सिद्धाराम म्हेत्रे यांच्या नेतृत्वाला अधिक बळ देण्यासाठी अक्कलकोटचे जेष्ठ शिवसैनिक, माजी नगरसेवक सुनिल कटारे यांची सोलापूर जिल्हा उपप्रमुख पदी निवड करण्यात आली. त्यांच्या निवडीने शिवसैनिकात आनंद व्यक्त केला जात आहे. सुनिल कटारे यांच्या जिल्हा उपप्रमुखपदी नियुक्तीचे अधिकृत नियुक्तीपत्र सोलापूर संपर्कप्रमुख. संजय कदम यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. या प्रसंगी सोलापूर जिल्हा प्रमुख अमर पाटील, सोलापुर शहर प्रमुख सुनिल चव्हाण, अक्कलकोट तालुका प्रमुख बाबासाहेब पाटील,अल्पसंख्यांक आघाडी जिल्हा प्रमुख शाकिर पटेल, इंद्रजीत गद्दी, मोहसीन मोकाशी आदी उपस्थित होते.

# सोलापुरात शिवसेना 'उबाठा'ला मोठा राजकीय धक्का

## वानकर बंधूंचा शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १८ डिसेंबर-**

राज्यातील विविध महानगरपालिकांच्या निवडणुकीची धामधुम सुरु आहे. तर इकडे सोलापुरात शिवसेना 'उबाठा'ला मोठा राजकीय धक्का बसला आहे. शिवसेना 'उबाठा'चे जिल्हा समन्वयक दत्तात्रय वानकर आणि युवा सेनेचे शहराध्यक्ष विठ्ठल वानकर यांनी गुरुवारी शिवसेनेला अखेरचा जय महाराष्ट्र केला.

शिवसेना 'उबाठा'चे जिल्हाप्रमुख असलेले गणेश वानकर यांनी प्रभाग क्रमांक ६ मधून शिवसेना 'उबाठा'कडून निवडणूक लढविणार असल्याचे सांगत उमेदवारी अर्ज घेतला





होता. परंतु दत्तात्रय व विठ्ठल वानकर यांनी शिवसेना 'उबाठा'ला अखेरचा जय महाराष्ट्र केल्याने तर्कवितर्क लढविले जात आहेत

दत्तात्रय वानकर व विठ्ठल वानकर या बंधूद्वयांनी शिवसेनेचे पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, युवा सेनेचे प्रमुख आदित्य ठाकरे यांच्याकडे तडकाफडकी राजीनामा पाठवून दिल्याने सोलापूरच्या राजकारणात एकच खळबळ उडाली. दरम्यान, रविवारी आपली पुढची दिशा ठरविणार आहे, असे वानकर बंधूंनी सांगितले

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते प्रकाश वानकर यांनी शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेबठाकरे यांच्यासोबत काम करताना शिवसेना सोलापूर शहरासह जिल्हाभरात पोहोचवली. आजही ते शिवसेनेत अहोरात्र काम करत आहेत. यापूर्वी त्यांच्या पत्नी मंगलताई त्यानंतर पुत्र गणेश वानकर हे प्रभाग ६ मधून नगरसेवक म्हणून निवडून आले. पिता प्रकाश वानकर यांच्यासह गणेश, दत्तात्रय आणि विठ्ठल या तीनही चिरंजीव बंधुची शिवसेनेतील ताकद सर्वश्रुत आहे. मात्र ऐन निवडणूकीच्या तोंडावर अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू असतानाच शिवसेनेतील मोठे प्रस्थ असलेल्या वानकर परिवारातील दोन सख्या भावांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केल्यामुळे सोलापूरच्या राजकारणात खळबळ माजली आहे.

## सोलापुरात भाजप आणि शिवसेनेचे महायुतीसाठी पहिले पाऊल



### तडवळकर आणि कदम यांची चर्चा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

सोलापुरात भाजप आणि शिवसेनेचे महायुतीसाठी पहिले पाऊल गुरुवारी पडले आहे. सोलापुरातील एका कार्यकर्त्याच्या निवासस्थानी पार पडलेल्या एका बैठकीत भाजपच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आणि शिवसेनेचे संपर्कप्रमुख व माजी आमदार संजय कदम यांनी आपापल्या पक्षाची ज्या-त्या प्रभागात असलेली ताकद आणि उमेदवार याबाबत चर्चा केली. सर्वांसामान्य तोडगा काढण्यासाठी दोघेही योग्य पाऊल उचलतील असे ठरले.

राज्यात भाजप आणि शिवसेना महायुती म्हणून जोमाने काम करत असताना सोलापुरातसुद्धा महायुती झाली पाहिजे. त्यासाठी जागांच्या बाबतीत चर्चा करून योग्य निर्णय घेण्यासाठी दोघांकडून पहिले पाऊल टाकण्यात आले. यावेळी शिवसेनेच्या प्रवक्त्या प्रा.डॉ.ज्योती वाघमारे, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे, अमर पाटील, साईनाथ अभंगराव, सचिन चव्हाण, लक्ष्मीकांत ठोंगे-पाटील, उत्तमप्रकाश खंदारे, मनिष काळजे, भाजपचे शशी थोरात आदी उपस्थित होते.

## आचारसंहिता भंगाबाबत तक्रारीसाठी अधिकाऱ्यांचे संपर्क क्रमांक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक संदर्भात आचारसंहितेचा भंग झाल्यास राजकीय कार्यकर्ते व नागरिकांना तक्रार करण्यासाठी महापालिका निवडणूक शाखेने संबंधित अधिकाऱ्यांचे मोबाईल क्रमांक जाहीर केले आहेत.

आदर्श आचारसंहितेबाबत नागरिकांच्या तक्रारी, सूचना व माहिती तात्काळ प्राप्त व्हावी यासाठी संपर्क क्रमांक उपलब्ध करून देण्यात आले आहेत. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे तसेच आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन व्हावे यासाठी प्रभागनिहाय संपर्क व्यवस्था करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक १ ते १३ मधील नागरिकांसाठी आचारसंहितेबाबत कोणतीही तक्रार, माहिती अथवा सूचना असल्यास ९६०७९८०१०० आणि प्रभाग क्रमांक १४ ते २६ मधील नागरिकांसाठी ९६०७९८०२०० हा स्वतंत्र संपर्क क्रमांक देण्यात आला आहे. नागरिकांनी निवडणूक कालावधीत आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन आढळल्यास तात्काळ संबंधित संपर्क क्रमांकावर माहिती देऊन प्रशासनास सहकार्य करावे, असे महानगरपालिकेचे आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले आहे.

## सोलापूर महापालिकेसाठी राष्ट्रवादी पक्षाकडे ४१२ उमेदवार इच्छुक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर**

सोलापूर महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गुरुवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी १७५ इच्छुक उमेदवारांनी अर्ज दाखल केले. राष्ट्रवादीमध्ये तीन दिवसात तब्बल रेकॉर्डब्रेक अशा तब्बल ४१२ जणांनी उमेदवारीसाठी अर्ज दाखल झाले आहे.

धनंजय मुंडे समर्थक सनी देवकते हे राष्ट्रवादी पक्षाकडून प्रभाग क्रमांक ७ मधून उमदेवारी अर्ज सादर करण्यासाठी ट्रॅक्टर चालवत धनगरी पोशाखात राष्ट्रवादी कार्यालयात आले. त्यांनी सर्वांनी लक्ष वेधून घेतले. शरद पवार राष्ट्रवादी, काँग्रेस, एमआयएम पक्षामधील माजी उपमहापौर तसेच माजी गटनेते माजी नगरसेवकांनी इच्छुक म्हणून उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.




उमेदवारी अर्ज दाखल केलेल्यांमध्ये माजी उपमहापौर राजेंद्र कलंत्री, स्थायी समितीचे माजी सभापती इब्राहिम कुरेशी, परिवहन समितीचे माजी सभापतीद्वय राजन जाधव, आनंद मुस्तारे, माजी गटनेते आनंद चंदनशिवे, माजी नगरसेविकाद्वय लता फुटाणे, वाहेदाबी शेख, मृणाल पाटील, माजी नगरसेवकद्वय रियाज खैरदी, विवेक खरटमल, गणेश पुजारी, वाहिद नदाफ, महिला आघाडीच्या कार्याध्यक्षा चित्रा कदम, राष्ट्रवादी शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांचे बंधू हरीष बागवान आदींचा समावेश आहे.

## स्वामी सेवेचे मूल्यमापन कोणत्याही सेवेशी करता येत नाही : अभिनेत्री श्रेया बुगडे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट दि. १८ डिसेंबर -**

अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज जगाच्या कल्याणासाठी या भूतलावर अवतरलेले आहेत. अशा या अवलियाची सेवा करणे हे मानवी जीवनाचे परमभाग्य असते, स्वामी कृपेने ही सेवा मंदिर समितीचे अध्यक्ष महेश इंगळे यांच्या जीवन कार्यास लाभलेली आहे. जीवनातील कोणत्याही सात्विक सेवेपेक्षा स्वामी सेवेचे हे कार्य खूप महान आहे, म्हणून स्वामी सेवेचे मूल्यमापन कोणत्याही सेवेशी करता येत नाही असे मनोगत मराठी मनोरंजन क्षेत्रातील लोकप्रिय अभिनेत्री श्रेया बुगडे यांनी व्यक्त केले

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांची आरती करून दर्शन घेतले. यावेळी



मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे, प्रथमेश इंगळे यांनी अभिनेत्री श्रेया बुगडे यांचा श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा, देऊन सन्मान केला. यावेळी अभिनेत्री श्रेया बुगडे बोलत होत्या. याप्रसंगी मंदिर समितीचे विश्वस्त महेश गोगी, श्रीशैल गवंडी, गिरीश पवार, व्यंकटेश पुजारी, प्रसाद सोनार, श्रीकांत मलवे, संतोष जमगे, खाजप्पा झंपले, सागर गोंडाळ, विपुल जाधव इत्यादी उपस्थित होते.

### श्रेयाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले

आपल्या अभिनयाच्या जोरावर श्रेयाने प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. 'चला हवा येऊ द्या' कॉमेडी एक्स्प्रेस या विनोदी मराठी मालिकां मधून श्रेया बुगडे हे नाव अल्पावधीत घराघरांत पोहोचलं. तब्बल दहा वर्षे या शो नं प्रेक्षकांचं मनोरंजन केलं आहे. या पुढेही प्रेक्षकांचं मनोरंजन करण्याचं त्यांचं हे काम अविरतपणे सुरु रहावे याकरीता श्रेया बुगडे यांचा सन्मानाच्या माध्यमातून श्री स्वामी समर्थांचे आशीर्वाद व आमच्या शुभेच्छा.

- **प्रथमेश इंगळे, युवा नेतृत्व - श्री.वटवृक्ष** स्वामी महाराज देवस्थान, अक्कलकोट)

## नोकराच्या अमानुष अत्याचारप्रकरणी मालकाचा जामीन अर्ज फेटाळला

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.१८ डिसेंबर-**

माढा तालुक्यातील दहिवली येथील निखील लांडगे या नोकराचा अमानुष जाच व जीवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका सामाजिक संघटनेचा अध्यक्ष अतुल भैरवनाथ खुपसे याचा जामीन अर्ज बार्शी जिल्हा व सत्र न्यायालय यांनी फेटाळला.



दि. ९ मे २०२५ पासून निखील लांडगे हा अतुल खुपसे याच्या शेतात कामाला होता. तेव्हापासून इमानदारीने काम करुन देखील अतुल खुपसे हा निखील याच्यावर जातीवाचक शिवीगाळ करणे, मारहाण करणे, डांबून ठेवणे असा अमानुष अत्याचार करत असे. दि. २० सप्टेंबर २०२५ रोजी कामाला असताना अतुल खुपसे आपल्या सहकाऱ्यांच्या सहाय्याने निखील लांडगे यास मारहाण करुन सिपॉवर हे विषारी औषध पाजून जीवे मारण्याचा प्रयत्न केला, अशी फिर्याद टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे देण्यात आली. त्यावर अतुल खुपसे याने अटकपूर्व जामीन जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी येथे दाखल केला. त्यामध्ये मूळ फिर्यादी निखील लांडगे यांच्यातर्फे ॲड. रणजीत चौधरी यांनी आपली बाजू मांडत आरोपी अतुल खुपसे हा सराईत गुन्हेगार असून कशाप्रकारे आपल्या नोकरावर अत्याचार केला व तो तालुक्यात इतर लोकांवर कसा अन्याय करतो व त्याच्यावर एकूण २६ गुन्हे नोंद असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले, सदर मुळ फिर्यादींच्या ॲड. रणजीत चौधरी वकीलांचा युक्तीवाद ग्राह्य धरत जिल्हा व सत्र न्यायालय बार्शी यांनी याचा अटकपूर्व जामीन फेटाळला. याप्रकरणी मुळ फिर्यादीतर्फे ॲड. रणजीत चौधरी, ॲड. राहूल मिरगणे, सरकारी वकील ॲड.डी. डी. देशमुख यांनी तर आरोपीतर्फे ॲड. ए. आर. पाटील यांनी काम पाहिले.



## माजी नगरसेविका मेनका राठोड यांनी सादर केला कार्यअहवाल

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१८ डिसेंबर-**

माजी नगरसेविका मेनका राठोड यांनी भारतीय जनता पक्षांकडे सोलापूर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकसाठी मुलाखत दिली. भाजपाच्या शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर, उपाध्यक्ष संजय साळुंखे यांनी ही मुलाखत घेतली. मेनका राठोड यांनी आपला कार्यअहवाल सादर केला.

जिल्हा नियोजन समिती सदस्या असल्याने नियोजन समितीसह महानगरपालिका व शासनाच्या विविध हेडखाली मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणत प्रभागात रस्ते, ड्रेनेज, पाण्याचे पाईपलाईन, इलेक्ट्रिक पोल, दिवाबत्ती, घनकचरा आदी कामे केली. सध्या दुसऱ्या डीपीआरमधील ४३७ कोटींचे काम चालू आहे.

## कल्याणशेट्टी महाविद्यालयाच्यावतीने अल्पसंख्यांक हक्क दिनानिमित्त जाणीव जागृती रॅली

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट दि .१८ डिसेंबर**

संविधानाचा मान- अल्पसंख्यांकांचा सन्मान, अल्पसंख्यांक हक्काचे रक्षण-लोकशाहीचे संरक्षण, अल्पसंख्यांक समाजाचा विकास-देशाचा विकास, संविधानाचे रक्षण-लोकशाहीचे रक्षण या घोषणांनी अक्कलकोट शहराचा परिसर दुमदुमून गेला.

निमित्त होते कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाने अल्पसंख्यांक दिनानिमित्त आयोजित केलेल्या जाणीव जागृती रॅलीचे महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या वतीने अल्पसंख्यांक दिनानिमित्त खास अक्कलकोट येथील नागरिकांचे प्रबोधन करण्यासाठी जाणीव जागृती रॅली आयोजित करण्यात आली होती. महाविद्यालयापासून निघालेली अल्पसंख्यांक रॅली हन्नूर चौक, मल्लिकार्जुन मंदिर, एसटी स्टँड, कारंजा चौक, जुना राजवाडा, स्वामी समर्थ मंदिर परिसरात संपन्न झाली. रॅलीचे नियोजन कार्यक्रमाधिकारी प्रा राजशेखर पवार, प्रा डॉ शितल झिंगाडे-भस्मे, प्रा सौरभ भस्मे यांनी केले.




अल्पसंख्यांकांना हक्क, सुविधा व सवलती मिळाल्या पाहिजेत. दरम्यान रॅलीच्या आधी ड प्रा सोनाली कटकधोंड यांनी आपल्या व्याख्यानातून अल्पसंख्यांकांना त्यांचे हक्क सुविधा व सवलती पासून अधिकारी मंडळींनी वंचित ठेवू नये असे सांगितले. त्यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक शिष्यवृत्ती, उच्च शिक्षणासाठी कर्जाची सुविधा, रोजगाराची संधी याबद्दल सविस्तर माहिती दिली.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, श्री. मसलेकर निवास, जिल्हा न्यायालय पाठीमागे, समर्थ नगर, धाराशिव (उस्मानाबाद) ४१३५०१, कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ९७६७०९९७११ / ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. RNI No. MAHMAR/2023/86468. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003.**Publised at** TARUN BHARAT OFFICE Mr. Maslekar Residence, Behind District Court, Samarth Nagar, Dharashiv. PIN - 413501 |**RNI No. MAHMAR/2023/86468**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.




## तुळजापूर बसस्थानकात चोरी; ४५ हजारांचा मुद्देमाल लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

तुळजापूर बसस्थानक परिसरात गर्दीचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने प्रवाशाच्या अंगावरील दागिने व रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी किरण मनोज मोहळकर (वय २७), रा. नामदेव मंदिराजवळ, पंढरपूर, ता. पंढरपूर, जि. सोलापूर हे दि.१६ डिसेंबर रोजी सायंकाळी ३.३० वाजण्याच्या सुमारास तुळजापूर बसस्थानक येथे बसमध्ये चढत असताना अज्ञात व्यक्तीने गर्दीचा फायदा घेत त्यांच्या अंगावरील ५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २०,००० रुपये, असा एकूण ४५,००० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. चोरी झाल्याचे लक्षात येताच त्यांनी तात्काळ तुळजापूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

फिर्यादी किरण मोहळकर यांनी दि.१७ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## शोक संदेश...



### अंकित उकरंडे यांची तालुकाध्यक्षपदी निवड

**वाशी, दि.१८ डिसेंबर -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथील अंकित उकरंडे यांची राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) विद्यार्थी सेल, वाशी तालुका अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष प्रतापसिंह पाटील तसेच विद्यार्थी सेलचे धाराशिव जिल्हाध्यक्ष ज्ञानेश्वर निंबाळकर यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी रणजीत खामकर, विजय उकरंडे, प्रशांत कुदळे आदी मान्यवर उपस्थित होते.



### शुभम राठोडची भारतीय सैन्यदलात अग्निवीर म्हणून निवड

**उमरगा, दि.१८ डिसेंबर -**

उमरगा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयाच्या एनसीसी विभागातील कॅडेट शुभम राठोड याची भारतीय सैन्यदलात अग्निवीर म्हणून निवड झाली. यानिमित्त प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांच्या हस्ते त्याचा सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. कदेर तांडा येथील रहिवासी असलेल्या शुभमने प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत स्वतःच्या मेहनतीवर व एनसीसी प्रशिक्षणाच्या बळावर हे यश मिळवले. सत्कारप्रसंगी प्राध्यापक व कॅडेट्स मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### वारदवाडी मार्गे बार्शी येथे शटल बससेवा सुरू करण्याची मागणी

**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

भूम येथून वारदवाडी मार्गे बार्शी येथे जाणाऱ्या प्रवाशांची संख्या सकाळी मोठ्या प्रमाणात वाढलेली असल्यामुळे वारदवाडी मार्गे बार्शीसाठी शटल बससेवा सुरू करावी, अशी मागणी आगार प्रमुख यांना वंचित आघाडीतर्फे देण्यात आले. भूम येथून बार्शीकरिता सकाळी ७ नंतर सुरू होणाऱ्या बसमध्ये प्रचंड गर्दी होत असून, एक-दोन थांबे घेतल्यानंतर बस पूर्ण भरते. त्यामुळे पुढील थांब्यांवर उभे असलेले प्रवाशी बसमध्ये चढू शकत नाहीत. अनेक वेळा एका बसमध्ये ८० ते १०० पेक्षा जास्त प्रवाशी असतात. बस अभावी विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. विद्यार्थ्यांना वेळेवर कॉलेज/शाळेत पोहोचता येत नाही. परिणामी त्यांचे तास वेळेवर लागत नाहीत व शिक्षणावर परिणाम होत आहे. नागरिकांना दररोज प्रवासात अडचणी येत आहेत. निवेदन देताना ॲड. अलीम शेख, दीपक सोनवणे, अझर सय्यद आदी उपस्थित होते.



### उमरग्यात डासांचा प्रादुर्भाव

**उमरगा, दि.१८ डिसेंबर -**

उमरगा शहरातील विविध प्रभागांत अस्वच्छतेमुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर ॲड. शीतल चव्हाण फाउंडेशनच्या वतीने नगर परिषदेचे मुख्याधिकारी यांना निवेदन देण्यात आले. साचलेले पाणी, उघडी गटारे व कचऱ्यामुळे डेंग्यू, मलेरिया आदी आजारांचा धोका वाढल्याचे नमूद करून तातडीने फॉगिंग, कीटकनाशक फवारणी, निचरा, साफसफाई व जनजागृती मोहीम राबविण्याची मागणी करण्यात आली आहे.

# धाराशिवच्या रुग्णालयांना नागपूरच्या कॅन्सर इन्स्टिट्यूटचा 'मॉडेल टच'

## अत्याधुनिक आरोग्य सुविधांसाठी ऐतिहासिक पाऊल : आ. राणाजगजितसिंह पाटील

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

धाराशिव जिल्ह्यातील आरोग्य सुविधा अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण आणि दूरगामी निर्णय घेण्यात आला आहे. धाराशिव येथे उभारण्यात येणाऱ्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाशी संलग्न ५०० खाटांचे रुग्णालय तसेच ५०० खाटांचे शासकीय जिल्हा सामान्य रुग्णालय या दोन्ही संस्थांमध्ये नागपूरच्या नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या धर्तीवर अद्ययावत व अत्याधुनिक सोयी सुविधा विकसित करण्यासाठी अनमोल मार्गदर्शन लाभणार असल्याची माहिती आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.



नागपूर येथील नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमध्ये उपलब्ध असलेली अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित निदान व उपचार पद्धती, रुग्णाभिमुख पायाभूत सुविधा, स्वच्छता, सुरक्षितता, तसेच नियोजनबद्ध कार्यपद्धती या सर्व आदर्श बाबींची अंमलबजावणी धाराशिव येथील या दोन्ही शासकीय आरोग्य संस्थांमध्ये राबविण्याची तयारी इन्स्टिट्यूटने उत्स्फूर्तपणे दर्शवली आहे. त्यामुळे धाराशिवमधील आरोग्यसेवेची गुणवत्ता आणि दर्जा केवळ जिल्हास्तरावर न राहता राज्य व देशपातळीवरील होण्याची अपेक्षा आहे. या संदर्भात मित्रचे उपाध्यक्ष आ. पाटील यांनी नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटचे संचालक शैलेश जोगळेकर यांची नागपूर येथे भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांना उच्च दर्जाच्या आरोग्य सेवा स्थानिक पातळीवरच उपलब्ध व्हाव्यात, यासाठी या दोन्ही रुग्णालयांच्या इमारती, अंतर्गत रचना, उपकरणांची मांडणी, रुग्णसेवेची प्रणाली व मनुष्यबळाचे नियोजन हे सर्व नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटच्या धर्तीवर विकसित करण्याची विनंती आमदार पाटील यांनी केली.

या विनंतीला जोगळेकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक ते मार्गदर्शन व तांत्रिक सहकार्य देण्याची तयारी दर्शवली. नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूट मध्ये प्रत्येक पेशंट सोबत एक आरोग्य सेवक जोडून देण्यात येतो, जो त्या रुग्णासाठी डॉक्टरांच्या वेळ घेणे, त्यासाठी आवशयक असलेल्या तपासणी व इतर अनुषंगिक बाबीसाठी मदत करतो. अगदी त्याच पद्धतीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व जिल्हा सामान्य रुग्णालयात ही सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न असल्याचेही आ. पाटील यांनी नमूद केले आहे.

या पुढील टप्प्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. शैलेंद्र चव्हाण, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्यासह बांधकाम विभागाचे संबंधित कार्यकारी अभियंता, वास्तुविशारद आणि कंत्राटदार यांचा समावेश असलेले पथक लवकरच नागपूर येथे भेट देणार आहे.

या दौऱ्यात नॅशनल कॅन्सर इन्स्टिट्यूटमधील इमारत रचना, वैद्यकीय यंत्रसामग्रीची मांडणी, रुग्णवाहतूक व्यवस्था, आपत्कालीन सेवा, आयसीयू, ऑपरेशन थिएटर, स्वच्छता व देखभाल व्यवस्थेचा सखोल अभ्यास केला जाणार आहे. त्यानंतर धाराशिव येथील प्रकल्पात त्या सर्व बाबी प्रभावीपणे कशा राबवता येतील, याचा आराखडा निश्चित करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे धाराशिव जिल्ह्यातील रुग्णांना उपचारांसाठी मोठ्या शहरांकडे धाव घेण्याची गरज कमी होणार असून, किफायतशीर, वेळेवर आणि दर्जेदार आरोग्यसेवा जिल्ह्यातच उपलब्ध होणार आहे.

तसेच शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या माध्यमातून वैद्यकीय शिक्षणाचा दर्जाही उंचावणार असून, जिल्ह्याच्या आरोग्य व्यवस्थेत ही योजना एक मैलाचा दगड ठरणार असल्याचे मत व्यक्त आ. पाटील यांनी व्यक्त केले आहे.

### धाराशिवच्या जनतेला उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी प्रयत्न...

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेबांनी नागपूर येथे जागतिक दर्जाचे कर्करोग उपचार रुग्णालय स्थापन करण्याचा दूरदृष्टीपूर्ण संकल्प केला होता. हा संकल्प प्रत्यक्षात उतरवत सन २०२३ मध्ये नागपूर येथे अत्याधुनिक व जागतिक मानकांचे कॅन्सर रुग्णालय यशस्वीरीत्या कार्यान्वित करण्यात आले आहे. त्याच धर्तीवर, धाराशिव जिल्ह्यातील नागरिकांनाही दर्जेदार, अद्ययावत व सर्वसमावेशक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथरावजी शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार सकारात्मक आहेत. धाराशिवच्या जनतेला अशाच उच्च दर्जाच्या आरोग्य सुविधा मिळाव्यात, यासाठी आपणही सातत्याने प्रयत्नशील असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे

## १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

एका गावातील १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार झाल्याची गंभीर घटना उघडकीस आली असून, या प्रकरणी नळदुर्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडित मुलीचे नाव व गाव गोपनीय ठेवण्यात आले आहे.



पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, दि.१५ डिसेंबर रोजी दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास पीडित मुलगी घरात एकटी असताना गावातील एका तरुणाने तिच्या घरी येऊन तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

या घटनेनंतर पीडित मुलगी व तिचे नातेवाईक आरोपी तरुणास जाब विचारत असताना, संबंधित तरुणाने जातीवाचक शिवीगाळ करत पीडितेच्या भावास लाथाबुक्यांनी मारहाण केली. याचवेळी आरोपीसह इतर तीन तरुणांनीही पीडितेच्या भावास जातीवाचक शिवीगाळ करून लोखंडी रॉड, काठी व दगडाने मारहाण करत जखमी केले, तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी पीडितेने दि.१७ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून नळदुर्ग पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता कलम ६४, ६५, ११८ (१), ११५ (२), ३५२, ३५१ (२) तसेच पोक्सो कायद्यातांर्गत गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास नळदुर्ग पोलीस करीत असून, आरोपींच्या अटकेसाठी आवश्यक ती कारवाई सुरू असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

## धाराशिवमध्ये लिपीकांच्या मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी निवेदन सादर

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.१८ डिसेंबर -**

जय महाराष्ट्र शासकीय निमशासकीय अधिकारी कर्मचारी संघटना, महाराष्ट्र राज्य शाखा, धाराशिव जिल्हा व उमरगा कार्यकारिणीच्या वतीने लिपीकांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी कळंब-धाराशिवचे आ. कैलास घाडगे पाटील आणि उमरग्याचे आ. प्रविण स्वामी यांना लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.



निवेदनात चौथ्या वेतन आयोगानंतर वेतननिर्धारणात झालेल्या त्रुटी दूर करण्याची, लिपीक संवर्गाच्या पदनामात आवश्यक बदल करण्याची आणि जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात संघटनेने सातत्याने शासनस्तरावर पाठपुरावा केला असून, विधीमंडळाच्या नागपूर अधिवेशनाच्या काळात भव्य आक्रोश मोर्चाचे आयोजन केले होते.

मोर्चामध्ये धाराशिव जिल्ह्यातून संघटनेचे शेकडो लिपीक व कर्मचारी सहभागी झाले.

लिपीक संवर्गावरील अन्यायकारक बाबी, वेतनविषयक त्रुटी आणि जुनी पेन्शन योजना लागू करण्याच्या मागण्या यासंदर्भात शासनाचे लक्ष वेधण्यात आले, अशी माहिती संघटनेचे जिल्हा अध्यक्ष भास्कर कोल्हे आणि सचिव जमीर पटेल यांनी दिली.

आंदोलनाची आणि निवेदनाची दखल घेत आमदार कैलास घाडगे पाटील व आमदार प्रविण स्वामी यांनी विधीमंडळात लिपीकांच्या प्रश्नांना वाचा फोडत अधिकृतपणे उपस्थित केले. त्यामुळे लिपीक संवर्गातील कर्मचाऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, त्यांच्या प्रश्नांना न्याय मिळेल असा विश्वास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

यावेळी संघटनेचे उपाध्यक्ष पद्माकर कुलकर्णी, लक्ष्मण गिरी, विलास बेसके, कोषाध्यक्ष सतिष सोमाणी, कार्याध्यक्ष शैलेश ताटे, मार्गदर्शक नागनाथ कुंभार यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. संघटनेने येत्या काळातही या मागण्यांच्या पूर्ततेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा सुरू ठेवण्याचे आश्वासन दिले.

## धाराशिव शहरात घरफोडी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

धाराशिव शहरात घरफोडीची घटना घडली असून, अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून सुमारे १ लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी शुद्धोधन गायकवाड (वय २७), रा. कुरणेनगर, धाराशिव हे कुटुंबासह लग्न समारंभासाठी लातूर येथे गेले होते. त्यावेळी त्यांच्या राहत्या घराच्या दरवाज्याच्या मोकळ्या फटीतून दि.१४ डिसेंबर रोजी रात्री अज्ञात व्यक्तीने घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम ९६,००० रुपये, असा एकूण १,६५,५१३ रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

# तेरखेडा जिओ टॉवरची अवस्था असून वळिंबा नसून खोळंबा

## अनेक वर्षांपासून नो नेटवर्क, नागरिक त्रस्त

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ डिसेंबर -**


आधुनिक युगात तंत्रज्ञान झपाट्याने प्रगत होत असताना तेरखेडा येथील जिओ टॉवर मात्र अनेक वर्षांपासून जागेवरच अडकून पडलेला दिसत आहे. नेटवर्कची समस्या सतत भेडसावत असतानाही संबंधित जिओ प्रशासनाकडून याची कोणतीही दखल घेतली जात नसल्याचे चित्र आहे.

धाराशिव जिल्ह्यातील महत्त्वाचे गाव म्हणून ओळख असलेल्या वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे फटाका उद्योगासह अनेक लघुउद्योग मोठ्या प्रमाणात कार्यरत आहेत.

त्यामुळे नागरिक, व्यापारी तसेच अधिकारी यांची येथे रोजची वर्दळ असते.

आजच्या सोशल मीडियाच्या आणि ऑनलाइन व्यवहारांच्या युगातही या गावातील जिओ नेटवर्क सतत गायब होत असल्याने नागरिकांना प्रचंड अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेष म्हणजे वीज गेली की टॉवरवर जनरेटरची कोणतीही व्यवस्था नसल्यामुळे नेटवर्क पूर्णपणे बंद पडते. त्यानंतर वीज येईपर्यंत नागरिकांना रेंजची वाट पाहावी लागते. ऑनलाइन कामे, शासकीय सेवा, बँकिंग व्यवहार, विद्यार्थी आणि व्यापारी यांचे काम यामुळे पूर्णपणे ठप्प होत आहे.

तात्काळ तेरखेडा येथील जिओ टॉवरची दुरुस्ती करून नेटवर्क व्यवस्था सुरळीत करावी, अन्यथा गावातील सर्व नागरिक जिओचे नंबर पोर्ट करण्याचा सामूहिक निर्णय घेतील, असा इशारा नागरिकांनी दिला आहे. तेरखेडा जिओ टॉवरची सद्यस्थिती पाहता असून वळिंबा नसून खोळंबा असेच म्हणावे लागेल.




# कळंब शहरात चोरट्यांची दहशत : नागरिकांची झोप उडाली; पोलीसांची गस्त 'नावा'लाच?

**तभा वृत्तसेवा**
**कळंब, दि.१८ डिसेंबर -**

कळंब शहरात गेल्या काही दिवसांपासून चोरट्यांच्या वाढत्या हालचालींमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. शहरातील पापडे गल्ली व मुंडे गल्ली येथील रहिवाशांनी चोरट्यांच्या भीतीने सलग दोन रात्री जागून काढल्या. चोरटे मोकाट फिरत असताना पोलीस गस्त प्रत्यक्षात सुरू आहे की केवळ नावापुरती, असा थेट सवाल आता नागरिकांकडून केला जात आहे.



कळंब शहराची ओळख जिल्ह्यातील मोठी बाजारपेठ म्हणून आहे. येथे आडत, कापड, सोन्याचे व्यापारी मोठ्या प्रमाणात असून दररोज तालुक्यासह धाराशिव व बीड जिल्ह्यातून हजारो नागरिक खरेदीसाठी येतात. मात्र, गेल्या काही दिवसांपासून कळंब पोलीस ठाणे हद्दीत शहर व ग्रामीण भागात चोरीच्या घटनांमध्ये चिंताजनक वाढ झाली आहे. आता तर शहराच्या मध्यवस्तीतच चोरट्यांची खुलेआम वर्दळ सुरू झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

चोरट्यांच्या वाढत्या दहशतीमुळे कळंबकरांचा संयम संपत चालला आहे. पोलीस प्रशासन व नगरपालिका यंत्रणेने तात्काळ ठोस उपाययोजना केल्या नाहीत, तर नागरिक थेट रस्त्यावर उतरून आंदोलन करण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त होत आहे.

### बंद स्ट्रीट लाईट्स, चोरट्यांना मोकळे रान...



कळंब शहरातील अनेक भागांतील वीज खांबांवरील स्ट्रीट लाईट्स बंद अवस्थेत आहेत. अंधाराचा फायदा घेत भुरट्या चोऱ्यांचे प्रमाण वाढत असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. नगरपालिकेने तातडीने शहरातील सर्व पोलवरील लाईट्स सुरू कराव्यात, अन्यथा चोरट्यांचा धुमाकूळ आणखी वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

### पोलीस गस्त नेमकी कुठे?...



शहरात रात्रभर पोलीस गाडी फिरते, असा दावा केला जातो. मात्र प्रत्यक्षात गस्त नेमकी कुठल्या भागात असते, असा सवाल नागरिकांकडून उघडपणे विचारला जात आहे. चोरटे मोकाट फिरत असताना पोलीस यंत्रणा केवळ पाहणारी भूमिका घेत आहे का, अशी तीव्र भावना व्यक्त होत आहे. शहरातील सर्व भागांत प्रभावी व नियमित गस्त वाढवावी, अशी ठाम मागणी होत आहे.

### दोन रात्री चोरटे, नागरिकांची झोप हराम...



शहरातील जुन्या गावातील पापडे गल्ली व मुंडे गल्ली येथे सलग दोन दिवस चोरटे आल्याची जोरदार चर्चा आहे. काही नागरिकांना मध्यरात्री अचानक जाग आल्यावर गल्लीत संशयास्पद हालचाली दिसून आल्या. तात्काळ इतर रहिवाशांना फोनद्वारे सतर्क करण्यात आले. मात्र नागरिक जमा होताच चोरट्यांनी अंधाराचा फायदा घेत पळ काढला. दुसऱ्या दिवशी मध्यरात्री चोरट्यांनी हजेरी लावल्याची चर्चा असून त्या रात्रीही ते पसार झाले. परिणामी, दोन्ही गल्ल्यांतील नागरिकांना सलग दोन रात्री जागरण करावे लागले.

**सोलापूर तरुण भारत**, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, धाराशिव, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# सामाजिक कार्यकर्त्या हर्षु ठाकुर यांना धमकी

## नळदुर्ग पोलीस ठाण्यात निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ डिसेंबर -**

नांदेड येथील सलमान शेख या इसमाने सामाजिक कार्यकर्त्या हर्षुताई ठाकुर यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करत जीवे मारण्याची व बदनामी करण्याची धमकी दिल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी सकल हिंदू समाज, नळदुर्ग यांच्या वतीने नळदुर्ग पोलीस ठाण्यात लेखी निवेदन देण्यात आले आहे.

हर्षुताई ठाकुर या गोरक्षण, महिलांवरील अन्याय, फसवणूक तसेच मानसिक शोषणाविरोधात जनजागृतीचे कार्य करत असून, त्यांच्या सामाजिक कामामुळे संबंधित इसमाकडून मागील काही दिवसांपासून मोबाईल व सोशल मीडियाच्या माध्यमातून सातत्याने धमक्या दिल्या जात असल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे.

या धमक्यांमुळे हर्षुताई ठाकुर या मानसिक तणावाखाली असून त्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

महिलेला उद्देशून धमकी देणे, मानसिक छळ करणे तसेच सामाजिक कार्य थांबवण्यासाठी दबाव टाकणे हा गंभीर गुन्हा असल्याने संबंधित इसमाविरुद्ध भारतीय दंड संहितेतील लागू कलमान्वये तातडीने गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी सकल हिंदू समाजाने केली आहे.



तसेच भविष्यात कोणतीही अनुचित घटना घडल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित इसमावर राहील, याची नोंद प्रशासनाने घ्यावी व हर्षुताई ठाकुर यांना आवश्यक ते पोलीस संरक्षण देण्यात यावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

या निवेदनावर सकल हिंदू समाजाच्या पदाधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या असून, पोलीस प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन तातडीने कारवाई करावी, अन्यथा समाजात तीव्र प्रतिक्रिया उमटू शकतात, असा इशाराही देण्यात आला आहे.

# आता तुळजाभवानीच्या पुजाऱ्यांना बायोमेट्रिक ओळखपत्र

## बोगस पुजाऱ्यांना आळा घालण्यासाठी मंदिर संस्थानचा महत्त्वपूर्ण निर्णय

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१८ डिसेंबर -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानी मातेच्या मंदिरात पारंपारिक वंशपरंपरेने पुजारी असणाऱ्या अधिकृत पुजाऱ्यांना बायोमेट्रिक ओळखपत्र देण्याच्या प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली आहे.

ही प्रक्रिया तहसीलदार तथा तुळजाभवानी मंदिर संस्थानच्या व्यवस्थापक माया माने यांच्या उपस्थितीत सुरू करण्यात आली. यावेळी धार्मिक सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोसले, रामेश्वर वाले, तसेच पुजारी मंडळाचे अध्यक्ष विपीन शिंदे, धनंजय लोंढे आदी मान्यवर उपस्थित होते. पुजारी मंडळाच्या कार्यालयात पुजाऱ्यांकडून आवश्यक कागदपत्रे स्वीकारली जात असून, कागदपत्रांची पडताळणी करूनच त्या फाईली मंदिर कार्यालयात सादर करण्यात येणार आहेत. कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झालेल्या पुजाऱ्यांना बायोमेट्रिक ओळखपत्रासाठी दूरध्वनीद्वारे संपर्क केला जाणार आहे. विनाकारण मंदिर कार्यालयात चौकशी करून गर्दी करू नये, तसेच काही सूचना असल्यास थेट पुजारी मंडळाशी संपर्क साधावा, असे आवाहन केले आहे.

### बोगस पुजाऱ्यांना आळा...

मागील अनेक वर्षांपासून तुळजाभवानी मंदिर परिसरात बनावट व बोगस पुजारी धोतर परिधान करून वावरत होते. देवीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना स्वतः पुजारी असल्याचे भासवून त्यांची फसवणूक केल्याच्या अनेक तक्रारी मंदिर संस्थानकडे दाखल झाल्या होत्या. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी मंदिर संस्थानने अधिकृत पुजाऱ्यांना बायोमेट्रिक ओळखपत्र देण्याचा निर्णय घेतला असून या निर्णयाचे पुजाऱ्यांकडून स्वागत करण्यात येत आहे. या निर्णयामुळे भविष्यात बनावट व बोगस पुजाऱ्यांवर नियंत्रण राहून भाविकांची होणारी फसवणूक थांबण्यास मदत होणार आहे.

# कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालयास शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणात 'ए' ग्रेड

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१८ डिसेंबर -**



डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर अंतर्गत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, बार्शी संचलित कर्मवीर मामासाहेब जगदाळे महाविद्यालय, वाशी या महाविद्यालयास शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षणमध्ये 'ए' ग्रेड प्राप्त झाला आहे.

सदर अंकेक्षणात ४५० पैकी ३१७ गुण मिळवून महाविद्यालयाने धाराशिव जिल्ह्यात नावलौकिक प्राप्त महाविद्यालयांमध्ये आपले स्थान अधोरेखित केले आहे.

सन १९७२ मध्ये स्थापन झालेल्या या महाविद्यालयात कला, विज्ञान, वाणिज्य तसेच बी.सी.एस. आणि बी.सी.ए. (संगणकशास्त्र) या अभ्यासक्रम द्वारे पदवीपर्यंतचे शिक्षण दिले जाते. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा सुविधा महाविद्यालयात उपलब्ध असून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना येथे प्रोत्साहन दिले जाते. या सर्व बाबींचे मूल्यमापन सदर अंकेक्षणात करण्यात आले आहे. नॅक मूल्यांकनानंतर या अंकेक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ.बी. वाय. यादव, उपाध्यक्ष नंदनजी जगदाळे, सचिव पी.टी. पाटील, खजिनदार जयकुमार शितोळे, सहसचिव अरुण देबडवार यांनी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. अशोक कदम, नॅक प्रमुख प्रा.डॉ. बालाजी देवकते तसेच सर्व प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

### स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी लागू करा : खा. निंबाळकर

**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

देशातील शेतकरी गंभीर आर्थिक संकटात सापडला असून, त्यांना दिलासा देण्यासाठी स्वामीनाथन आयोगाच्या शिफारशी तात्काळ व पूर्णपणे अंमलात आणाव्यात, अशी ठाम मागणी खासदार ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभेत पुरवणी मागण्यांच्या चर्चेदरम्यान केली.

उत्पादन खर्चावर किमान ५० टक्के नफा देणारी हमीभाव व्यवस्था शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. वाढती महागाई, खत-बियाण्यांचे दर, मजुरी खर्च व नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकरी अडचणीत असल्याने सरकारने केवळ घोषणा न करता ठोस निर्णय घ्यावेत, अशी मागणी त्यांनी केली.

# बेंबळीत बोगस डॉक्टराचा धक्कादायक प्रकार; तोतयेगिरी करून रुग्णावर चुकीचे उपचार

## बॉम्बे नर्सिंग होम क्टचे प्रमाणपत्र नसताना बनावट प्रिस्क्रिप्शन वापरल्याचा आरोप...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

बेंबळी येथे बोगस डॉक्टरगिरीचा गंभीर प्रकार उघडकीस आला असून, वैध परवाना नसताना व एमबीबीएस असल्याचे भासवून चुकीचे उपचार केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



आरोपीचे नाव सुधीर मुरलीधरराव झिंगाडे, (रा. बेंबळी, ता.जि. धाराशिव) असे आहे. तक्रारीनुसार आरोपीकडे बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत कोणतेही वैध प्रमाणपत्र नसताना, तसेच त्याची शैक्षणिक पात्रता डी.एम.एस. असतानाही त्याने एमबीबीएस पदवीधारक असल्याचे भासवून बनावट मेडिकल प्रिस्क्रिप्शन तयार केले.

दि.१ जून रोजी बेंबळी येथे आरोपीने आकाश गोरोबा चव्हाण (रा. रुईभर) यांच्यावर निष्काळजीपणे व चुकीचे उपचार केले. या उपचारांमुळे रुग्णास गंभीर दुखापत होऊन त्याच्या आरोग्यास धोका निर्माण झाला, तसेच फसवणूक झाल्याचा आरोप तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी फिर्यादी डॉ. विशाल सखाराम पवार (वय २६), वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र बेंबळी, रा. पवार निवास, धाराशिव रोड, तुळजापूर यांनी दि.१७ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून बेंबळी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (३), ३३६ (३), ३४० (२), १२५ (अ) (ब) तसेच महाराष्ट्र वैद्यकीय व्यवसाय अधिनियम १९६१ कलम ३ व ६ आणि महाराष्ट्र नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास बेंबळी पोलीस करीत असून, आरोपीविरुद्ध कठोर कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# बावची विद्यालयातील विद्यार्थ्यांची परंडा किल्ल्यास शैक्षणिक भेट व स्वच्छता मोहीम

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

बावची येथील विद्यालयातील विद्यार्थ्यांनी अलीकडेच ऐतिहासिक परंडा किल्ल्यास शैक्षणिक भेट दिली. विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहासाची प्रत्यक्ष माहिती मिळावी तसेच स्वच्छतेचे महत्त्व पटावे, हा या क्षेत्रभेटीचा मुख्य उद्देश होता.

**विद्यार्थ्यांना स्थानिक इतिहासाची प्रत्यक्ष माहिती..**

या भेटीदरम्यान शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परंडा किल्ल्याचा ऐतिहासिक वारसा, त्याची स्थापत्यकला व ऐतिहासिक महत्त्व सविस्तरपणे समजावून सांगितले.

विद्यार्थ्यांनी किल्ल्याची पाहणी करत इतिहासाबाबत माहिती घेतली. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये इतिहासाविषयी उत्सुकता तसेच आपल्या वैभवशाली वारशाबद्दल अभिमानाची भावना निर्माण झाली.

या शैक्षणिक भेटीच्या निमित्ताने विद्यार्थ्यांनी किल्ला परिसरात स्वच्छता मोहीम राबवली.

प्लास्टिक कचरा, कागद व इतर घाण गोळा करून परिसर स्वच्छ करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखण्याचा संदेश विद्यार्थ्यांनी यावेळी दिला.

या उपक्रमासाठी विद्यालयातील शिक्षकवृंदांचे मार्गदर्शन लाभले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, पर्यावरण संवर्धनाची भावना तसेच इतिहासाविषयी आदर निर्माण होतो, असे मत उपस्थित शिक्षकांनी व्यक्त केले.



# प्रवासी व विद्यार्थ्यांसाठी वेळेवर बससेवेची मागणी

## रूपामाता फाऊंडेशनतर्फे एस. टी. आगार व्यवस्थापकांना निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

पाडोळी (आ.) सह जिल्ह्यातील ग्रामीण प्रवासी व विद्यार्थ्यांना वेळेवर बससेवा उपलब्ध करून देण्याच्या मागणीसाठी रूपामाता फाऊंडेशनच्या वतीने राज्य परिवहन महामंडळ, धाराशिव आगार व्यवस्थापकांना निवेदन देण्यात आले. रूपामाता उद्योग समूहाचे कार्यकारी संचालक तथा फाऊंडेशनचे सचिव ॲड. अजित गुंड-पाटील यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन हे निवेदन सादर केले.



निवेदनात दि.११ रोजी पाडोळी (आ.) गावासाठी बस वेळेवर न सुटल्याने धाराशिव बसस्थानकात नागरिक व विद्यार्थ्यांनी ठिय्या आंदोलन केल्याची गंभीर बाब नमूद करण्यात आली आहे. या आंदोलनाचे नेतृत्व जिल्हा परिषदचे माजी उपाध्यक्ष तथा भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुधाकर गुंड गुरुजी यांनी केले होते.

ग्रामीण भागात बससेवा वेळेवर उपलब्ध न झाल्यामुळे प्रवाशांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून, विशेषतः महाविद्यालयीन विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे, असे ॲड. गुंड-पाटील यांनी सांगितले. तसेच परिवहनमंत्री तथा पालकमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिलेल्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी मागणीही निवेदनात करण्यात आली.

यावेळी आगार व्यवस्थापक बालाजी भांगे यांनी निवेदन स्वीकारून तातडीने योग्य उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले.

या प्रसंगी अनिकेत नवले, गजानन पाटील यांच्यासह आगारातील अधिकारी उपस्थित होते.

# श्रीक्षेत्र मैलारपुरचा तीर्थक्षेत्र विकास योजनेतून सर्वांगीण विकास करण्याची मागणी





**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ डिसेंबर -**

नळदुर्ग येथील ऐतिहासिक व धार्मिक वारसा लाभलेल्या श्रीक्षेत्र मैलारपुरचा तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत सर्वांगीण विकास करून भाविकांसाठी कायम स्वरूपी सोईसुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी जोरदार मागणी भाविक व नागरिकांतून होत आहे.

श्रीक्षेत्र मैलारपुर येथील श्री खंडोबा देवाला शेकडो वर्षांचा इतिहास असूनही हे तीर्थक्षेत्र आजही विकासापासून कोसो दूर आहे. नळदुर्ग हे केवळ ऐतिहासिक शहर नसून प्राचीन काळापासून देवदेवतांच्या वास्तव्याने पावन झालेली भूमी म्हणून ओळखले जाते. श्रीक्षेत्र मैलारपुरसह श्रीक्षेत्र रामतीर्थ, श्रीक्षेत्र भीमाशंकर आणि राजगुरू श्री शिवलिंगेश्वर महाराज यांचे वास्तव्य नळदुर्ग भूमीत प्राचीन काळापासून आहे.

श्रीक्षेत्र रामतीर्थ येथे प्रभू श्रीरामांचे दोनदा वास्तव्य होते, तर श्रीक्षेत्र भीमाशंकर हे नल-दमयंती यांच्या पुनर्विवाहाचे स्थळ मानले जाते. त्यामुळे नळदुर्ग शहराला हिंदू धर्मग्रंथांमध्ये अनन्यसाधारण महत्त्व आहे. याच पवित्र भूमीत श्री खंडोबा व माता बाणाई यांचा विवाह झाला असल्याची धार्मिक मान्यता आहे.

इतिहासानुसार, नळदुर्ग शहरात श्री खंडोबा देवाचे एकूण पाच ठिकाणी वास्तव्य झाले आहे. सुरुवातीला ऐतिहासिक नळदुर्ग किल्ल्यात दोन ठिकाणी, त्यानंतर ब्राह्मण गल्ली, मग मैलारपुर येथील जुने मंदिर आणि सध्या अस्तित्वात असलेले मंदिर हे पाचवे स्थान आहे. मात्र यातील अनेक पवित्र स्थळे आज दुर्लक्षित अवस्थेत असून त्यांचा जीर्णोद्धार होणे अत्यंत आवश्यक आहे.



सध्या मैलारपुर येथे जुने व नवे अशी दोन मंदिरे आहेत. यातील नवे मंदिर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी बांधलेले आहे. येथे दरवर्षी पौष पौर्णिमेला भरणाऱ्या खंडोबा यात्रेला ५ ते ६ लाख भाविक महाराष्ट्रासह आंध्र प्रदेश, कर्नाटक व तेलंगणातून उपस्थित राहतात. तरीही हे तीर्थक्षेत्र आजही दुर्लक्षितच आहे.

श्री खंडोबा देवाचे पावणे दोन महिने मैलारपुर येथे तर उर्वरित कालावधी अणदुर येथे वास्तव्य असते. दोन्ही ठिकाणच्या मानकऱ्यांमध्ये याबाबत लेखी करार आहे. मात्र वर्षभर भाविक दर्शनासाठी येत असतानाही येथे स्वच्छतागृहे, स्नानगृहे, निवास व्यवस्था, स्वच्छ बोरी नदी घाट अशा मूलभूत सुविधांचा अभाव आहे. जुन्या स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय असून महिला भाविकांची मोठी गैरसोय होत आहे.

भाविक बोरी नदीत स्नान करून दर्शनासाठी येतात, मात्र नदी व घाटाची स्वच्छता आणि स्नानगृहांची व्यवस्था नसणे ही मोठी शोकांतिका आहे. मंदिर परिसराचा विकास, रस्ते रुंदीकरण, व्यापाऱ्यांसाठी कायमस्वरूपी दुकाने, सुलभ शौचालये, स्नानगृहे व निवास व्यवस्था करणे अत्यावश्यक आहे.

सध्या नळदुर्ग नगरपालिका व श्री खंडोबा देवस्थान ट्रस्ट आपल्या परीने सुविधा देण्याचा प्रयत्न करतात, मात्र त्या अपुऱ्या ठरतात. त्यामुळे श्रीक्षेत्र मैलारपुरला तातडीने तीर्थक्षेत्राचा दर्जा देऊन तीर्थक्षेत्र विकास योजनेत समाविष्ट करावे, तसेच खंडोबा यात्रेसाठी विशेष यात्रा अनुदान द्यावे, अशी मागणी होत आहे.

माजी आमदार मधुकरराव चव्हाण यांच्या काळात काही प्रमाणात विकास झाला होता.

आता आमदार राणा जगजितसिंह पाटील यांनी राज्य सरकारकडे पाठपुरावा करून मैलारपुरचा सर्वांगीण विकास साधावा, अशी अपेक्षा भाविक व नागरिक व्यक्त करत आहेत.

धाराशिव
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## आपसिंगा येथील शिक्षकाच्या आर्थिक छळाचा निषेध

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

तुळजापूर तालुक्यातील आपसिंगा येथील नरेंद्र आर्य विद्यालयातील शिक्षक बी.टी. गोरे यांच्यावर मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराद्वारे आर्थिक छळ होत असल्याचा निषेध शिक्षक संघाने व्यक्त केला आहे.

शिक्षक संघाच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयाच्या माध्यमातून मुख्यमंत्री व शालेय शिक्षण मंत्र्यांकडे निवेदन पाठवले आहे. निवेदनात म्हटले आहे की, बी.टी. गोरे यांना जुलै २०२४ आणि जुलै २०२५ या दोन वेतनवाढी तसेच वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ अयोग्यरित्या रोखले गेले आहेत. तसेच शिक्षणाधिकारी कार्यालयाला पत्र पाठवून दिशाभूल व फसवणूक करण्यात आली आहे. यात शिक्षकांना प्रलंबित वेतनवाढी व वरिष्ठ वेतनश्रेणीचे लाभ त्वरित द्यावेत, मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीच्या गैरकारभाराची एसआयटी चौकशी करून शाळेवर प्रशासक नियुक्त करावा, अन्यथा आंदोलनासारख्या अप्रिय घटना उद्भवू शकतात.

निवेदनावर जे.एस. शेरखाने आणि रमण जाधव यांची स्वाक्षरी आहे.

# नळदुर्ग शहरातील सार्वजनिक स्वच्छतागृहाची दयनीय अवस्था



स्वच्छ नळदुर्ग, सुंदर नळदुर्ग उपक्रम फक्त कागदावरच...

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१८ डिसेंबर -**

नळदुर्ग शहरातील मराठा गल्ली येथील सार्वजनिक स्वच्छतागृहाची अत्यंत दयनीय अवस्था झाली असून, सर्वत्र घाणीचे साम्राज्य पसरले आहे. स्वच्छतागृहापर्यंत जाण्यासाठी नीटसा रस्ताही नसून परिसरात काटेरी झुडपे वाढलेली आहेत. त्यामुळे स्वच्छ नळदुर्ग, सुंदर नळदुर्ग या घोषणेची अक्षरशः धिंडवडे निघाल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. या गंभीर प्रकारास नगरपालिकेचा स्वच्छता विभाग पूर्णपणे जबाबदार असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे.

नळदुर्ग शहराच्या स्वच्छतेसाठी नगरपालिका दरमहा सुमारे १२ लाख रुपये खर्च करत आहे. मात्र असे असतानाही शहरातील अनेक भागांत कचऱ्याचे ढिगारे साचलेले दिसून येतात. विशेष म्हणजे नगरपालिकेच्या वतीने बांधण्यात आलेली सार्वजनिक स्वच्छतागृहे वेळेवर स्वच्छ न केल्यामुळे त्यांची मोठी दुरवस्था झाली आहे.

नगरपालिकेने शहर स्वच्छतेसाठी काढलेल्या टेंडरमध्ये सार्वजनिक स्वच्छतागृहांची स्वच्छता करणेही स्पष्टपणे नमूद असते.

मात्र मराठा गल्ली येथील स्वच्छतागृहाची अवस्था पाहता स्वच्छतेवर खर्च होणारा एवढा मोठा निधी नेमका कुठे जातोय, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहर अस्वच्छ असेल तर महिन्याला खर्च होणारे १२ लाख रुपये कुणाच्या घशात जात आहेत? केवळ ठेकेदार पोसण्यासाठीच नगरपालिका टेंडर काढते की काय, असा संशय नागरिकांमध्ये निर्माण झाला आहे.

शहर स्वच्छतेचा ठेका घेतलेल्या कंपनीकडून काम करून घेण्याची जबाबदारी नगरपालिकेच्या स्वच्छता विभागाची आहे. मात्र सध्याची परिस्थिती पाहता स्वच्छता विभाग अस्तित्वात आहे की नाही, असा सवाल उपस्थित होत आहे.

संबंधित कंपनीकडून योग्य काम होत नसेल तर त्यांचा ठेका रद्द करण्याचा अधिकार नगरपालिकेला असतानाही प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे. परिणामी ठेकेदार शहर स्वच्छतेच्या कामात कुचराई करत असल्याचा आरोप होत आहे.

मराठा गल्ली येथील स्वच्छतागृहात ना लाईटची व्यवस्था आहे, ना पाण्याची सुविधा अनेक महिन्यांपासून स्वच्छता न झाल्याने संपूर्ण परिसर घाणीने भरलेला आहे.

तरीही मजबुरीमुळे नागरिक या अस्वच्छ स्वच्छतागृहाचा वापर करत असून त्यामुळे त्यांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे.

नगरपालिका प्रशासनाने तात्काळ या स्वच्छतागृहाची स्वच्छता करावी, लाईट व पाण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी तसेच स्वच्छतागृहापर्यंत जाण्यासाठी व्यवस्थित रस्ता तयार करावा, अशी जोरदार मागणी संतप्त नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## आनंदनगर परिसरात घरफोडी; ६१ हजारांचा मुद्देमाल चोरीला

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

आनंदनगर पोलीस ठाणे हद्दीत घरफोडीची घटना घडली असून, कुटुंबीय बाहेरगावी असताना अज्ञात चोरट्याने घराचे कुलूप तोडून सुमारे ६१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी दिपक शिवाजी शेरखाने (वय ६३), रा. वरुडा रोड, समर्थ नगर, धाराशिव हे कुटुंबासह रत्नागिरी येथे गेले होते.

त्यांच्या अनुपस्थितीत दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी सकाळी ७.०० ते दि. १२ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ७.०० वाजेच्या दरम्यान अज्ञात व्यक्तीने त्यांच्या राहत्या घराचे कुलूप तोडून आत प्रवेश केला.

चोरट्याने घरातील १७ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, चांदीचे दागिने तसेच रोख रक्कम १०,००० रुपये, असा एकूण ६१,७७० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

या प्रकरणी फिर्यादी दिपक शेरखाने यांनी दि.१७ डिसेंबर रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

घटनेचा पुढील तपास आनंदनगर पोलीस करीत असून, अज्ञात चोरट्याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलीस सूत्रांकडून देण्यात आली आहे.

## प्रा. सत्येंद्र राऊत यांच्या निसर्ग काव्यसंग्रहाची जागतिक रेकार्डबुकमध्ये नोंद

**तभा वृत्तसेवा**
**अणदूर, दि.१८ डिसेंबर -**

अणदूर येथील जवाहर महाविद्यालय संस्कृत विभाग प्रमुख व ग्रीन क्लब समन्वयक डॉ. सत्येंद्र राऊत संपादित निसर्ग काव्यसंग्रहाची ए.सी.इ. या संस्थेने जागतिक रेकॉर्डबुकमध्ये नोंद घेतली, त्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

जागतिक पातळीवर या काव्यसंग्रहाची निवड झाल्याबद्दल ए.सी.इ. या संस्थेच्या डॉ. वंदना गुप्ता व अनिता गुप्ता यांच्या हस्ते मुंबई येथील ताज महाल पॅलेसमध्ये प्रा.राऊत यांना जागतिक रेकार्डबुकचे प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले. या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्ये असे आहेत कि महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील १३५ कवी व कवयित्रींच्या निसर्ग विषयावरील कविता आहेत. या



काव्यसंग्रहाच्या माध्यमातून समाजात निसर्गाविषयी आत्मीयता व पर्यावरणाचे जतन करण्याचा अनमोल संदेश दिला गेला आहे. काव्यसंग्रहातील शैक्षणिक, सामाजिक व सिने क्षेत्रातील मान्यवरांचे मनोगत आणि शुभेच्छा सर्वांसाठी प्रेरणादायक आहेत. हा काव्यसंग्रह प्रत्येक कवी, लेखक, शिक्षक, विद्यार्थी आणि निसर्गप्रेमींना नक्कीच प्रेरणा देणारा व आवडणारा आहे. अणदूर येथील प्रा.डॉ. सत्येंद्र राऊत व सहशिक्षिका दीपमाला खडके आणि ऐश्वर्या कदम यांनी हा काव्यसंग्रह विचारपूर्वक संपादित केला असून या तिन्ही संपादकाच्या प्रयत्नामुळे अर्थपूर्ण आणि प्रेरणादायी साहित्याची निर्मिती झाली आहे. या काव्यसंग्रहाची जागतिक पातळीवर नोंद झाल्याबद्दल

संस्थेचे सचिव रामचंद्र दादा आलुरे व महाविद्यालय विकास समितीचे सदस्य प्रा. भालचंद्र बिराजदार व ज्येष्ठ विधीज्ञ लक्ष्मीकांत पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी तसेच पत्रकार अजय अणदूरकर आणि महाविद्यालयीन सर्व प्राध्यापक बंधु भगिनी व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सर्व संपादकांचे अभिनंदन केले.

### प्रतिनिधी नेमणे आहेत...

सोलापूर तरुण भारत

**धाराशिव जिल्ह्यात खालील ठिकाणी वार्ताहर व एजंट त्वरीत नेमणे आहेत...**

**धाराशिव तालुका :** धाराशिव शहर प्रतिनिधी-१ (कमिशनवर) येडशी, तेर, ढोकी, कसबे तडवळे, बेंबळी, पाटोदा, पळसप, मुरुड.

**तुळजापूर तालुका :** तुळजापूर तालुका प्रतिनिधी, काटी, तामलवाडी, आरळी (बु.), मंगरूळ, काटगाव, किलज, सलगरा, वागदरी, नंदगाव.

**लोहारा तालुका :** लोहारा तालुका प्रतिनिधी, कानेगाव, भातागळी, सास्तुर, जेवळी, आष्टा, अचलेर, माकणी

**उमरगा तालुका :** नाईचाकुर, समुद्राळ, मुरूम ग्रामीण, बलसुर, येणेगुर, दाळींब, आलुर, बेळंब, कदेर, औराद, गुंजोटी, तलमोड, कुन्हाळी, तुरोरी, माडज, जेकेकुर.

**कळंब तालुका :** कळंब तालुका प्रतिनिधी, दहिफळ, सातेफळ, चोराखळी, रांजणी, शिराढोण, डिकसळ, इटकूर.

**वाशी तालुका :** पार्डी, सरमकुंडी, अजनसौंडा, गिरवली, पारगाव, हातोला, पारा, दसमेगाव, मांडवा, गोलेगाव.

**परंडा तालुका :** नालगाव, लोणी, कपीलपूरी, आवारप्रिंपी, आसू, कात्राबाद, सोनारी, डोंजा, अनाळा, रोहकल.

**भूम तालुका :** भूम शहर प्रतिनिधी, तालुका प्रतिनिधी, माणकेश्वर, वांगी ब्रु, वालवड, अंभी, पाथरूड, ईट.

**अनुभवास प्राधान्य :** पत्रकारितेची आवड असणाऱ्यांनी खालील पत्त्यावर दि.३० डिसेंबर २०२५ पर्यंत संपर्क साधावा.

**टीप-** इच्छुक वार्ताहरांनी कागद पत्रासह प्रत्यक्ष मुलाखतीस यावे. (अटी शर्ती लागू)

**: कार्यालय पत्ता :**

दैनिक सोलापूर तरूण भारत, धाराशिव जिल्हा आवृत्ती कार्यालय,रामदासी निवास, जिल्हा न्यायालयाच्या पाठीमागे, समर्थनगर, धाराशिव.

**- अनिल आगलावे**
(जिल्हा प्रतिनिधी), संपर्क मो.नं. ९७६७०९९७११

## शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.ग. शिंदे महाविद्यालयात ५३७ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी


### परंडा महाविद्यालयास 'तंबाखूमुक्त शाळा' प्रमाणपत्र प्रदान

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१८ डिसेंबर -**

शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.ग. शिंदे महाविद्यालय, परंडा येथे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. धनंजय चाकूरकर यांच्या सूचनेनुसार व उपजिल्हा रुग्णालय परंडा येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अबरार पठाण यांच्या मार्गदर्शनाखाली भव्य आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

हे शिबिर राष्ट्रीय तंबाखू नियंत्रण कार्यक्रम, राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम तसेच राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत राबविण्यात आले. या अंतर्गत महाविद्यालयातील एकूण ५३७ विद्यार्थ्यांची सविस्तर आरोग्य तपासणी करण्यात आली.

आरोग्य तपासणी डॉ. जयश्री यादव, डॉ. प्रशांत जाधव, औषध निर्माण अधिकारी तेजश्री शिंदे तसेच अधिपरिचारिका शिवगंगा गायकवाड



यांनी केली. यावेळी विद्यार्थ्यांसाठी आरोग्यविषयक जनजागृती शिबिरही घेण्यात आले.

शिबिरात विद्यार्थ्यांना शारीरिक, मानसिक व भावनिक आरोग्य, तंबाखू सेवनामुळे होणारे दुष्परिणाम तसेच राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमाबाबत सविस्तर मार्गदर्शन गुंजाळ तानाजी समुदेशक यांनी केले. तसेच तोंडाच्या कर्करोगाविषयी महत्त्वपूर्ण माहिती डॉ. आशिष भूयारे यांनी उपस्थित कर्मचारी व विद्यार्थ्यांना दिली.

या आरोग्य शिबिरास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील जाधव, उपप्राचार्य डॉ. महेश माने, पर्यवेक्षक किरण देशमुख, संतोष भिसे, शंकर कुठे, शंकर अंकुश, केशव रोटे, विजय जाधव, प्रताप घुटे, भाऊसाहेब माने, उत्तम कोकाटे, दीपक हुके, रामेश्वर गायकवाड, तसेच परवीन मोरवे, कीर्ती नलावडे, आरती खरे, प्रतिभा माने व महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या प्रसंगी शिक्षण महर्षी गुरुवर्य रा.ग. शिंदे महाविद्यालय, परंडा यास 'तंबाखूमुक्त शाळा' असल्याचे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले.

## २९ वर्षांनंतर शालेय वर्गमित्रांचा स्नेहमेळावा; आठवणींनी डोळे पाणावले



**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१८ डिसेंबर -**

तब्बल २९ वर्षांनंतर एकाच बेंचवर बसून शिक्षण घेतलेले शालेय वर्गमित्र-मैत्रिणी पुन्हा एकत्र आल्याने अनेकांच्या डोळ्यांच्या कडा पाणावल्या. उमरगा येथील स्वातंत्र्यानंतर स्थापन झालेल्या आदर्श विद्यालयाच्या सन १९९५-९६ च्या दहावीच्या वर्गातील विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि भावनिक वातावरणात पार पडला.

उमरगा शहराजवळील लातूर रोडवरील बिरूदेव मंदिरासमोरील हॉटेल एम. बी. रिसॉर्ट येथे या स्नेहमेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. यावेळी दिवंगत शिक्षक तसेच मित्र-मैत्रिणींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. या स्नेहमेळाव्यास माधुरी तडकले, अबोली नाईक, भाग्यश्री पाटील, ज्योती भांडेकर, राजश्री पाटील, सुलक्षणा पाटील, आरती ठाकूर, संजीवनी पाटील, अनिता मनगुळे, रूपाली शेळके, चंद्रदीप जाधव, शिवशंकर दंडगे, विवेक तपसाळे, लक्ष्मण पवार, प्रेमनाथ सरवदे, देवीदास भोसले, नेताजी ओवांडकर, किशोर नागदे, बालाजी जाधव, दिपक सुर्यवंशी, व्यंकट धुमाळ, संतोष हेबळे, राहुल दिवटे, संजय शेवाळे, धनराज मळे, दयानंद जाने, सिताराम स्वामी आदी उपस्थित होते.


# धाराशिवमध्ये कडाक्याची थंडी; नागरिकांनी घ्यावी काळजी



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१८ डिसेंबर -**

राज्यात दिवसेंदिवस तापमान खाली येत असून सर्वत्र तीव्र थंडी जाणवत आहे. उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे धाराशिव जिल्ह्यातही नागरिकांना कडाक्याची थंडी भासत आहे. हवामान विभागाने सांगितले की, पुढील काही दिवस राज्यात ही थंडी कायम राहण्याची शक्यता आहे.

थंडीची लाट म्हणजे विशिष्ट क्षेत्रातील तापमान सरासरीपेक्षा मोठ्या प्रमाणात घटणे. हिवाळ्यात श्वसनसंस्थेशी संबंधित आजार जसे की सर्दी, खोकला, फ्लू, घसा खवखवणे आणि दमा यांसारखे आजार प्रामुख्याने दिसतात. थंड हवेमुळे फुफ्फुसांच्या नळ्या आकुंचन पावतात, ज्यामुळे श्वसनविकार असलेल्या रुग्णांना त्रास वाढतो.



हवेतील ओलावा कमी झाल्यामुळे त्वचा कोरडी पडणे, ओठ फाटणे, एक्झिमा आणि सोरायसिससारखे त्वचारोग उद्भवू शकतात.

कमी तापमानामुळे सांध्यांची लवचिकता कमी होऊन गुडघे, कंबर व हात-पायांच्या सांध्यांत वेदना जाणवतात. तसेच, हिवाळ्यात रक्तवाहिन्या आकुंचन पावल्याने रक्तदाब वाढतो, ज्यामुळे ज्येष्ठ नागरिकांमध्ये हृदयविकाराचा धोका वाढतो.

गरोदर महिला, लहान मुले, वयोवृद्ध नागरिक आणि श्वसनविकार असलेले रुग्ण हे थंडीच्या दृष्टीने अधिक जोखमीचे असल्याने त्यांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्य संस्थांना जनजागृती करण्याचे मार्गदर्शन देण्यात आले आहे.

थंडीमुळे अंग कापणे, बोटे, पायांची टोकं, कानाची पाळी किंवा नाकाचा शेंडा निस्तेज, पांढरट किंवा पिवळसर होणे यासारखी लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा. थंडीचा चटका बसल्यास संबंधित भाग चोळू नये; गरम पाण्यात बुडवावे. कोणतीही आरोग्य समस्या उद्भवल्यास तात्काळ नजीकच्या शासकीय दवाखान्यात तपासणी करून घ्यावी.

वाढत्या थंडीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी स्वतःची व कुटुंबीयांची काळजी घेऊन सुरक्षित राहावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किर्ती किरण पूजार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष आणि जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास यांनी केले आहे.

### थंडीपासून बचावासाठी आवश्यक खबरदारी...

- पुरेसे उबदार कपडे घालावे; एकावर एक कपडे घालणे उपयुक्त ठरते.
- शरीर कोरडे ठेवावे; ओले कपडे त्वरित बदलावेत.
- हात-पाय पूर्ण झाकले जातील असे मोजे व हातमोजे वापरावेत.
- शक्यतो घरातच राहावे, प्रवास मर्यादित ठेवावा.
- वृद्ध व लहान मुलांची विशेष काळजी घ्यावी.
- रेडिओ, दूरदर्शन व वृत्तपत्रांतून हवामानविषयक माहिती घ्यावी.
- नियमित गरम पेय सेवन करावे; मद्यपान टाळावे.

लातूर
दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## श्री संत रविदास महाराज मंदिर जीर्णोद्धारासाठी ५ लाखांचा निधी

**त.भा. वृत्तसेवा,**

**वलांडी, १८ डिसेंबर :** भालकी तालुक्यातील मेहकर येथील श्री संत रविदास महाराज मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी ५ लाख रुपयांचा निधी मंजूर करून तो विधिवत सुपूर्द करण्यात आला. शनिवार, दिनांक १३ डिसेंबर रोजी सायगाव सर्कलचे युवा नेते तथा भालकी येथील भारत पब्लिक स्कूलचे संस्थाध्यक्ष प्रवीण हनम शेट्टे यांच्या हस्ते श्री संत रविदास महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करण्यात आली.

भालकी विधानसभा निवडणुकीपूर्वी दिलेल्या आश्वासनानुसार, बिदर जिल्ह्याचे पालकमंत्री तसेच कर्नाटक राज्याचे कॅबिनेट जैव-वन मंत्री यांच्या अनुदानातून मेहकर येथील श्री संत रविदास महाराज मंदिरच्या जीर्णोद्धारासाठी ५ लाख रुपयांचा निधी समाज बांधव व ग्रामस्थांच्या उपस्थितीत श्री संत रविदास महाराज मंदिर कमिटीच्या पदाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमास मोहनराव कांबळे, सत्यवान कांबळे, श्रीपती कांबळे, पिराजी कांबळे, विजयकुमार कांबळे, तुकाराम कांबळे, संतोष कांबळे, भिवाजी कांबळे, बालाजी कांबळे, माधव कांबळे, ज्ञानेश्र्वर कांबळे, श्रावण कांबळे, राम कांबळे, सुभाष कांबळे, दिनकर कांबळे, महेश कांबळे, केरबा कांबळे, किशोर कांबळे, सुनील सातपुते, तिरुपती कांबळे, तानाजी कांबळे, अशोक कांबळे, शिवाजी कांबळे यांच्यासह माता-भगिनी व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# अभूतपूर्व रॅलीने भाजपाच्या विजयावर शिक्कामोर्तब

## रेणापूरच्या मतदारांचा भाजपावर विश्वास : आ. रमेशअप्पा कराड






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १८ डिसेंबर :** रेणापूर नगरपंचायत निवडणूकीतील भारतीय जनता पार्टीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांची ऐतिहासिक अभूतपूर्व आशीर्वाद पदयात्रा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी रेणापूर शहरात काढण्यात आली. ढोल ताशांचा गजर, फटाक्यांची आतिषबाजी, भाजपाचे ध्वज, डोक्यावर भाजपाच्या टोप्या आणि गळ्यात गमजे घातलेले हजारो मतदार महिला, पुरुष, तरुण सहभागी झाले होते. या रॅलीत महिलांची संख्या लक्षणीय होती. भाजपाचा विजय असो यासह विविध घोषणा देत निघालेल्या या प्रचार रॅलीने संपूर्ण रेणापूर शहर ढवळून निघाले. या अभूतपूर्व पदयात्रेने भाजपाच्या विजयावर जणू शिक्कामोर्तब केले.

रेणापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाच्या वतीने केलेल्या विकास कामाच्या आधारावर नगराध्यक्ष पदाच्या आणि १७ ही प्रभागात उमेदवार सक्षमपणे निवडणूक रिंगणात उतरले आहेत. सुरुवातीपासूनच प्रचारात आघाडी घेतलेल्या भाजपाच्या उमेदवारांच्या प्रचाराची सांगता गुरुवार १८ डिसेंबर रोजी ऐतिहासिक आणि अभूतपूर्व निघालेल्या आशीर्वाद पदयात्रेने झाली.

सकाळी ग्रामदैवत श्री रेणुका मातेचे दर्शन घेऊन या रॅलीचा शुभारंभ झाला. विविध वाजंत्री, बँड पथक, पारंपारिक वाद्य पथके, हलग्यांचा निनाद, फटाक्यांची आतिषबाजी करत ही रॅली निघाली. भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराड आणि माजी आमदार अॅड. त्र्यंबकनाना भिसे त्याचबरोबर भाजपाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती शोभाताई आकनगिरे यांच्यासह सर्व महिला उमेदवार उघड्या जीप मधून तसेच पदयात्रेत सहभागी झालेले भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष ऋषिकेशदादा कराड, रेणापूरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांच्यासह भाजपाचे सर्व उमेदवार रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असणाऱ्या, घराच्या छतावर थांबलेल्या मतदारांना अभिवादन करत आशीर्वाद मागत होते.

समारोपाच्या सभेत मार्गदर्शन करताना भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, भाजपाने शहरात कोट्यवधी रुपयांची विकास कामे केली आहेत. अभिषेक आकनगिरे यांच्या नेतृत्वात रेणापूर शहराचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम झाले आहे. उर्वरित कामे पुढील वर्षभरात पूर्ण करण्याचे आश्वासन देत रेणापूरच्या जनतेचा भाजपावर ठाम विश्वास आहे असे बोलून दाखवले.

बंजारा बांधवांसाठी लवकरच भव्य संत सेवालाल भवन बांधून देण्याची ग्वाही देऊन आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, भाजपाच्या विजयाची घोडदौड पाहून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. त्यामुळे जातीपातीचे राजकारण करत अपप्रचार केला जात आहे. मटका घेणारे व रेशनच्या धान्याचा काळाबाजार करणाऱ्यांना उमेदवारी देणाऱ्या काँग्रेसला मते मागण्याचा अधिकार नाही. तेव्हा मतदारांनी कुणाच्याही भूलथापांना आमिषांना बळी न पडता, आजवर केलेल्या कामाला समर्थन देऊन पुन्हा एकदा भाजपाच्या सर्वच्या सर्व उमेदवारांना प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

रेणापूरच्या इतिहासात पहिल्यांदाच एवढी मोठी भाजपाची प्रचार रॅली निघाली असून खऱ्या अर्थाने ही विजयावर शिक्कामोर्तब करणारी रॅली आहे असे सांगून यावेळी बोलताना माजी आमदार त्र्यंबकनाना भिसे म्हणाले की, मागील काळात भाजपाने रेणापूर शहरात केलेल्या कामाची ही पावती आहे.

या निवडणुकीत विरोधकांचे डिपॉझिट जप्त झाल्याशिवाय राहणार नाही. यावेळी आपल्या प्रस्ताविकातून प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे यांनी मागील काळात केलेल्या विकास कामामुळे जनता भाजपाच्या पाठीशी असल्याचे सांगून उर्वरित कामे करण्यासाठी भाजपाच्या पाठीशी राहून नगराध्यक्षसह नगरसेवक पदाच्या सर्व उमेदवारांना बहुमताने विजय करून आशीर्वाद द्यावेत असे आवाहन अभिषेक आकनगिरे यांनी केले. सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी अॅड. दशरथ सरवदे यांनी आभार मानले.




# लातूर जिल्हाधिकारी कार्यालयात अल्पसंख्याक हक्क दिवस साजरा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १८ डिसेंबर :** जिल्हाधिकारी कार्यालयात आज अल्पसंख्याक हक्क दिवसानिमित्त जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या उपस्थितीत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अल्पसंख्याक समाजाचे हक्क, त्यांच्या विकासाच्या अनुषंगाने यावेळी मार्गदर्शन करण्यात आले.

अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नटके, पुनर्वसन उपजिल्हाधिकारी संगीता टकले, रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, सामान्य प्रशासनच्या उपजिल्हाधिकारी सायली ठाकूर, उपजिल्हा निवडणूक अधिकारी गणेश पवार, जिल्हा पुरवठा अधिकारी व्यंकटेश रावलोड, जिल्हा परिषदेचे महिला बालकल्याण उप मुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, मौलाना आझाद आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक, तसेच जिल्हास्तरीय अधिकारी, कर्मचारी यावेळी उपस्थित होते. श्रीमती एन. एन. पटेल, प्रा. महावीर उदगीरकर, डॉ. साकेब उस्मानी, विजयकुमार परभणकर यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन झाले.

शासकीय अधिकारी, कर्मचारी म्हणून काम करताना प्रत्येकाने संविधानिक मूल्ये, समान संधी व सामाजिक सलोखा यांचा आदर राखत सेवा देणे आवश्यक आहे. समानता, बंधुता व न्याय हीच आपल्या लोकशाहीची खरी ताकद आहे, हे लक्षात ठेवून सर्वांनी आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी यावेळी केले.

जिल्हा नियोजन अधिकारी तथा जिल्हा अल्पसंख्यांक अधिकारी सोमनाथ रेड्डी यांनी अल्पसंख्याक समुदायाच्या कल्याणासाठी जिल्ह्यामध्ये राबविण्यात येणाऱ्या केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांविषयी सादरीकरण करून योजनांची माहिती दिली. सहायक जिल्हा नियोजन अधिकारी शंकर सोपान साबरे उपस्थितांचे आभार मानले.

## मतदान, मतमोजणी दिवशी आठवडी बाजार बंद

**लातूर, दि. १८ :** जिल्ह्यात उदगीर, निलंगा नगरपरिषद व रेणापूर नगरपंचायत क्षेत्रात २० डिसेंबर २०२५ रोजी मतदान होत आहे. तसेच उदगीर, औसा, निलंगा, अहमदपूर नगरपरिषद आणि रेणापूर नगरपंचायत निवडणुकीची मतमोजणी २१ डिसेंबर २०२५ रोजी होणार आहे. त्यामुळे या नगरपरिषद, नगरपंचायत क्षेत्रात २० व २१ डिसेंबर २०२५ रोजी भरणारे आठवडी बाजार बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिले आहेत. त्यानुसार औसा येथे रविवारी भरणारा आठवडी बाजार बंद राहणार असून, या दिवशीचा आठवडी बाजार इतर दिवशी भरविण्यात येणार आहे. मार्केट एड फेअर क्ट १९८२ चे कलम ५ (अ) मधील तरतुदीनुसार पणन संचालक यांनी दिलेल्या मान्यतेनुसार हे आदेश निर्गमित करण्यात आले आहेत.

## शिवाजी महाविद्यालयाच्या विज्ञान प्रयोगास द्वितीय पारितोषिक

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १८ डिसेंबर :** पंचायत समिती शिक्षण विभाग, रेणापूर यांच्यावतीने सक्षम इंग्लिश स्कूलमध्ये घेण्यात आलेल्या ५३ व्या तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात जेएसपीएम संचालित शिवाजी विद्यालय बिटरगाव येथील विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन केले विद्यालयातील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या हायड्रोफोनिक शेती या विज्ञान प्रयोगास द्वितीय पारितोषिक मिळाले असून याचे वितरण गटशिक्षण अधिकारी कृष्णा भराडीया यांच्याहस्ते करण्यात आले.

यावेळी शिवाजी विद्यालयातील विद्यार्थीनी सना शेख, मार्गदर्शक अरूण काळे, मुख्यध्यापक सूर्यकांत चव्हाण यांचा पंचायत समिती शिक्षण विभाग रेणापूरच्यावतीने सत्कार करण्यात आला. यावेळी संजय देशपांडे, सुदर्शन लहाने, अनिल कुटवाड यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

शिवाजी विद्यालयाच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा सौ.प्रतिभाताई पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, शै

क्षणिक समन्वयक संभाजीराव पाटील, समन्वयक विनोद जाधव, समन्वयक अनिरूध्द पाटील यांच्यासह प्राचार्य, मुख्याध्याक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी कौतुक केले.

## डॉ.होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षेत 'स्वामी विवेकानंद'चे यश

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १८ डिसेंबर :** जेएसपीएम लातूरद्वारा संचलित स्वामी विवेकानंद प्राथमिक विद्यालय, लातूर येथील इयत्ता ६ वी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षातील १० विद्यार्थ्यांनी मुंबई सायन्स टिचर असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षेमध्ये घवघवीत यश संपादन केलेले आहे.

यामध्ये आदित्य थोरात, आरोही मिटकरी, विराज माने, हर्षवर्धन मोहिते, वेदिका शिंदे, प्रणिती देशमुख, आरूष कांबळे, रिया जाधव, सिध्दी स्वामी, स्वराज सरवदे या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. डॉ.होमीभाभा बालवैज्ञानिक परीक्षा ही विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक



दृष्टिकोन, तर्कशक्ती व वैज्ञानिक ज्ञानाचे मुल्यमापन करणारी राज्यस्तरीय स्पर्धा आहे. या परीक्षेतील विद्यार्थ्यांच्या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक गुणवत्तेत भर पडलेली आहे. या विद्यार्थ्यांना या परीक्षेसंदर्भात शितल वाडीकर, सोनाली, पाटील, शुभांगी बेरूळे, ज्योती राजुरे व माधवराव गित्ते यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या या यशाबद्दल जेएसपीएम संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेच्या सचिवा प्रतिभाताई शिवाजीराव पाटील कव्हेकर, संस्थेचे उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, कार्यकारी संचालक रंजितसिंह पाटील कव्हेकर, संस्थेचे समन्वयक विनोद जाधव, अनिरूध्द पाटील,फायनांन्स डायरेक्टर बापूसाहेब गोरे, मुख्याध्याक शिवाजी सूर्यवंशी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, पालक व विद्यार्थ्यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# निलंगा पालिका निवडणुकीत तिरंगी लढत

### काँग्रेसची मोटारसायकल रॅली, भाजप व उबाठा शिवसेना पदयात्रेने राजकीय वातावरण ढवळून निघाले

**त.भा. वृत्तसेवा,**

**निलंगा, १८ डिसेंबर :** निलंगा येथे नगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराच्या अंतीम टप्प्यात काँग्रेस, भाजप व उबाठा शिवसेना यांच्यात नगराध्यक्ष पदासाठी चुरशीची तिरंगी लढत होत आहे. गुरुवार दिनांक १८ डिसेंबर रोजी काँग्रेस पक्षाच्या वतीने मोटरसायकल रॅली, भाजप व उबाठा शिवसेनेच्या वतीने भव्य पदयात्रा काढून जोरदार शक्ती प्रदर्शन केले. मोटर सायकल रॅली व पदयात्रेमुळे शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे .

निलंगा नगर परिषद निवडणुकीसाठी २३ नगरसेवक व एक नगराध्यक्ष पदासाठी निवडणूक होत आहे . दरम्यान न्यायालयीन प्रक्रियेमुळे निवडणूक आयोगाने २ डिसेंबर रोजी होणारे मतदान अचानक पुढे ढकलली





व २० डिसेंबर रोजी मतदान ठेवली आहे. निवडणुकीच्या दुसऱ्या व अंतिम टप्प्यात चुरशीची तिरंगी लढत होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. प्रचारासाठी प्रत्येक पक्षाला पुरेसा वेळ मिळाल्याने भाजप ,काँग्रेस व उबाठा शिवसेना पक्षाच्या सर्व उमेदवारांना व नेत्यांना डोअर टू डोअर प्रचार करण्याची संधी मिळाल्याने शहरातील राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे.

आज प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात राजकीय पक्षाच्या रॅली व पदयात्रा तसेच वेळा अमावाश्याचा बाजार यामुळे शहरातील सर्व मुख्य रस्त्यावर माणसांची गर्दी व वाहनांची वाहतूक कोंडी दिसून आली. सकाळी काँग्रेस पक्षाच्या वतीने लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे चेअरमन माजी आमदार धीरज देशमुख व जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत मोटरसायकल रॅली काढण्यात आली. या रॅलीत नगराध्यक्ष पदाचे काँग्रेसचे उमेदवार हमीद शेख व विविध प्रभागातील उमेदवार, कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उबाठा शिवसेनेच्या वतीने माजी खासदार , माजी मंत्री चंद्रकांत खैरे व शिवसेना जिल्हाध्यक्ष संतोष सोमवंशी यांच्या प्रमुख उपस्थितीत निलंगा शहरातून शहरातून पदयात्रा करण्यात आली. या पदयात्रेत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार लिंबन महाराज रेशमे मतदारांना अभिवादन करत होते. या पदयात्रेतील सहभागी महिल, विविध पारंपारिक वेशभूषेतील समाज घटक शहरवासीयांचे लक्ष वेधून घेत होते.

भाजपच्या वतीने आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर, अरविंद पाटील निलंगेकर, पॅनल प्रमुख माजी नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे तसेच भाजप, शिवसेना, रिपाई महायुतीचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीत जनसेवा कार्यालयापासून शहरातील मुख्य रस्त्यावरून ढोल ताशाचा गजर व फटाक्यांची आतिषबाजी करत विशाल पदयात्रा काढण्यात आली.

या पदयात्रेत नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजयराज हलगरकर यांच्यासह नगरसेवक पदाचे २३ उमेदवार सहभागी झाले होते. शहरातील सर्व महामानवांना अभिवादन करून हुतात्मा स्मारक येथे भाजपच्या पदयात्रेचा समारोप झाला.

## ठरावपत्र

**लिहून देणार :** १) रफीक नजीरसाब शेख, वय-४३ वर्षे, धंदा-व्यापार, रा. बालाजीनगर, लातूर, ता.जि. लातूर, आधार क्र. ८१८६१५२६१२१७. रा. जिन्नत सोसायटी, लातूर, ता.जि. लातूर. २) ताजखाँ तैमुरखाँ पठाण, वय-५३ वर्षे, धंदा- नोकरी, रा. जिन्नत सोसायटी, लातूर, ता.जि. लातूर.
**लिहून घेणार :** चाँदसाब कचरू शेख, वय-४४ वर्षे, धंदा-शेती, रा. हाडोळी, ता. चाकूर, जिल्हा लातूर.
कारणे ठरावपत्र लिहून देतो/देते ऐसा जे की, माझ्या मालकी कब्जेवहिवाटीचा खुल्ला प्लॉट १ पूर्ण (एक पूर्ण) हद्दीत असून जमीन सर्वे नं. ८९/ब/३ पैकीचा खाजगी खुल्ला प्लॉट/मिळकत नं. म.न.पा.क्र. २५ फूट आहे व रूंदी दक्षिण-उत्तर पू.बा. ४९ फूट १० इंच-प.बा. ४९ फूट ६ इंच फूट आहे. याचे एकूण क्षेत्र १२३३ चौरस फूट ११४.५९ चौ.मी. आहे. ज्याची चतु:सीमा खालीलप्रमाणे आहे. पूर्वेस-प्लॉट नं. २, पश्चिमेस-प्लॉट नं. ७ अनुराधा शेरखाने यांचा, दक्षिणेस- ३० फूट रूंदीचा रस्ता, उत्तरेस- महादेव गोविंद गोजमगुंडे यांची शेतजमीन. येणेप्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील खुल्ला प्लॉट मी तुम्हास आज रोजी एकूण रक्कम रुपये २३,४२,७००/- (अक्षरी- तेवीस लाख बेचाळीस हजार सातशे रु. फक्त) मध्ये विक्री करण्याचा ठराव करून ठरावापोटी मी तुमच्याकडून आज रोजी इसार म्हणून रक्कम-८,५०,०००/- (अक्षरी- आठ लाख पन्नास हजार रु. फक्त) घेवून भरून पावलो आहे व बाकी राहिलेली रक्कम रुपये- १४,९२,७००/- (अक्षरी- चौदा लाख ब्याण्णव हजार सातशे रूपये फक्त) हे उर्वरित रक्कम ५ मार्च २०२६ पर्यंत देण्याचे ठरले आहे. तसेच सदर प्लॉटवर कोणाचा काही कर्ज बोजा निघाल्यास त्यास मी सर्वस्वी जबाबदार राहील. तसेच राहिलेल्या कागदांची पूर्तता करून देण्याची सर्वस्वी जबाबदारी लिहून देणार यांची राहील. सदरचा प्लॉट नंबर १ हा पूर्वी शेख मेहबूब मौलासाब यांच्या नावे नोटरी रजिस्टर क्र. ५२१६/२०२५ दिनांक १५-१२-२०२५ रोजी करून देण्यात आला होता. तो या ठरावपत्रानुसार रद्द करण्यात आला असून आज रोजी साक्षीदार क्र. १ झाले आहेत. सबब हे ठरावपत्र मी माझ्या राजीखुशीने खालील साक्षीदारासमक्ष लिहून दिले ते सत्य आहे.
**दिनांक : १८-१२-२०२५**
**ठिकाण : लातूर.**

**लिहून देणार : स्वाक्षरित/-**
**१) रफिक नजीरसाब शेख, ताजखाँ तैमुरखाँ पठाण**
**लिहून घेणार : स्वाक्षरित/- चाँदसाब कचरू शेख**
**साक्षीदार : स्वाक्षरित/-**
**१. शेख मेहबूब मौलासाब, २) अब्दूल गफार अली चाऊस, ३) फारूक मुबारक मणियार**